१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• पुणे, गुरुवार ४ डिसेंबर, २०२५ • वर्ष-५, अंक-७६, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.I.N.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 76, Marathi - Daily - Pune, 4 December, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा !

मतदानाचा टक्का का घसरला?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews



त्रिमूर्ती अवतार, दत्त रुपी साकार,
त्रिभुवनी पसरे, भक्तीचा सागर
होता साक्षात्कार, घडतो चमत्कार,
गुरु माऊली चरणी नमस्कार

# फडणवीस सरकारने अतिवृष्टीबाबतचा अहवाल केंद्राला पाठवलाच नाही! मंत्र्याच्या वक्तव्याने गोंधळ

■ मुंबई

**अतिवृष्टीने यावर्षी मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागात हैदोस घातला. यामुळे झालेल्या नुकसानीचा अहवाल केंद्र सरकारला पाठवून सरकारकडून मोठी मदत शेतकऱ्यांसाठी मिळवायची आहे. मात्र इतके महिने उलटून गेल्यानंतरही राज्य सरकारने हा अहवाल केंद्राकडे पाठविला नाही असे काल केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी लोकसभेत लेखी उत्तरात म्हटले. यामुळे फडणवीस सरकारवर टीकेची झोड उठली. याला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस आणि राज्याचे कृषिमंत्री भरणे यांनी वेगवेगळी उत्तरे दिल्याने संशय आणि गोंधळ अधिकच वाढला.**



**लोकसभेत** केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी लेखी उत्तरात म्हटले की महाराष्ट्राने अतिवृष्टीचा अहवालच पाठवलेला नाही. याबाबत विचारले असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र अहवाल पाठवल्याचे म्हटले. फक्त दळणवळणाच्या नुकसानीचा अहवाल पाठविलेला नाही असेही त्यांनी सांगितले. दुसरीकडे राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सुरुवातीला म्हटले की, समिती नेमली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर राज्य सरकार केंद्राकडे अहवाल पाठवेल. मुख्यमंत्री फडणवीस आणि कृषिमंत्री भरणे यांनी परस्पर विरोधी वक्तव्य केल्याने गोंधळ झाला. ही बाब लक्षात आल्यावर अहवाल पाठवला असे सांगत भरणे यांनी घूमजाव केले. नुकसानीच्या अहवालावरून केवळ केंद्र-राज्य समन्वय नाही तर मंत्रिमंडळातही गोंधळ असल्याचे चित्र निर्माण झाले. यादरम्यान मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव उद्या यासंदर्भात दिल्लीतील बैठकीला जाणार असल्याचे कळते. या सगळ्या गोंधळावर सुप्रिया सुळे, विजय वडेट्टीवार या विरोधी नेत्यांनी राज्य सरकारवर शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप केला.



काल लोकसभा अधिवेशनात तारांकित प्रश्नोत्तरात महाराष्ट्राच्या काँग्रेस खा. प्रतिभा धानोरकर यांनी अतिवृष्टीमुळे चंद्रपूरमध्ये झालेल्या नुकसानीबाबत प्रश्न उपस्थित केला. यावर केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले की, अतिवृष्टीनंतर महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविलेला नाही. महाराष्ट्र शासनाने राज्य आपत्ती निवारण निधीतून अतिवृष्टी आणि पुरामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना ४१७६.८० कोटींची मदत केली आहे. यात केंद्राचा वाटा ३१३२.८० कोटी रुपयांचा आहे. हा निधी १५६६.४० कोटींच्या दोन टप्प्यांत राज्याला देण्यात आला आहे.

केंद्र सरकारला नुकसानीचा अहवाल पाठवला नाही याबाबत सवाल केला असता कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आधी म्हणाले की, या माहितीमुळे शेतकऱ्यांचा गैरसमज होण्याची शक्यता आहे. याबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासह सर्व शेतकरी संघटनांच्या नेत्यांसोबत चर्चा झाल्यानंतर » पान ७ वर

## गदारोळानंतर शिवराजसिंहांचा खुलासा



महाराष्ट्र अतिवृष्टी अहवालावरून गदारोळ झाल्यानंतर आज केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी लगेच लोकसभेत खुलासा केला. त्यांनी सांगितले की महाराष्ट्रात जी अतिवृष्टी झाली त्याचा अहवाल २७ नोव्हेंबरला केंद्र सरकारला त्यांनी पाठवला आहे. मात्र चौहान यांच्या या खुलाशानंतरही संशय कायम आहे.

## पंतप्रधान मोदींचा चहा विकतानाचा एआय व्हिडिओ काँग्रेसकडून पोस्ट

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी मोठ्या कार्यक्रमात चहा विकत असल्याचे दाखवणारा एआयच्या मदतीने तयार केलेला व्हिडिओ काँग्रेस नेत्याने शेअर केला. भाजपाने त्याचा तीव्र निषेध केला आहे. यावरून भाजपा आणि काँग्रेसमध्ये वाद निर्माण झाला. काँग्रेसने पंतप्रधानांचा अपमान केल्याचा आरोप भाजपाने केला आहे.



काँग्रेस नेत्या रागिनी नायक यांनी एक्सवर हा व्हिडिओ पोस्ट केला. त्यात लिहिले होते, आता, हे कोणी केले? हातात चहाची किटली घेतलेले पंतप्रधान मोदी आणि त्यांची नक्कल करणारा आवाज ऐकू येतो, चाय बोलो, चाय असे व्हिडिओमध्ये आहे. यामुळे भाजपामधून संताप व्यक्त होत आहे. काँग्रेसवर टीका करताना भाजपाचे प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी म्हटले की, रेणुका चौधरी यांनी संसदेचा अपमान केल्यानंतर आता रागिणी नायक यांनी पंतप्रधान मोदी हे चायवाला असल्याचा एआय निर्मित व्हिडिओ पोस्ट करून त्यांची खिल्ली उडवली » पान ७ वर

## बँक ऑफ महाराष्ट्रमधील हिस्सा सरकार विकणार

■ नवी दिल्ली

**सरकारी** मालकीच्या बँक ऑफ महाराष्ट्रमधील ६ टक्के हिस्सा विकण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. ऑफर फॉर सेलच्या माध्यमातून ही समभाग विक्री होणार आहे. या हिस्साविक्रीमधून सरकारला २ हजार ४९२ कोटींचा महसूल मिळणार आहे. कालपासून ऑफर फॉर सेलच्या माध्यमातून हिस्सा विक्रीला सुरुवात झाली असून गुंतवणुकदारांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. पहिल्याच दिवशी चारशे टक्के नोंदणी झाली आहे, अशी माहिती सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभागाचे सचिव आरुष चावला यांनी एक्स पोस्टद्वारे दिली. विक्रीसाठी ५४ रुपये प्रति समभाग अशी किमान किंमत निश्चित करण्यात आली आहे.

## शीतल तेजवानीला अटक! पार्थवर कारवाई कधी?



■ पुणे

**उपमुख्यमंत्री** अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी संबंधित पुणे जमीन गैरव्यवहार प्रकरणात मुख्य सूत्रधार असलेल्या शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी आज अटक केली. या प्रकरणाचा संबंध अमेडिया कंपनीच्या कोरेगाव पार्कमधील जमीन व्यवहाराशी असून या कंपनीत पार्थ पवार यांची ९९ टक्के, तर दिग्विजय पाटील यांची १ टक्के भागीदारी आहे. तरीही पार्थ पवार यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई किंवा गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही.त्यामुळे पार्थ पवार यांच्यावर कारवाई कधी? असा » पान ७ वर

## महात्मा फुलेंवरील माहितीपटाशी संबंधित फाईल मंत्रालयातून गहाळ

■ मुंबई

**सत्ताधाऱ्यांची** अनास्था आणि प्रशासनाच्या गलथान कारभाराचे आणखी एक उदाहरण समोर आले आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर आधारित माहितीपटाशी संबंधित अत्यंत महत्त्वाची फाईल मंत्रालयातून गहाळ झाली आहे. मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात यासंबंधी एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

माहिती आणि जनसंपर्क महासंचलनालयाचे (डीजीआयपीआर) वरिष्ठ सहाय्यक संचालक सागर नामदेव कांबळे यांनी ही तक्रार दाखल केली आहे. कांबळे हे १ सप्टेंबर २०२५ पासून न्यूज रील विभागात कार्यरत आहेत. २८ ऑक्टोबर रोजी नियमित काम करत असताना त्यांना आढळून आले की, महात्मा फुले यांच्या जीवनावरील माहितीपटाशी संबंधित फाईलची मूळ प्रत गायब आहे. दफ्तरी जी आहे ती मूळ फाईलची झेरॉक्स प्रत आहे. कांबळे यांनी याबद्दल विभागातील कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांच्या आदेशावरून आपण याच फाईलला नवी कागदपत्र जोडत आहोत,असे सांगितले. त्यानंतर कांबळे यांनी मूळ फाईल शोधण्याचे आदेश कर्मचाऱ्यांना दिले. कर्मचाऱ्यांनी संपूर्ण विभागात शोध घेतला. मात्र मूळ फाईल सापडली नाही. त्यानंतर कांबळे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

## ज्येष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांचे निधन

■ मुंबई

**राष्ट्र सेवा** दलाचे माजी अध्यक्ष तथा समाजकारण, राजकारण, पत्रकारिता या क्षेत्रांमध्ये सत्तर वर्षाहून अधिक काळ कार्यरत असलेले विचारवंत पन्नालाल सुराणा यांचे निधन झाले. नळदुर्ग येथे त्यांच्या घरी मंगळवारी रात्री जेवणानंतर त्यांना उलटीचा त्रास सुरु झाला. उपचारासाठी त्यांना तातडीने रुगणालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. आपले जीवन समाजासाठी समर्पित करणाऱ्या पन्नालाल सुराणा यांचे पार्थिव शासकीय रुगणालयाला दान करण्याचा निर्णय घेण्यात आला. पन्नालाल सुराणा यांचा जन्म ९ जुलै १९३३ रोजी सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे झाला. आपल्या शालेय जीवनातच ते राष्ट्र सेवा दलामध्ये सामील झाले. समाजवादी विचारांनी प्रेरित होऊन तरुण वयात ते जयप्रकाश नारायण यांच्या कार्यामध्ये सहभागी झाले. आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी दीर्घ काळ पत्रकारितेमध्ये आपले योगदान दिले.

## कामगार कायद्यात सुधारणा इंडिया आघाडीचे आंदोलन

■ नवी दिल्ली

**संसदेच्या** हिवाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी, कामकाज सुरू होण्याआधी काँग्रेससह इंडिया आघाडीच्या नेत्यांनी कामगार कायद्यातील सुधारणा विरोधात मकरद्वार परिसरात जोरदार आंदोलन केले. या आंदोलनात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांसह अनेक नेते उपस्थित होते.

यावेळी नेत्यांनी हातात फलक घेऊन श्रमिकांचे हक्क वाचवा, श्रमिक न्याय हवा, श्रमिकविरोधी कायदे मागे घ्या, अशी घोषणाबाजी केली. त्याचप्रमाणे त्यांनी हे कायदे श्रमिकांचे हक्क, सुरक्षितता आणि सामाजिक संरक्षण कमकुवत करतात, त्यामुळे कामगारांच्या हिताविरुद्ध आहेत असा दावा केला.

## अजित पवारांचे पुत्र जय पवारांचा विवाह अरब देशात! बहरीनला सोहळा

■ पुणे

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा जय पवार यांचा ऋतुजा पाटील यांच्याशी ५ डिसेंबर रोजी विवाह होणार आहे. मात्र हा विवाह सोहळा बारामतीत तर नाहीच, पण महाराष्ट्रात किंवा भारततही होणार नाही, तर थेट अरब देशात बहरीन शहरात विवाह सोहळा पार पडणार आहे. या समारंभासाठी पवार-पाटील कुटुंबाने केवळ ४०० पाहुण्यांना निमंत्रित केले आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातूनही फक्त दोनच नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना लग्न समारंभासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. » पान ७ वर



## एमपीएससी जाहिरातीला विलंब! हजारो उमेदवार वयोमर्यादेबाहेर

■ मुंबई

**महाराष्ट्र** लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) गट 'ब' मधील विविध पदांसाठीची संयुक्त पूर्व परीक्षा वेळापत्रक आणि जाहिरात अपेक्षेपेक्षा जवळपास सहा महिने उशिराने जाहीर झाली. त्यामुळे राज्यभरातील अडीच ते तीन हजार उमेदवार वयोमर्यादेबाहेर (एजबार) गेले आहेत.

या परीक्षेची जाहिरात डिसेंबर २०२४ किंवा जानेवारी २०२५ मध्ये अपेक्षित होती. ती प्रत्यक्षात जुलै २०२५ मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर अर्ज प्रक्रिया ऑगस्टमध्ये पूर्ण झाली. राज्यभरातून २.५० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज केला होता. अर्जाच्या तारखेपासून परीक्षेपर्यंतच्या कालावधीत वयपात्रता मोजली जाते. त्यामुळे जाहिरात व परीक्षेतील एकूण ४२ दिवसांच्या दिरंगाईचा परिणाम उमेदवारांवर झाला. सुरुवातीला परीक्षा ९ नोव्हेंबरला होणार होती मात्र वेळापत्रक बदलत ती २१ डिसेंबरला ठेवण्यात आली. तरीही वयोमर्यादेत कोणतीही शिथिलता न दिल्याने अनेक जण अपात्र ठरले.

## लढाऊ विमानातील वैमानिकाच्या सुरक्षेसंबंधी महत्त्वाची चाचणी यशस्वी



**लढाऊ विमानांच्या वैमानिकांच्या सुरक्षेशी संबंधित आपत्कालीन परिस्थितीत विमानातून सुरक्षित बाहेर पडण्यासाठी उपयुक्त अशी हाय-स्पीड रॉकेट-स्लेडची चाचणी नुकतीच संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) यशस्वीरित्या पार पाडली. महत्त्वाची बाब म्हणजे या यशस्वी चाचणीमुळे भारताला अशी अत्याधुनिक यंत्रणा विकसित करणाऱ्या मोजक्या देशांच्या यादीत स्थान मिळाले आहे.**

■ नवी दिल्ली

**हाय स्पीड** रॉकेट- स्लेड चाचणी प्रत्यक्ष लढाऊ विमान हवेत उडवून घेतली जात नाही. रॉकेट उड्डाणासाठी वापरलेले इंजिन असलेले एक वाहन रेल्वेसारख्या रुळांवरून ८०० किलोमीटर प्रतितास एवढ्या प्रचंड वेगाने चालवले जाते. या वेगामुळे लढाऊ विमान प्रत्यक्ष हवेतून प्रवास करत असल्यासारखी स्थिती निर्माण होते. नियंत्रित वातावरणात वैमानिकाने इजेक्ट » पान ७ वर

## विधिमंडळ हिवाळी अधिवेशन फक्त ८ दिवस चालणार

■ नागपूर

**कामकाज** सल्लागार समितीच्या आज झालेल्या बैठकीत विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला. त्यानुसार ८ डिसेंबर ते १४ डिसेंबर असे ८ दिवस हे अधिवेशन चालणार आहे. १४ डिसेंबरला रविवार असला तरी अधिवेशनाचे कामकाज होणार आहे. दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्षनेते पद अधिवेशनात जाहीर करण्याची मागणी उबाठाचे आ. भास्कर जाधव यांनी केली. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी ही २१ डिसेंबरला म्हणजे रविवारी करण्याचे आदेश दिल्यामुळे आचारसंहिता २० डिसेंबरपर्यंत लागू राहणार आहे.

## ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भूमिगत मार्ग खोदणाऱ्या यंत्राचा शुभारंभ

**वाहतूक कोंडीतून सुटका होणार**

■ मुंबई

**पूर्व** मुक्त मार्ग आणि सागरी किनारी मार्ग यांना जोडणाऱ्या ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भूमिगत मार्गाचे खोदकाम करणाऱ्या यंत्राचा (टनेल बोअरिंग मशीन) आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्यविकास मंत्री मंगल प्रभात लोढा आदि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की मुंबईच्या सातशे इमारतींच्या खालून तसेच मध्य व पश्चिम रेल्वेमार्गाच्या खालून हा भुयारी मार्ग जाणार आहे. या भुयारी मार्गाची लांबी ९ किलोमीटर असून, सुरक्षेच्या दृष्टीने या दुपरी भुयारी मार्गामध्ये अधिकची एक मार्गिका असणार आहे. हा प्रकल्प हा २०२८ च्या डिसेंबर महिन्यापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. वरळी ते शिवडी पूल आणि सागरी किनारा मार्ग ते ऑरेंज गेट टनल अशा दोन प्रकल्पांच्या माध्यमातून मुंबईकरांचा प्रवासाचा वेळ वाचणार आहे.





# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी 'बायका/मुली' पाहिजेत. पगार 18,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC252877}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (24,000-75,000) **9820628009/ 9833470199** {NC253224}

मुली - हाउसकीपिंग, रिसेप्शनिष्ठ, सिक्युरिटी, पॅकिंग. 103,निर्मलाधाम, प्रभातनगर, गांवदेवी मैदान, ठाणे वेस्ट **7304179292** {NC253225}

नोकरीची सुवर्ण संधी नर्सेस आणि हेल्थकेअर सेक्टर युएई. लेबर जॉब युरोप कंट्री. **9820433355** {NC253231}

अनुभवी इलेक्ट्रीशियन आणि हेल्पर पाहिजेत. पगार योग्यतेनुसार. संपर्क- **9819776666.** {NC253232}

मोठ्या प्रमाणात हाऊसकीपिंग सिक्युरिटी गार्ड ऑफीसबॉय पाहिजे वसईफाटा, बोरिवली, कांदिवली, पालघर, जोगेश्वरी, वडाळा.- **8097507698** {NC253237}

मुंबईत घरकाम, कूक, मुलांची काळजी, रुग्णसेवा, यासाठी मुली/महिला पाहिजे. मोफत राहणे-खाणेची व्यवस्था, पूर्णवेळ/अर्धवेळ, चांगला पगार. **9819339480** {NC253233}

## पाहिजेत

उल्हासनगर येथे ३० ते ५० वयोगटातील स्वयंपाकासाठी शुद्ध शाकाहारी बनविणारे बाई/पुरुष पाहिजे पत्ताः गोदावरी अपार्टमेंट भाटिया चौक उल्हासनगर ४२१००५ मोबाईल **9156775793** {NC253253}

PLANTS WORLD नर्सरीसाठी माळी पाहिजेत चर्नीरोड **9920297466/ 9022094909** {NC253255}

अंधेरीस्थित कुरीअर तसेच कार्गो कंपनीकरीता बोलेरो व मारूती कॅरीकरीता ड्रायव्हर पाहिजेत. कमीतकमी २ वर्षाचा अनुभव आवश्यक. अंधेरीमधील राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्क करा - मॅक्स कुरीयर ॲण्ड कार्गो, गाळा नंबर - 28, मखारीया इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, पेपर बॉक्स जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400093 फोन - **9320101188** {NC253269}

फॅक्टरी हेल्पर पाहिजेत. नवीन/शिकाऊंना मार्गदर्शन देण्यात येईल. भेटा- प्रीती प्रोडक्ट, गाळा-११, जोगानी इंडस्ट्री, JR बोरीचा मार्ग, पेट्रोल पंपगल्ली, लोअर परळ व चिंचपोकळी जवळ. **9320064643, 8080084843** {NC253271}

डोंबिवली पश्चिम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये सिस्टर, वॉर्डबॉय, मावशी व कॉम्प्युटर ज्ञान असणारी व मेडीक्लॅम केसेस हँडल करणारी रिसेपशनीस्ट पाहिजे. मोबाईल- **9869565152/ 9869184218.** {NC253274}

## पाहिजेत

लोअरपरेल पगार 18000 (सुट्टी नाही), वेळ 8 ते 5, PF, ॲडव्हान्स, बोनस, ट्रेनपास, बस भाडे, ओव्हर टाईम, इन्सेन्टिव्ह मिळेल, बिल्डिंगवरील टाक्याची साफसफाई करण्यासाठी गरजू आणि मेहनती युवकांसाठी, वय 40 पर्यंत. **9320080200 / 9821819036** {NC253143}

पेस्ट कंट्रोल नेरुळ करिता अनुभवी टेक्निशियन पाहिजे. **9221964870 / 9892288297** {NC253186}

पाहिजेत सेल्स एक्झिक्युटिव्ह, पेस्ट कंट्रोल टेक्निशियन आणि वर्कर्स कामासाठी मुले पाहिजेत आकर्षक पगार आणि इतर सुविधा पेस्ट रिलीफ इंडिया प्रा.लि. संपर्कः **7498466001** {NC253222}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC253037}

दादर-वरळी येथे ऑफिसमध्ये पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार 10000. फोन - **9029985564** {NC253178}

मरीन लाईन्स इमिटेशन ज्वेलरीत मीना, स्टोन पेस्टिंगसाठी अनुभवी मुलगी पाहिजे. **9819785602** {NC253209}

पाहिजेत बेंच फिटर आणि टर्नर अंधेरी (पूर्व) आणि वसई (पूर्व) दूरध्वनी-**9920331622 / 02226874914** saimplmumbai@gmail.com {NC253279}

इलेक्ट्रीशियन(**18000/-**) तसेच **CCTV** टेक्नीशियन(**20,000/-**) पाहिजेत. बोरिवली-कांदिवलीसाठी-**9920653049** {NC253275}

## पाहिजेत

शिंपोली येथे दुकानसाठी डिलीव्हरी बॉय पाहिजे. संपर्क फडणीस -**9930604070** {NC253276}

डोंबिवली (पूर्व) MIDC मध्ये रेडीमेंट गारमेंन्ट्स फॅक्टरीमध्ये फॉर्मल/पार्टीवेअर शर्ट बनविण्यासाठी कारागीर व हेल्पर आणि गारमेंन्ट्स शर्टचे बॉक्स बनविण्यासाठी महिला/पुरुष पाहिजे संपर्क- **9819830444 / 8369298344** {NC253278}

प्रिंटिंग प्रेससाठी आवश्यक आहे (कल्याण, वेस्ट)- सेंट्रल लाईनला राहाणारे- १) हेडलबर्ग SM ऑफसेट प्रिंटर आणि बॉयलर २) लॅमिनेशन मशीन ऑपरेटर ३) पंचिंग मशीन ऑपरेटर ४) पॅकिंग (लेडीज वय २६ ते ४५ पर्यंत) ५) हेल्पर. फोकस, गाला नंबर सी-१, रवारिया इंडस्ट्रियल इस्टेट, भिवंडी कोण रोड, कल्याण वेस्ट **संपर्क- 7045333202 / 9821434502** {NC253281}

प्लंबर, पेंटर, इलेक्ट्रीशन (कंस्ट्रक्शन कंपनीकरिता) डायरेक्ट भरती, वय वर्ष-४५+४३, मनोज इंडस्ट्रियल इस्टेट, वडाळा (प) मुं-४०००३१- **9987953519** {NC253280}

मुंबईत हाऊसकिंपिग स्टाफ पाहिजेत. नाष्टा, लंच फ्री. ३ पाळ्यांमध्ये शिफ्ट. पगार 16000/- विश्राम **9321119463** {NC253262}

## Situation Vacant

Need Delivery boy in Santacruz West for all over Mumbai Contact :- **9987976412** {NC253180}

Required Trackon Courier (Ghatkopar) Delivery Boy - **9833388915 / 9819551782** {NC253277}

# आजचे राशी भविष्य

गुरुवार
दि. ४ डिसेंबर
२०२५

ज्योतिष पंडीत
अर्चना तारू

| | |
|---|---|
| **मेष** | आहार व बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक मतभेद टाळण्यासाठी प्रयत्न करावे. नियोजित कामांमध्ये अडथळे आले तरी पूर्ण करण्यात यश येईल. |
| **वृषभ** | नवीन कल्पना प्रत्यक्षात राबवण्यात यश येईल. मनाची जिद्द, आत्मविश्वास चांगला राहील. आर्थिक गुंतवणूक करताना मात्र सावधगिरी बाळगा. |
| **मिथुन** | मानसिकता स्थिर ठेवून निर्णय घ्या. मोठे आर्थिक निर्णय पुढे ढकला. कार्यक्षेत्रामध्ये हितशत्रूंवर मात करण्यासाठी आत्मविश्वास व धडाडी दाखवावी लागेल. |
| **कर्क** | आर्थिक लाभाचे प्रमाण वाढेल. रागावर नियंत्रण ठेवल्यास मनासारख्या गोष्टी घडवून आणाल. कुटुंब व प्रिय व्यक्तीबरोबर आनंदात वेळ घालवाल. |
| **सिंह** | परदेशसंबंधित कार्यक्षेत्रातील व्यक्तींना नवीन संधी मिळतील. मानसिक उत्साह व चिकाटीने नियोजित कामे पूर्ण करा. चुकीच्या व्यक्तींपासून सावध राहा. |
| **कन्या** | ओळखीतून नवीन संधीचा लाभ होईल. नवीन तंत्रज्ञानाचा आवर्जून वापर करा. केलेल्या कामाचे, अडकलेले पैसे वसूल करू शकाल. |
| **तूळ** | कामामधील अडथळे पार करण्यासाठी योग्य नियोजन करा. सहकारी वर्गाची मदत मिळू शकेल. मनाचे आरोग्य सांभाळावे. आर्थिक बाजू उंचावेल. |
| **वृश्चिक** | तुमची क्षमता सिद्ध झाल्यामुळे आत्मविश्वास वाढेल. मित्र, सहकारी वर्ग यांच्यावर अवलंबून राहू नका. कुटुंबासह धार्मिक यात्रा कराल. |
| **धनु** | मनामध्ये बंडखोर वृत्ती वाढेल त्यावर नियंत्रण ठेवा. सरकारी योजनांचा फायदा घेऊ शकाल. आरोग्याच्या तक्रारी दुर्लक्षित करणे योग्य ठरणार नाही. |
| **मकर** | जोडीदाराचे अपेक्षित सहकार्य मिळेल. नोकरी धंद्यात नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाबी तपासा. योग्य तिथेच आक्रमकता दाखवा. |
| **कुंभ** | मनामधील शंका-कुशंका निर्णय घेण्यात त्रासदायक ठरतील. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्या. घरगुती व्यवसायात यश मिळेल. |
| **मीन** | कलाकार, खेळाडूंसाठी नवीन संधी उपलब्ध होईल. मनाची जिद्द नियोजित कामे पूर्ण करण्यासाठी उपयोगी पडेल. अचानक धनलाभ होऊ शकतो. |

# आगीत १०० पेक्षा अधिक वृक्ष नष्ट रेल्वे विरोधात गुन्हा दाखल

वसई

**मार्च** महिन्यात विरारच्या रेल्वे कारशेडला लागलेल्या आगीत १०० पेक्षा अधिक वृक्ष जळून नष्ट झाले होते. ही आग रेल्वेने लावून बेकायदेशीररित्या वृक्ष कापल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे महापालिकेच्या तक्रारीवरून रेल्वे प्रशासनाविरोधात नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विरार पश्चिमेला पश्चिम रेल्वेचे ई.एम.यू कारशेड आहे. ७ मार्च २०२५ रोजी रेल्वेने या जागेला आग लावली होती. या आगीमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास झाला होता. आंबा, नारळ, बाभूळ, बोर, बदाम अशी जवळपास १०० झाडे जळून नष्ट झाली होती. त्यापैकी काही झाडे ही अक्षरशः कटरच्या सहाय्याने कापून नंतर ती जाळून टाकण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येत होते. या आगीमध्ये अनेक विद्युत उपकरणे, विजेच्या तारा, सी.सी.टी.व्ही. केबल वायर, विजेचे पोल इत्यादी साहित्य जळून खाक झाले होते.

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- मॅनेजर, 'नवाकाळ'

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 49 • सोडत दिनांक 03/12/2025

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AK-04 : 1795 | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 1795 | श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 7435 | चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक; कोमल एजन्सी - औरंगाबाद; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1041 | 4327 | 4969 | 5353 | 5693 | 6159 | 7332 | 7452 | 8693 | 8852 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0443 | 2093 | 2672 | 3286 | 3546 | 4368 | 5363 | 5397 | 5507 | 6558 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0713 | 1968 | 2613 | 2988 | 3238 | 3638 | 5797 | 8389 | 8885 | 9521 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1005 | 1216 | 3740 | 4380 | 4462 | 5917 | 7415 | 8801 | 9622 | 9932 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1365 | 2062 | 2953 | 3630 | 4422 | 5139 | 5926 | 6508 | 7214 | 7876 | 8754 | 9343 |
| | | 1411 | 2072 | 2977 | 3638 | 4447 | 5152 | 5945 | 6533 | 7221 | 7915 | 8757 | 9359 |
| | | 1472 | 2122 | 2986 | 3643 | 4449 | 5195 | 5953 | 6539 | 7240 | 7934 | 8785 | 9375 |
| | | 1494 | 2131 | 3025 | 3646 | 4450 | 5196 | 5954 | 6570 | 7271 | 7943 | 8788 | 9417 |
| | | 1515 | 2146 | 3033 | 3671 | 4462 | 5218 | 6008 | 6605 | 7286 | 7948 | 8809 | 9430 |
| 0002 | 0700 | 1541 | 2202 | 3035 | 3692 | 4472 | 5231 | 6044 | 6634 | 7366 | 7969 | 8827 | 9443 |
| 0010 | 0706 | 1550 | 2204 | 3037 | 3714 | 4475 | 5254 | 6056 | 6635 | 7420 | 7972 | 8840 | 9473 |
| 0014 | 0710 | 1551 | 2214 | 3047 | 3720 | 4477 | 5263 | 6064 | 6637 | 7435 | 7979 | 8847 | 9488 |
| 0017 | 0727 | 1571 | 2223 | 3074 | 3735 | 4493 | 5265 | 6127 | 6639 | 7455 | 8020 | 8870 | 9495 |
| 0019 | 0735 | 1588 | 2226 | 3090 | 3808 | 4499 | 5295 | 6128 | 6654 | 7456 | 8025 | 8879 | 9509 |
| 0023 | 0746 | 1612 | 2227 | 3110 | 3823 | 4505 | 5313 | 6131 | 6655 | 7470 | 8036 | 8882 | 9531 |
| 0026 | 0770 | 1621 | 2255 | 3117 | 3839 | 4509 | 5325 | 6135 | 6674 | 7521 | 8049 | 8888 | 9557 |
| 0029 | 0774 | 1714 | 2258 | 3130 | 3842 | 4521 | 5335 | 6148 | 6680 | 7563 | 8056 | 8915 | 9579 |
| 0033 | 0859 | 1721 | 2280 | 3177 | 3877 | 4535 | 5355 | 6150 | 6690 | 7575 | 8060 | 8965 | 9596 |
| 0047 | 0870 | 1722 | 2302 | 3199 | 3893 | 4570 | 5356 | 6164 | 6695 | 7627 | 8089 | 8968 | 9598 |
| 0055 | 0876 | 1762 | 2332 | 3215 | 3910 | 4589 | 5365 | 6176 | 6701 | 7642 | 8092 | 8975 | 9599 |
| 0090 | 0877 | 1782 | 2336 | 3223 | 3936 | 4624 | 5408 | 6191 | 6708 | 7646 | 8148 | 8978 | 9601 |
| 0091 | 0880 | 1819 | 2342 | 3247 | 3941 | 4662 | 5431 | 6203 | 6728 | 7658 | 8168 | 9005 | 9609 |
| 0101 | 0929 | 1836 | 2397 | 3286 | 3949 | 4694 | 5459 | 6206 | 6737 | 7665 | 8188 | 9009 | 9622 |
| 0120 | 0930 | 1843 | 2410 | 3304 | 3958 | 4704 | 5485 | 6228 | 6739 | 7667 | 8260 | 9015 | 9669 |
| 0133 | 0946 | 1881 | 2441 | 3308 | 3997 | 4734 | 5507 | 6262 | 6752 | 7675 | 8269 | 9019 | 9694 |
| 0164 | 0998 | 1915 | 2443 | 3317 | 4013 | 4771 | 5517 | 6288 | 6791 | 7677 | 8279 | 9069 | 9696 |
| 0180 | 1016 | 1925 | 2452 | 3320 | 4029 | 4774 | 5523 | 6316 | 6836 | 7690 | 8283 | 9075 | 9705 |
| 0200 | 1046 | 1927 | 2453 | 3336 | 4040 | 4784 | 5530 | 6326 | 6867 | 7697 | 8287 | 9077 | 9729 |
| 0307 | 1111 | 1930 | 2459 | 3346 | 4070 | 4804 | 5538 | 6334 | 6879 | 7708 | 8304 | 9081 | 9802 |
| 0308 | 1116 | 1931 | 2514 | 3365 | 4117 | 4824 | 5559 | 6350 | 6915 | 7722 | 8322 | 9102 | 9803 |
| 0317 | 1139 | 1943 | 2571 | 3368 | 4144 | 4889 | 5584 | 6354 | 6982 | 7732 | 8348 | 9121 | 9826 |
| 0339 | 1140 | 1952 | 2624 | 3377 | 4152 | 4904 | 5593 | 6355 | 7031 | 7735 | 8371 | 9133 | 9839 |
| 0433 | 1147 | 1958 | 2626 | 3392 | 4173 | 4909 | 5611 | 6356 | 7063 | 7757 | 8384 | 9135 | 9912 |
| 0439 | 1150 | 1976 | 2628 | 3419 | 4204 | 4932 | 5658 | 6360 | 7079 | 7766 | 8386 | 9151 | 9916 |
| 0441 | 1161 | 2002 | 2648 | 3430 | 4241 | 4936 | 5677 | 6362 | 7109 | 7776 | 8428 | 9160 | 9920 |
| 0452 | 1210 | 2013 | 2652 | 3461 | 4289 | 4948 | 5706 | 6370 | 7121 | 7795 | 8438 | 9169 | 9931 |
| 0473 | 1213 | 2020 | 2708 | 3483 | 4294 | 4982 | 5769 | 6395 | 7125 | 7799 | 8466 | 9174 | 9938 |
| 0481 | 1214 | 2026 | 2721 | 3488 | 4295 | 4984 | 5792 | 6399 | 7127 | 7806 | 8548 | 9194 | 9954 |
| 0537 | 1231 | 2031 | 2754 | 3507 | 4317 | 4994 | 5806 | 6433 | 7140 | 7807 | 8551 | 9205 | 9957 |
| 0565 | 1251 | 2040 | 2815 | 3513 | 4347 | 5055 | 5807 | 6443 | 7164 | 7826 | 8555 | 9219 | 9976 |
| 0567 | 1282 | 2052 | 2832 | 3525 | 4349 | 5089 | 5835 | 6467 | 7170 | 7831 | 8571 | 9232 | 9980 |
| 0603 | 1315 | 2053 | 2888 | 3543 | 4378 | 5090 | 5848 | 6474 | 7181 | 7833 | 8625 | 9256 | 9986 |
| 0693 | 1348 | 2054 | 2937 | 3616 | 4388 | 5107 | 5850 | 6482 | 7187 | 7863 | 8693 | 9296 | 9992 |
| 0694 | 1358 | 2061 | 2949 | 3623 | 4394 | 5115 | 5905 | 6483 | 7194 | 7870 | 8734 | 9328 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ०४/१२/२०२५

| | | |
|---|---|---|
| ९ | ६ | ७ |
| १४ | ६४ | ७३ |
| १९ | ६९ | ७८ |
| १२८ | १२३ | १६० |
| ४७० | २६८ | ३५९ |

**वंदना मिश्र म्हणजेच पूर्वाश्रमीच्या सुशीलाबाई लोटलीकर मराठी, गुजराती आणि मारवाडी रंगभूमीवरचे १९४० च्या सुमारास एक नावाजलेले व्यक्तिमत्व. त्यांच्या आई लक्ष्मीबाई लोटलीकर यांचे लग्न १९१८ ला झाले होते. सुशीलाबाईंना दोन मोठी भावंडे होती. त्यांच्या वडिलांचा मृत्यू त्या अडीच वर्षांच्या असताना न्युमोनियाने अचानक झाला. आई मुलांना घेऊन मुंबईतून रत्नागिरीमधील आडिवरे गावी त्यांच्या सासरी गेली पण थोड्याच काळात त्यांना कळून चुकले की त्यांना एका विधवेसारखे जगावे लागेल. त्यांच्या आईला हे काही पटले नाही.**



# ज्येष्ठ अभिनेत्री आणि 'मी...मिठाची बाहुली' या आत्मचरित्राने साहित्यविश्वात महत्त्वाचे स्थान मिळवलेल्या लेखिका

# वंदना मिश्र

संजीव वेलणकर, पुणे

त्या मुलांना घेऊन परत मुंबईत आल्या. १९३० साली एका विधवेने तीन मुलांसह नोकरी करून मुंबई राहणे हा एक धाडसी आणि थोडासा बंडखोरी विचार होता. त्यांनी पुढे नर्सिंगचे शिक्षण घेऊन हॉस्पिटलमध्ये नोकरी करायला सुरुवात केली. तिथून त्यांच्या घराची आर्थिक परीस्थिती बदलू लागली. शाळेत असताना सुशीलाबाईनी गाणे शिकण्यास सुरुवात केली. त्याकाळी मराठी ब्राम्हण घरातील मुलीने संगीत शिकावे असे वातावरण नव्हते. पुढे त्यांचा प्रवेश मराठी रंगभूमीवर झाला. काही काळाने आईच्या अपघातामुळे त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर काम करण्यास सुरवात केली. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी कौटुंबिक जबाबदारी पेलण्यासाठी त्यांना रंगभूमीवर प्रवेश घ्यावा लागला. त्यावेळी मामा वरेरकरांच्या 'सारस्वत' या गाजलेल्या प्रायोगिक नाटकात महत्वाची भूमिका बजावली होती. पुढे पार्श्वनाथ आळतेकर यांच्यासारख्या तितक्याच तालेवार आणि प्रयोगशील अशा दिग्दर्शक, कलावंताच्या मार्गदर्शनाखाली त्यांना अभिनयकलेचे धडे गिरवता आले. गुजराती, राजस्थानी अशा अन्य भाषिक कलाकृतींच्या रंगमंचीय अविष्कारात त्यांचे त्यावेळी सक्रिय योगदान असे. गायक अभिनेत्री या नात्याने ज्योत्स्ना



भोळे, शोभा गुर्टू अशा अनेकींशी त्यांचा वैयक्तिक स्नेहसंबंध होता. शोभा गुर्टू यांची आठवण त्यांना शेवटच्या क्षणापर्यंत व्याकुळ करीत असे. त्यांनी विविध दिग्दर्शक आणि कलावंतांसोबत काम केले. गुजराती, राजस्थानी नाटकांमध्येही त्यांनी काम केले. वयाच्या २० व्या वर्षी त्यांचे लग्न हिंदी लेखक जयदेव मिश्र यांच्याशी झाले. त्याकाळी एक तर नाटक सिनेमामध्ये काम करणाऱ्या मुलीला लग्नासाठी मुलगा मिळणे कठीण अश्या परिस्थितीत समोरून चालत आलेले स्थळ आंतरजातीय असले तरी सारासार विचार करून त्यांच्या आईने त्यांना लग्न करायचा सल्ला दिला.

लग्नानंतर त्यांनी रंगभूमीला विश्राम दिला आणि घर, संसार आणि मुले यात रममाण झाल्या. लग्नानंतर २२ वर्षांनी परत व्यावसायिक रंगभूमीवर त्यांचे पुनरागमन झाले. वंदना मिश्र यांचे चिरंजीव म्हणजे ज्येष्ठ पत्रकार अंबरीश मिश्र. 'मी.. मिठाची बाहुली' अशा अनवट शीर्षकाच्या परंतु कमालीच्या रसरशीत अशा एकाच पुस्तकाने मराठी साहित्यातील आत्मचरित्र दालनात वंदना मिश्र यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले होते.

त्यांनी 'मी मिठाची बाहुली'मधून आपला गुजराती, राजस्थानी रंगभूमीवरचा प्रवास, स्वातंत्र्यपूर्व भारतातील मुंबई, तेव्हाचे समाजजीवन, राजकीय चळवळी, फाळणीचे पडसाद आदी विषयांचा वेध घेतला आहे.

२०१४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या आत्मचरित्राचा इंग्रजी अनुवाद विख्यात लेखक जेरी पिंटो यांनी केलेल्या या पुस्तकाच्या 'आय.. द सॉल्ट डॉल' या अनुवादाचा तर राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला. 'मरताना का असेना झाले की नाही मी लेखिका', असे मिश्किलपणे त्या म्हणत. आपला गुजराती, राजस्थानी रंगभूमीवरचा प्रवासानुभव, त्या काळातील.. म्हणजे स्वातंत्र्यपूर्व भारतातील मुंबई, या शहराचे तत्कालीन समाजजीवन, चैतन्यदायी राजकीय चळवळी, फाळणीचे पडसाद असा मोठा कालपट वंदनाजींनी 'मी.. मिठाची बाहुली' या पुस्तकात मोठ्या सराईतपणे चितारला आहे.

२०१४ साली प्रकाशित झालेल्या या आत्मचरित्राचे रसिक आणि अभ्यासक अशा दोघांकडूनही मोठ्या उत्साहात स्वागत झाले. वंदना मिश्र यांचे २५ डिसेंबर २०१६ रोजी निधन झाले.

# सांगलीत मतदान वाढीचा आरोप! शरद पवार गटाचे ठिय्या आंदोलन

सांगली

## स्ट्राँग रूम सुरक्षेवर प्रश्न

**आष्टा** नगरपरिषदेतील मतदानाच्या स्ट्राँग रुमबाहेर आज राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल मतदान पार पडले. त्यानंतर ईव्हीएम मशीन स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या. मात्र शरद पवार गट प्रणित शहर विकास आघाडीने मतदानाचा टक्का वाढवल्याचा आरोप केला. प्रशासनाने रात्री जाहीर केलेल्या आकडेवारीत आणि सकाळी ऑनलाईन जाहीर झालेल्या आकडेवारीत जवळपास दोन हजार मतांची वाढ झाल्याचा त्यांचा दावा आहे .

कार्यकर्त्यांनी सांगितले की, काल झालेल्या निवडणुकीच्या संध्याकाळच्या अहवालात वॉर्ड क्रमांक ३ मध्ये १३११ एकूण मतदार आहेत. तर अहवालात त्यांनी एकूण ४ हजार ७७ मतदार दाखवले आहेत. त्यात एकूण मतदान ३१०९ झाल्याचे सांगितले. वॉर्ड क्रमांक ९ मध्ये ७०८ मतदान झाल्याची नोंद आहे. या गोंधळाबाबत मी तहसीलदारांना विचारायला आलो होतो. त्यावेळी त्यांनी हे मी दिलेले नाही, मला माहीत नाही असे सांगितले. त्यानंतर गडबड सुरु झाली. ईव्हीएम स्ट्राँग रुम होती म्हणून पोलिसांनी मला हात धरून खाली आणले. याठिकाणी सीसीटीव्ही बंद होता, आमच्यासमोर एकाने येऊन तो सुरु केला, जॅमर नाहीत, कडक सुरक्षा तैनात नाही. आष्टा शहरातील मतदान ३० हजार ५७४ आहे. काल त्यांनी पोर्टलवर अपलोड केलेली संख्या ३३ हजार ३२८ आहे. त्यांनी २४ हजार ९१३ दाखवले तर खरे मतदान २२ हजार ८६४ झाले आहे. म्हणजे २ हजार ९०० मतदान वाढीव आहे. जयंत पाटील यांनीही आष्टीत येऊन आंदोलकांची भेट घेतली.

याशिवाय गोंदियातील सालेकसा नगरपंचायतीत गोंधळ निर्माण झाला.

## गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता • सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 03/12/2025

| | | |
|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-08 : 6746 | महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3424 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0820 |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0392 | 1013 | 2008 | 2097 | 3357 | 3978 | 8021 | 8300 | 9793 | 9889 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1042 | 1538 | 3811 | 6100 | 6711 | 7530 | 8796 | 8892 | 9869 | 9952 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0680 | 0899 | 1601 | 1928 | 3964 | 5469 | 5841 | 6458 | 7740 | 7980 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1333 | 2352 | 3365 | 4042 | 5255 | 6136 | 6993 | 8284 | 9228 |
| | | 1345 | 2405 | 3381 | 4088 | 5270 | 6168 | 7157 | 8307 | 9243 |
| | | 1416 | 2449 | 3493 | 4158 | 5457 | 6181 | 7172 | 8310 | 9259 |
| 0009 | 0720 | 1556 | 2487 | 3498 | 4198 | 5485 | 6264 | 7296 | 8345 | 9274 |
| 0033 | 0746 | 1615 | 2502 | 3505 | 4258 | 5535 | 6286 | 7448 | 8397 | 9319 |
| 0093 | 0785 | 1710 | 2581 | 3535 | 4358 | 5547 | 6354 | 7471 | 8486 | 9351 |
| 0095 | 0807 | 1735 | 2628 | 3573 | 4403 | 5550 | 6361 | 7474 | 8539 | 9387 |
| 0129 | 0842 | 1763 | 2661 | 3579 | 4427 | 5553 | 6362 | 7571 | 8546 | 9439 |
| 0131 | 0918 | 1783 | 2676 | 3633 | 4444 | 5561 | 6463 | 7705 | 8622 | 9444 |
| 0134 | 1026 | 1832 | 2802 | 3637 | 4474 | 5565 | 6493 | 7771 | 8681 | 9549 |
| 0148 | 1041 | 2017 | 2865 | 3729 | 4534 | 5639 | 6615 | 7782 | 8748 | 9554 |
| 0212 | 1119 | 2027 | 2892 | 3734 | 4794 | 5721 | 6630 | 7783 | 8785 | 9721 |
| 0309 | 1169 | 2168 | 2924 | 3765 | 4872 | 5757 | 6666 | 7791 | 8788 | 9739 |
| 0334 | 1170 | 2219 | 2982 | 3774 | 4891 | 5758 | 6683 | 7821 | 8836 | 9819 |
| 0339 | 1176 | 2222 | 2992 | 3825 | 5000 | 5769 | 6734 | 7874 | 8856 | 9839 |
| 0427 | 1198 | 2229 | 3113 | 3833 | 5056 | 5772 | 6759 | 8003 | 8889 | 9866 |
| 0595 | 1267 | 2242 | 3134 | 3863 | 5070 | 5850 | 6781 | 8060 | 8984 | 9874 |
| 0665 | 1294 | 2250 | 3135 | 3936 | 5111 | 5895 | 6860 | 8085 | 9050 | 9892 |
| 0685 | 1315 | 2262 | 3138 | 3963 | 5115 | 5958 | 6866 | 8088 | 9200 | 9949 |
| 0690 | 1317 | 2272 | 3168 | 3996 | 5151 | 6066 | 6926 | 8097 | 9220 | 9956 |
| 0718 | 1323 | 2312 | 3274 | 4013 | 5231 | 6067 | 6973 | 8244 | 9221 | 9960 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता • सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 03/12/2025

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SV-03 : 9720 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1348 | 2676 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 2711 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 5153 | 5741 | 6244 | 8106 | 8137 | 8748 | 8971 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0243 | 2210 | 2886 | 3193 | 5315 | 7477 | 7726 | 8095 | 8257 | 9148 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0148 | 0456 | 0495 | 1108 | 3258 | 6421 | 7421 | 8492 | 8599 | 9219 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1545 | 2284 | 3304 | 3908 | 5382 | 6740 | 8090 | 8888 |
| | 1566 | 2296 | 3318 | 3974 | 5514 | 6751 | 8108 | 8909 |
| 0004 | 1656 | 2311 | 3319 | 4014 | 5755 | 7012 | 8158 | 8974 |
| 0422 | 1657 | 2328 | 3335 | 4425 | 5794 | 7073 | 8190 | 9077 |
| 0864 | 1977 | 2423 | 3353 | 5035 | 5882 | 7097 | 8278 | 9401 |
| 0905 | 1986 | 2439 | 3364 | 5158 | 5893 | 7155 | 8285 | 9475 |
| 1084 | 2112 | 2511 | 3517 | 5191 | 6052 | 7182 | 8430 | 9555 |
| 1138 | 2126 | 2825 | 3523 | 5219 | 6146 | 7231 | 8489 | 9589 |
| 1144 | 2175 | 2996 | 3835 | 5223 | 6252 | 7720 | 8648 | 9607 |
| 1175 | 2182 | 3049 | 3838 | 5226 | 6522 | 7724 | 8655 | 9753 |
| 1255 | 2232 | 3071 | 3857 | 5239 | 6606 | 7782 | 8767 | 9759 |
| 1491 | 2243 | 3083 | 3883 | 5324 | 6715 | 7928 | 8790 | 9852 |
| 1514 | 2256 | 3137 | 3898 | 5363 | 6716 | 8008 | 8803 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# वांद्र्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव शिल्पाची दुरावस्था

मुंबई

**वांद्रे** (पूर्व) उपनगर जिल्हा अधिकारी इमारती प्रवेशद्वाराच्या लगत असलेल्या 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या निमित्ताने उभारण्यात आलेल्या शिल्पाची दुरावस्था झाली आहे. इतकेच नव्हे तर काही वस्तुंची धूळधाण झाली आहे. या प्रकारामुळे स्थानिकांत संताप व्यक्त होत आहे.

१५ ऑगस्ट २०२१ रोजी भारत देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली होती. याचे औचित्य साधून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या संकल्पनेच्या माध्यमातून म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने उपनगर जिल्हा अधिकारी प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या बाहेरील बाजूस तुतारी व नगारे वाजविणारे मराठमोळे मावळे यांचे भव्य असे शिल्प उभारले आहे.

यावर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, अशी अक्षरे असलेली पाटी लावण्यात आली आहे. मात्र मोठा गाजावाजा करून उभारण्यात आलेल्या शिल्पाकडे संबंधितांचे दुर्लक्ष झाल्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून शिल्प संपूर्ण काळोखात आहे. शेजारी झाडेझुडपे वाढल्यामुळे मावळे झाकले गेले आहेत. माती धुळीने शिल्प माखले आहेत. पाटीसमोरील अक्षरे तुटली आहेत. या शिल्पाच्या अवस्थेला जबाबदार कोण? असा सवाल स्थानिक विचारत आहेत.

## महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता • सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 03/12/2025

| | |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-02 : 6799 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1676 | 2175 | 2891 | 3303 (चंदन लॉटरी एजन्सिज, अमरावती) | 4677 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 5733 | 6047 | 6576 | 7306 | 7719 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0039 | 0433 | 2285 | 4197 | 5287 | 5703 | 6627 | 8116 | 8149 | 9044 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1011 | 1639 | 2371 | 3074 | 4878 | 5260 | 6259 | 8705 | 9338 | 9502 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0821 | 3454 | 3605 | 4246 | 4967 | 6131 | 6673 | 6790 | 8701 | 8863 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1200 | 2072 | 3261 | 4387 | 4866 | 5654 | 6639 | 7434 | 8209 | 8990 |
| | | 1239 | 2093 | 3291 | 4404 | 4876 | 5715 | 6644 | 7460 | 8224 | 9099 |
| 0005 | 0452 | 1277 | 2172 | 3304 | 4410 | 4914 | 5734 | 6663 | 7497 | 8225 | 9249 |
| 0009 | 0458 | 1339 | 2221 | 3319 | 4412 | 4994 | 5753 | 6667 | 7524 | 8278 | 9305 |
| 0018 | 0495 | 1455 | 2233 | 3337 | 4444 | 5004 | 5754 | 6716 | 7609 | 8438 | 9307 |
| 0032 | 0506 | 1517 | 2257 | 3338 | 4463 | 5008 | 5790 | 6756 | 7706 | 8500 | 9314 |
| 0040 | 0601 | 1554 | 2307 | 3339 | 4475 | 5153 | 5855 | 6765 | 7712 | 8589 | 9379 |
| 0047 | 0637 | 1571 | 2340 | 3351 | 4477 | 5156 | 5925 | 6896 | 7714 | 8591 | 9390 |
| 0058 | 0818 | 1595 | 2380 | 3357 | 4486 | 5254 | 5958 | 6908 | 7718 | 8617 | 9479 |
| 0068 | 0881 | 1622 | 2406 | 3473 | 4497 | 5257 | 5982 | 6962 | 7758 | 8649 | 9491 |
| 0077 | 0893 | 1687 | 2421 | 3486 | 4501 | 5322 | 6051 | 6991 | 7763 | 8744 | 9493 |
| 0092 | 0894 | 1712 | 2506 | 3493 | 4524 | 5324 | 6063 | 7043 | 7779 | 8778 | 9529 |
| 0104 | 0974 | 1721 | 2508 | 3586 | 4545 | 5325 | 6113 | 7063 | 7782 | 8842 | 9597 |
| 0150 | 0993 | 1760 | 2521 | 3682 | 4552 | 5461 | 6171 | 7087 | 7795 | 8844 | 9599 |
| 0175 | 1071 | 1792 | 2527 | 3743 | 4572 | 5475 | 6175 | 7089 | 7796 | 8881 | 9690 |
| 0181 | 1085 | 1818 | 2566 | 3849 | 4594 | 5507 | 6222 | 7144 | 7900 | 8884 | 9709 |
| 0205 | 1115 | 1835 | 2909 | 3882 | 4639 | 5513 | 6278 | 7187 | 7910 | 8888 | 9821 |
| 0226 | 1130 | 1895 | 2952 | 4008 | 4658 | 5515 | 6286 | 7212 | 7969 | 8892 | 9839 |
| 0249 | 1157 | 1931 | 3037 | 4016 | 4757 | 5557 | 6357 | 7357 | 7998 | 8903 | 9845 |
| 0253 | 1169 | 1965 | 3088 | 4045 | 4784 | 5603 | 6446 | 7361 | 8028 | 8958 | 9889 |
| 0351 | 1172 | 1993 | 3180 | 4088 | 4837 | 5631 | 6623 | 7362 | 8068 | 8967 | 9894 |
| 0354 | 1194 | 2031 | 3225 | 4319 | 4844 | 5648 | 6638 | 7364 | 8187 | 8981 | 9979 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# देशातील जनगणना दोन टप्प्यात होणार

**घरांची गणनाही डिजिटल**

■ नवी दिल्ली

**देशातील** जनगणना दोन टप्प्यात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पहिला टप्पा एप्रिल ते सप्टेंबर २०२६ पर्यंत चालेल, तर दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये असेल,असे गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत स्पष्ट केले.

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या एका प्रश्नाला लेखी उत्तर देताना गृह राज्यमंत्री नित्यानंद राय म्हणाले की, पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि घरांची गणना केली जाईल, तर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना केली जाईल. लोकसंख्या गणना फेब्रुवारी २०२७ मध्ये केली जाईल.त्याची संदर्भ तारीख १ मार्च २०२७ आहे. जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि लडाख या बर्फाच्छादित भागात जनगणना सप्टेंबर २०२६ मध्ये केली जाईल, ज्याची संदर्भ तारीख १ ऑक्टोबर २०२६ आहे.

# लालू यादवांचा नवा बंगला भाजपाची संतप्त टीका

■ पाटणा

**राष्ट्रीय** जनता दलाचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांच्या नव्या आणि आलिशान बंगल्यावरून वाद निर्माण झाला आहे. हा बंगला लालूंनी लुबाडलेल्या जमिनीवर बांधला जात आहे, अशी टीका भाजपाने केली आहे. काही दिवसांपूर्वी लालूंच्या पत्नी आणि बिहारच्या माजी मुख्यमंत्री राबडीदेवी यांना नितीश कुमार प्रशासनाने १० सर्क्युलर रोड येथील सरकारी बंगला रिकामा करण्याची नोटीस पाठवली. त्यानंतर लालू प्रसाद यांच्या या नव्या बंगल्याची चर्चा सुरू झाली. दानापूर येथील महुबागमध्ये हा आलिशान बंगला उभारण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे. भाजपाचे प्रवक्ता नीरज कुमार यांनी या आलिशान बंगल्यावरून लालू प्रसादांवर सडकून टीका केली. लुटलेल्या सरकारी जागेवर लालू बंगला बांधत आहेत.

**देश विदेश**

# होंडुरासच्या माजी राष्ट्राध्यक्षांची ट्रम्प यांच्या माफीनंतर सुटका

■ तेगुसिगाल्पा



**होंडुरासचे** माजी राष्ट्राध्यक्ष जुआन ऑर्लंडो हर्नांडिझ यांची राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी माफी दिल्याने अमेरिकेतील तुरुंगातून सुटका झाली. ड्रग्ज तस्करी आणि बंदुकीच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी ठरवल्याने त्यांना ४५ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. हर्नांडिझ यांच्या सुटकेची माहिती त्यांच्या पत्नी आना गार्सिया यांनी समाजमाध्यमावरून दिली. त्यांनी लिहिले की, जवळजवळ चार वर्षांच्या वेदना, तणाव आणि कठीण प्रसंगानंतर माझे पती आता तुरुंगातून सुटून घरी परतले आहेत. या घटनेला होंडुरासमधील राजकीय परिस्थितीची पार्श्वभूमी आहे. देशात नुकत्याच राष्ट्रपती निवडणुका पार पडल्या. डोनाल्ड ट्रम्प यांनी कंझर्व्हेटिव्ह नॅशनल पार्टीच्या उमेदवार नसरी असफुरा यांना उघड पाठिंबा दिला. असफुरा यांचा सामना उदारमतवादी साल्वाडोर नसरल्ला यांच्याशी आहे. त्यामुळे हर्नांडिझ यांच्या सुटकेची वेळ आणि ट्रम्प यांचा राजकीय प्रभाव यावर चर्चेला उधाण आले. जुआन ऑर्लंडो हर्नांडिझ यांनी २०१४ ते २०२२ या कालावधीत होंडुरासचे राष्ट्राध्यक्ष म्हणून कारभार केला होता. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अमेरिकेसोबत भागीदारी ठेवली होती. मात्र पद सोडल्यानंतर लगेचच त्यांच्यावर ड्रग्ज तस्करीत सहभागी असल्याचा आरोप झाला. त्यानंतर त्यांना अमेरिकेत प्रत्यार्पित करण्यात आले. गेल्या वर्षी जूनमध्ये त्यांना शिक्षा दिली होती.

# गोव्यातील मनीलॉँड्रिंग प्रकरण! १२६८ कोटींची मालमत्ता जप्त

**ईडीच्या पणजी विभागाची कारवाई**

■ पणजी

**गोव्यातील** बहुचर्चित बेकायदा जमिनी हडप प्रकरणात ईडीच्या पणजी विभागाने मोठी कारवाई केली आहे. तब्बल १,२६८ कोटी ६३ लाख रुपये किमतीच्या १९ स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या प्रकरणात ईडीने याआधीच १२.८५ कोटींच्या मौल्यवान वस्तू आणि बँक खाती गोठवली आहेत. हणजूण,आसगाव आणि उसकई या भागांमध्ये पाच लाख चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या या मालमत्ता आहेत. मनी लॉँड्रिंग प्रतिबंधक कायद्यानुसार या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. ही जमीन खोटी व बनावट कागदपत्रे तयार करून बेकायदेशीरपणे बळकावल्याचा आरोप आहे.



या घोटाळ्याचे सूत्रधार म्हणून समोर आलेल्या उद्योगपती आणि त्याच्या सहकाऱ्यांनी प्रमाणपत्रे, ताबापत्रे, नकाशे, खरेदी-विक्री आणि भेटनामा अशा विविध प्रकारची कागदपत्रे खोटी बनवून अनेक मालमत्ता गैरमार्गाने आपल्या ताब्यात घेतल्याचे ईडीच्या तपासात आढळले आहे. अशा मालमत्ता शोधून त्यांच्यावर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

# भारतावर अमेरिकेचा दबाव मात्र रशिया हस्तक्षेप करणार नाही

■ नवी दिल्ली

**रशियाचे** राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन दोन दिवसीय भारत दौऱ्यावर येणार आहेत. पुतिनच्या भेटीची तयारी सुरू आहे.मात्र त्यापूर्वी क्रेमलिनचे प्रतिनिधी दिमित्री पेस्कोव्ह यांनी स्पष्ट केले की, भारतावर अमेरिकेच्या रशियन तेल खरेदीबाबत दबाव आहे पण रशिया या द्विपक्षीय मुद्यात हस्तक्षेप करणार नाही. दिमित्री पेस्कोव्ह म्हणाले की, आम्हाला माहीत आहे की, भारतावर दबाव आहे. परंतु आम्ही अमेरिका आणि भारत यांच्यातील राजकीय संबंधांमध्ये हस्तक्षेप करणार नाही. भारत आपल्या राष्ट्रीय हिताबाबत स्वतंत्र आहे. त्यांच्या परराष्ट्र धोरणाचे आम्ही कौतुक करतो. रशिया असे मार्ग शोधत आहे ज्यामुळे तो तेल खरेदीदारांना सहजपणे तेल विकू शकेल. पुतीन यांच्या दौऱ्यादरम्यान भारत आणि रशिया यांच्यात व्यापार, ऊर्जा, संरक्षण आणि धोरणात्मक सहकार्य या विषयांवर चर्चा होणार आहे. पुतीन ४-५ डिसेंबर २०२५ रोजी भारत दौऱ्यावर येतील.

# चीनचा धोका पण व्यापार फायद्याचा ब्रिटनच्या स्टारमर यांचा दावा

■ लंडन

**ब्रिटनचे** पंतप्रधान कीअर स्टारमर यांनी आज चीनबाबत स्पष्ट भूमिका मांडली. चीनकडून राष्ट्रीय सुरक्षेला धोका आहे. मात्र दोन्ही देशांमध्ये व्यावसायिक संबंध अधिक मजबूत करणे हे ब्रिटनच्या आर्थिक हितासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे म्हटले. पंतप्रधान कीअर स्टारमर म्हणाले की, ब्रिटनचे चीनबाबतचे धोरण अनेक वर्षे कधी कडक तर कधी नरम राहिले आहे.परंतु हा गोंधळ संपवून आता संतुलित धोरण राबवण्याची गरज आहे.एखाद्या देशासोबत व्यापार संबंध ठेवून देशाची सुरक्षा मजबूत ठेवणे एकाच वेळी शक्य आहे. त्यासाठी स्पष्ट धोरण आवश्यक आहेत.ब्रिटन सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करणार नाही. पण ज्या क्षेत्रात धोका नाही त्या क्षेत्रात ब्रिटिश व्यवसायांनी चीनसोबत अधिक संधी शोधाव्यात.

# मुख्याध्यापकांच्या अर्जित रजा रोखीकरणाबाबत कोर्टाचे आदेश

**२४ डिसेंबरपूर्वी लेखी खुलासा करावा!**

■ छत्रपती संभाजीनगर

**राज्यातील** खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या अर्जित रजा रोखीकरणाबाबत राज्य शासनाला लेखी खुलासा करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने राज्य सरकारला दिले आहेत. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य खाजगी प्राथमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेने खंडपीठात रिट याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर खंडपीठाने हे निर्देश दिले आहेत.

मुख्याध्यापकांना याआधी दीर्घ सुट्टीत काम केल्याबद्दल एका वर्षात १५ दिवसांची विशेष अर्जित रजा मंजूर केली जात होती. परंतु अलीकडेच शिक्षण संचालनालयाने काढलेल्या पत्रानुसार हे रजा रोखीकरण अचानक थांबविण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेल्या व सेवानिवृत्त होणाऱ्या मुख्याध्यापकांवर हा मोठा अन्याय असल्याचे म्हणत संघटनेने या पत्राला आव्हान देऊन ते तत्काळ रद्द करण्याची मागणी रिट याचिकेद्वारे उच्च न्यायालयात केली आहे. दीर्घ सुट्टीतील कामासाठी मिळणाऱ्या विशेष अर्जित रजेचे रोखीकरण लाभ पूर्ववत सुरू करण्याची मागणी मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष तुकाराम सोनवणे यांनी याचिकेत केली आहे. या याचिकेवर न्या. विभा कणकवाडी आणि न्या. हितेन वेणेगावकर यांच्यासमोर सुनावणी झाली.

# रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रण मोहिमेत ५७० मेट्रिक टन कचरा

■ मुंबई

**मुंबई** शहर व उपनगरात वायू प्रदूषण नियंत्रणाच्या अनुषंगाने महापालिकेकडून राबविण्यात आलेल्या रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रण मोहिमेत ५७० मेट्रिक टन कचरा, ९५ मेट्रिक टन टाकाऊ वस्तू व १८ टन राडारोडाचे निर्मूलन करण्यात आले. घनकचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचाऱ्यांनी ६७६ रस्त्यांची सखोल स्वच्छता केली आहे. पालिकेने २८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांच्या देखरेखीत 'रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रण मोहीम' आयोजित करण्यात आली होती. घनकचरा विभागातील कनिष्ठ पर्यवेक्षकांना नियमित स्वच्छता आणि देखभालीसाठी किमान तीन प्रमुख रस्ते किंवा मार्ग दत्तक घेण्याचा उपक्रम पालिकेकडून सुरू करण्यात आला आहे.

# तीन मुलांना विष देऊन मारण्याचा प्रयत्न पित्याची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता

■ मुंबई

**चार** वर्षांपूर्वी मानखुर्द परिसरात आपल्या पोटच्या तीन मुलांना आईस्क्रिममधून विष देऊन मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असलेल्या पित्याची अखेर सत्र न्यायालयाने सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे.या खटल्यात पोलीस सबळ पुरावे सादर करण्यात अपयशी ठरल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने या आरोपीची तुरुंगातून सुटका करण्याचे आदेश दिले. अतिरिक्त सत्र न्यायाधीश अश्विनी कस्तुरे यांच्या यांच्यापुढे या खटल्याची सुनावणी झाली. या खटल्यातील आरोपी मोहम्मद अली नौशाद अली अन्सारी याने २५ जून २०२१ रोजी सायंकाळच्या सुमारास आपली एक मुलगी आणि दोन मुलांना उंदीर मारण्याचे औषध मिसळलेले आईस्क्रीम खायला दिले असा त्याच्यावर आरोप होता. यात एका ५ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी पोलिसांनी अन्सारीविरुद्ध एकाची हत्या आणि दोघांच्या हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला होता. त्यामुळे तो आतापर्यंत तुरुंगात होता.या प्रकरणाची अंतिम सुनावणी नुकतीच सत्र न्यायालयात पार पडली. त्यावेळी अन्सारीच्या पत्नीने या घटनेला आपला पतीच जबाबदार असल्याचा कोणताही पुरावा दिला नाही. मुलाचा मृत्यू विषप्रयोगामुळे झाल्याचा आरोपदेखील फेटाळून लावला. त्यामुळे न्यायालयाने आरोपी अन्सारीला निर्दोष सोडले.

# सायन उड्डाणपूल पुढच्या वर्षी जूनमध्ये खुला होईल

## ३१ मे २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याची अंतिम मुदत

■ मुंबई

**सायन** उड्डाणपुलाचे बांधकाम पुढील वर्षी ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर या प्रकल्पासाठी ही अंतिम मुदत निश्चित केली आहे. त्यामुळे जून २०२६ पासून हा उड्डाण पूल वाहतुकीसाठी खुला होईल, असे अपेक्षित आहे. सायन येथील पूर्व-पश्चिम भागांना जोडणाऱ्या या रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचा आढावा अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर आणि पोलीस सह आयुक्त (वाहतूक) अनिल कुंभारे यांनी घेतला. पादचारी भुयारी मार्ग आदीचे काम मुंबई महापालिका करत आहे. लाल बहादूर शास्त्री मार्गावरील भुयारी मार्गाचे काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण केले जाईल. धारावी बाजूकडील दुसऱ्या भुयारी मार्गाचे काम फेब्रुवारी २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल. पुलासाठी आवश्यक असलेल्या गर्डर्सचे उत्पादन सुरू आहे आणि काम वेळेत पूर्ण होण्यासाठी मुंबई महापालिकेचे प्रतिनिधी देखरेख करत आहेत.

# विरारमध्ये बविआचे चार माजी नगरसेवक भाजपात

■ विरार

**वसई**-विरारमध्ये बहुजन विकास आघाडीला (बविआ) मोठा धक्का बसला आहे. बविआचे चार माजी नगरसेवक राजेश ढगे, सुषमा दिवेकर, ज्योती राऊत आणि माया चौधरी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी आज भाजपामध्ये प्रवेश केला. हा पक्षप्रवेश सोहळा भाजपा प्रदेशाध्यक्ष मंत्री रवींद्र चव्हाण आणि नालासोपाराचे आमदार राजन नाईक यांच्या उपस्थितीत पार पडला. आगामी निवडणुकांच्या तोंडावर बविआसाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. यावेळी वसई-विरार महानगरपालिका देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दत्तक द्या,असे आवाहन चव्हाण यांनी मतदारांना केले.

# निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोग आणा! पटोलेंचे सरकारला आवाहन

■ नागपूर

**निवडणूक** प्रक्रियेत सातत्याने घोळ घालणाऱ्या निवडणूक आयोगाच्या आयुक्तांविरुद्ध सरकारने महाभियोग आणावा,आम्ही त्याला पाठिंबा देऊ,असे आवाहन काँग्रेसचे नेते, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की निवडणूक आयोगाची अशी प्रक्रिया आपण पहिल्यांदाच पाहतो आहे,जर मुख्यमंत्रीच असे म्हणत असतील तर राज्यघटनेच्या कलम २४३ अन्वये निवडणूक आयुक्तांविरुध्द सरकारने महाभियोग चालववा. आम्ही तुमच्यासोबत आहोत, असे पटोले म्हणाले. आम्हीसुध्दा निवडणूक आयोगाची अशी प्रक्रिया पहिल्यांदाच पाहत आहोत. मात्र असे असतानाही जर सरकार निवडणूक आयुक्तांच्या विरुद्ध महाभियोग आणणार नसेल तर आयोगाच्या मागे तुम्हीच आहात,असे म्हणायला वाव आहे,असा टोलाही पटोले यांनी लगावला.

# मराठी शाळा, भाषेचा मुद्दा उबाठाच्या जाहीरनाम्यात

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उबाठाने कंबर कसली आहे. यासाठीच्या जाहीरनाम्यात मराठी शाळा आणि मराठी भाषा हे दोन मुद्दे प्राधान्याने असणार असल्याचे संकेत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत. मराठी अभ्यास केंद्र आणि शालेय शिक्षण अभ्यास व कृती समन्वय समितीच्या शिष्टमंडळाशी झालेल्या भेटीत त्यांनी मराठी शाळांचे सक्षमीकरण, आधुनिक सुविधा, शिक्षकांचे प्रशिक्षण, विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार साहित्य आणि मराठी भाषा सक्तीच्या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी यावर ठोस उपाययोजना जाहीरनाम्यात समाविष्ट केल्या जाणार असल्याचे आश्वासन दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शासकीय तसेच खासगी व्यवहारांमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्यासाठीही प्रभावी धोरणे आणण्याचे आश्वासनही ठाकरे गटाकडून दिले जाणार आहे. याच बैठकीदरम्यान उद्धव ठाकरेंनी शालेय शिक्षणात पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याच्या प्रस्तावाचा तीव्र विरोधही नोंदवला.





अजित पवार यांचे पुतणे आणि शरद पवार गटाचे नेते युगेंद्र पवार व तनिष्का यांचा नुकताच विवाह सोहळा पार पडला. या सोहळ्याचे फोटो समाज माध्यमांवर धुमाकूळ घालत आहेत.







संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

## दत्त मनी ध्यावा, सौख्याचा विसावा

*गुरूकृपा होय ज्यास। दैन्य दिसे कैचे त्यास।*
*समस्त देव त्यासी वश। कळीकाळासी जिंके नर।।*

गुरूदत्तात्रेयांचा हा महिमा गुरूचरित्रातून आणि अन्य ग्रंथांमधूनही वर्णन केला गेला आहे. आज दत्तजयंती. ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन तत्त्वांचा म्हणजेच उत्पत्ती, स्थिती लयाचा एकत्रित आविष्कार म्हणून श्रीगुरूदत्तांचे अवतार कार्य विशेष मानले जाते. आजच्या दिवशी अत्री ऋषी आणि अनसुया यांच्या पोटी हे तीनही बाळं जन्माला आली. या दोघांच्याही तपश्चर्येचे ते फळ होते. ज्या कारणासाठी दत्तात्रेयांचा हा अवतार आहे. तो पाहिल्यानंतर समस्त मानवजातीला भक्तीचे, श्रद्धेचे किंवा निष्ठेचे महत्त्व लक्षात आणून देण्यासाठी श्रद्धेतूनच जीवनविषयक निष्ठा प्रबळ होऊ शकते. एका अर्थी ही श्रद्धा म्हणजेच स्वतःमध्ये असलेल्या ईश्वरतत्त्वाचे आपणच वारंवार केलेले जागरण असते. श्रद्धा म्हणजेच आपल्यातल्या मनुष्यत्वाचे विस्मरण होऊ नये आणि सतत या सृष्टीची जी सर्वशक्तीमान शक्ती आहे तिला शरण जाण्याचा भाव व्यक्त होत राहाणे हेच श्रद्धेचे प्रमुख लक्षण ठरते. श्रीगुरूदत्तात्रेय अशा या सृष्टी आणि जीवनविषयक गूढ तत्त्वाचे पहिले मार्गदर्शक किंवा दिशादर्शक ठरतात. म्हणूनच त्यांना गुरूतत्त्वाचे आद्यप्रवर्तकही म्हटले जाते. प्रामुख्याने या सृष्टीची निर्मिती तिचे संवर्धन आणि संकटांचे निवारण करण्याकरीता ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन देवतांची योजना सांगितली जाते. आणि तीच समाज किंवा मनुष्यजीवनालाही लागू पडते. त्यांच्यातली श्रद्धेची, भक्तीची निर्मिती त्या प्रवृत्तीचे संवर्धन आणि अशी भक्ती करणाऱ्यांच्या संकटांचे हरण हे या तीन देव किंवा तत्त्वांच्या माध्यमातून होते. म्हणूनच

*अवतारही उदंड होती। सर्वचि मागुती विलया जाती।*
*तैसे नव्हे दत्तात्रेय मूर्ती। नाशकल्पांती असेना।*

अशा शब्दामध्ये भागवतधर्माचे प्रणेते श्रीधरांनी म्हणून ठेवले आहे. अनेक अवतार होऊन गेले. परंतु दत्तात्रेयांचा अवतार अजूनही कायम असल्याची भक्तीसंप्रदायामध्ये ठाम श्रद्धा आहे. आपल्या मदतीला हाक मारताच धावून येणारी म्हणजेच स्मरण करताच साहाय्यभूत होणारी अशी ही स्मर्तृगामी देवता मानली जाते आणि ती भक्तांच्यासाठी सतत उपस्थित असल्यानेच तिचे हे अवधूतरूप सतत चिंतन करण्यासारखे ठरले. दत्तात्रेयांच्या प्रार्थनेत अवधूतचिंतन असे आवर्जुन म्हटले जाते.

### विकल्परहित श्रद्धा

मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी ते पौर्णिमा या काळामध्ये अनेक घराघरांमध्ये गुरूचरित्राचे पारायण होते. गुरूचरित्र हे प्रामुख्याने श्रीदत्तात्रेयांच्या निष्ठेचे प्रतिपादन करणाऱ्या श्रीपादवल्लभ आणि नरसिंह सरस्वतींचा चरित्ररूप ग्रंथ आहे. दत्तात्रेयांप्रमाणेच या दोघांनीही आपल्या भक्तांचा सांभाळ करण्यासाठी वेळोवेळी धाव घेतल्याचे आणि भक्तीची अवहेलना करणाऱ्यांना शिक्षा केल्याचे गुरूचरित्रात आढळून येते. गेल्याच वर्षी श्रद्धावान लभते या नावाचे पुस्तक श्री स्वामी सवितानंद यांनी प्रकाशित केले. ज्यामध्ये या गुरूचरित्राच्या विविध प्रसंगांचे मूलगामी चिंतन केले गेले आहे. आणि गुरूचरित्रातील कथानकांचा निष्कर्ष सांगताना सवितानंद यांनी विकल्परहित श्रद्धा हे गुरूभक्तीचे सर्वात मोठे फळ असल्याचे म्हटले आहे. देव असो किंवा आपले गुरू असो. त्यांची भक्ती करताना कोणताही किंतु परंतु किंवा मनामध्ये संशय असता कामा नये. जिज्ञासा किंवा त्यातला न पटणारा भाग जरी मनात येत असला तरी त्याविषयी जिज्ञासा, विश्लेषण जरूर करावे परंतु त्यातल्या कुठल्याही कथानकाविषयी अश्रद्धा असता कामा नये. पुराणातल्या कथा कशाही असल्या तरी त्या वाचणाऱ्याला, ऐकणाऱ्याला विचार करायला किंवा चिंतन करायला प्रवृत्त करतात. किंबहुना त्याची स्वतःच्या जीवनाविषयीची श्रद्धादेखील वाढवतात. पूर्ण श्रद्धेने केलेले गुरुचरित्राचे पारायण हादेखील खूप मोठा अनुभवाचा ठेवा असतो. अनेक शतकांची गुरूचरित्र वाचनाची परंपरा दत्तभक्तांना प्रत्यक्ष अनुभव देणारी ठरली आहे. आपल्या सगळ्या प्रपंचाचा भार हा श्रीदत्तात्रेयांच्या चरणी अर्पण करून आपल्या सुकृताचा अनुभव घेण्याची प्रेरणा दत्तभक्तांना मिळत असते. म्हणूनच एका दत्तभक्तांने म्हटले आहे की

*दत्त चरणी विसावा।आत्मचिंतनाचा सांगावा।*
*आर्तता ती उपासनेची। अव्यक्त ती साधनेची।*
*दत्तध्यानी मनी ध्यावा। सौख्य येईल अनुभवा।।*

अशा प्रकारची शाश्वती दत्तभक्तीतून प्राप्त होते.

### ज्ञानाचा प्रकाश देणारी देवता

श्रीगुरूदत्तांशी जोडले गेलेले गुरुतत्त्व हे अधिक महत्त्वाचे ठरते. गुकार या शब्दातून अज्ञानाचा अंधकार दूर करायचा आणि रू या अक्षरातून ज्ञानाचा वसा प्राप्त करण्याचा संदेश दिला जातो. गुरू हा शब्द आत्मज्ञानाची आणि प्रकाशाची वाट दाखवणारा मानला गेला. महाराष्ट्रातल्या सगळ्या संतांनी दत्ततत्त्वाचे आपापल्या पद्धतीने चिंतन केले आहे. जनार्दन स्वामी किंवा नाथपरंपरेमध्येसुद्धा या दत्ततत्त्वाचे महत्त्व सांगितले गेले. स्वतः दत्तात्रेयांनी याच सृष्टीत अस्तित्वात असलेल्या चोवीस गोष्टींना गुरू केले होते. म्हणजेच जी सृष्टी नित्य आहे असे मानले जाते आणि त्या नित्य तत्त्वाचे चिंतन म्हणजेच दत्ततत्व आहे असाही निष्कर्ष काढता येतो. प्रापंचिक माणूस असो किंवा आत्मकल्याण, आत्मसाक्षात्कारासाठी साधना करणारे योगी असतो. प्रत्येकाची आराध्यदेवता किंवा इष्ट देवता भलेही वेगवेगळी असू शकेल परंतु ब्रह्मा विष्णू, महेश या तिघांच्या एकत्रित शक्तीचे रूप म्हणून

*गुरूर्ब्रह्मा, गुरूर्विष्णू, गुरूर्देवो महेश्वरः*
*गुरूर्साक्षात परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः।।*

असे म्हणून प्रत्येक उपासनेची सुरूवात होते. महाराष्ट्रामध्ये दत्तभक्तीचा मोठा प्रभाव आहे. नरसिंह सरस्वतींचे जन्मस्थान असलेले विदर्भातील कारंजा, औदुंबर, नरसोबाची वाडी आणि महाराष्ट्र कर्नाटक सीमेवर असलेले गाणगापूर याठिकाणी नरसिंह सरस्वतींचे काही काळ असलेले वास्तव्य आणि त्यातून अधिक दृढ झालेली दत्तभक्ती मनुष्यजीवनाच्या उद्देशनिश्चितीची मार्गदर्शक ठरलेली आहे. दासगणूमहाराज, रंग अवधुतमहाराज, वासुदेवानंद टेंभे सरस्वती महाराज, गुळवणी महाराज आणि त्यापूर्वीचे स्वामी समर्थांचा अवतार हा याच दत्तपरंपरेचा तितकाच मोठा आविष्कार ठरला. मनुष्याला स्वतःच्या प्रयत्नांबरोबर ईश्वर शक्तीची प्रबळ महती सांगणारी ही दत्तभक्ती आहे.

### सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

डोळ्यात स्वप्नं असलेली माणसे खिशात पैसा असलेल्या माणसांपेक्षा जास्त श्रीमंत असतात.

### पंचांग

**गुरुवार, ४ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशी/ पौर्णिमा**
**नक्षत्र : कृत्तिका**

रवी उदय- ०६-५८
रवी अस्त- १७-५९



-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० वृषभ

**श्री दत्तात्रेय जयंती, गाणगापूर क्षेत्री दत्त जयंती, श्री श्रीधर स्वामी जयंती, पौर्णिमा सकाळी ८.३७ ते उत्तररात्री ४.४३ पर्यंत**


मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)


### पाककृती



**दत्तजयंती स्पेशल**
## गव्हाच्या पिठाचा शिरा



★ **साहित्य :-** एक कप गव्हाचे पीठ, एक कप गूळ, एक कप तूप, १/४ कप पाणी, वेलची पूड, काजूचे काप, मनुका.

★ **कृती :-** गॅस चालू करा. त्यावर एक पॅन ठेवा. त्या पॅनमध्ये थोडे तूप गरम करून काजू आणि मनुका तळून घ्या आणि बाजूला काढा. त्याच पॅनमध्ये उरलेले तूप आणि गव्हाचे पीठ घाला. मंद आचेवर सोनेरी होईपर्यंत चांगले भाजा. आता दुसऱ्या भांड्यात पाणी गरम करून त्यात गूळ विरघळवा. भाजलेल्या पिठात गुळाचे पाणी हळूहळू ओता आणि गुठळ्या होऊ नयेत म्हणून ढवळत राहा.
मिश्रण घट्ट होईपर्यंत आणि शिरा तूप सोडेपर्यंत शिजवा. आता गॅस बंद करून वेलची पावडर, तळलेले काजू आणि मनुका घालून मिसळा. ५ मिनिटे त्यावर झाकण ठेवून तसाच ठेवा. दत्तगुरुंसाठी गोड नैवेद्य तयार झाला.



# सलग शतकासह विश्वचषकासाठी कोहलीचा दावा मजबूत
# ऋतुराज गायकवाडने पहिले शतक ठोकले



**भारतीय अनुभवी फलंदाज विराट कोहलीने २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी आपला दावा मजबूत केला आहे. उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या विराटने रायपूरमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सलग दुसरे शतक झळकावले. त्याने यापूर्वी रांचीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शतक झळकावले होते आणि आता त्याने रायपूरमध्ये शतक झळकावून आपला फॉर्म कायम ठेवला आहे. कोहलीने ९० चेंडूत आपले शतक पूर्ण केले.त्यासोबत ऋतुराज गायकवाडनेही (८३ चेंडूंत १०५ धावा) पहिले शतक ठोकले.विराट आणि ऋतुराजच्या खेळीमुळे दक्षिण आफ्रिकेविरोधात ३५८ धावांचे डोंगर उभा केला होता.**

■ रायपूर

**विराटचे** त्याचे एकदिवसीय सामन्यांमधील ५३वे शतक आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील एकूण ८४ वे शतक आहे. कोहली आधीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या कोणत्याही स्वरूपात सर्वाधिक शतके झळकावणारा फलंदाज बनला होता आणि आता त्याने हा विक्रम आणखी मजबूत केला आहे. एकदिवसीय सामन्यांमध्ये शतके झळकावण्यात कोहली सर्वांच्या पुढे गेला आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे ज्याने १०० शतके झळकावली आहेत.दुसऱ्या सामन्यात कोहली ९३ चेंडूत सात चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने १०२ धावा काढल्यानंतर बाद झाला.गेल्या काही काळापासून २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात कोहलीच्या सहभागाबद्दल सतत वादविवाद सुरू आहेत. तथापि, कोहलीच्या सध्याच्या फॉर्ममुळे या स्पर्धेत त्याचा दावा मजबूत झाला आहे. कोहली आता भारतासाठी फक्त एकदिवसीय स्वरूपात खेळतो आणि दोन वर्षांत होणाऱ्या विश्वचषकासाठी तो त्याची मॅच फिटनेस कशी राखेल, याबद्दल सतत वादविवाद होत आहेत.

## श्री उद्यानगणेश मंदिर शालेय कबड्डी स्पर्धा १५ डिसेंबरपासून

■ मुंबई

**श्री** उद्यानगणेश मंदिर सेवा समितीतर्फे मुंबई आणि ठाणे आदी परिसरांतील १७ वर्षे आणि ५५ किलो वजनाखालील इयत्ता दहावीपर्यंत मुलामुलींच्या शालेय संघांची श्री उद्यानगणेश मंदिर कबड्डी स्पर्धा १५ व १६ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज उद्यानमध्ये आयोजित करण्यात आली. ही शालेय कबड्डी स्पर्धा विनाशुल्क प्रवेशाची असून प्रथम येणाऱ्या शालेय मुलांच्या ३२ संघांना आणि शालेय मुलींच्या १६ कबड्डी संघांना प्रवेश दिला जाणार आहे. या स्पर्धेच्या मुले व मुली विभागांतील अंतिम विजेत्यास ५ हजार, अंतिम उपविजेत्यास ३ हजार आणि तृतीय क्रमांकास १ हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. या स्पर्धेतील सर्वोत्तम कबड्डीपटू, उत्कृष्ट चढाई व उत्कृष्ट पकड यासाठी वैयक्तिक पुरस्कार आहेत. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या अथवा मुलींच्या शालेय कबड्डी संघांनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी समितीचे क्रीडा समिती निमंत्रक प्रकाश परब अथवा व्यवस्थापक संजय आईर, श्री उद्यानगणेश मंदिर कार्यालय, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान(शिवाजी पार्क), दादर पश्चिम येथे ८ डिसेंबरपर्यंत संपर्क साधावा.

## दोहामध्ये आजपासून नेमबाज विश्वचषकाची अंतिम फेरी

■ दोहा

**चमकदार** कामगिरी करणारे भारताचे अव्वल नेमबाज उद्या गुरुवारपासून दोहा येथे सुरू होणाऱ्या आयएसएसएफ विश्वचषक फायनलमध्ये हंगामाचा शेवट शानदारपणे करण्याचा प्रयत्न करणार आहे. हंगामाच्या अखेरच्या स्पर्धेत पॅरिस ऑलिम्पिकमधील दुहेरी कांस्यपदक विजेती पिस्तूल नेमबाज मनू भाकर, विश्वविजेती सम्राट राणा आणि अनेक विश्वचषक पदक विजेती सुरुची सिंग यांच्यासह भारताच्या १४ अव्वल नेमबाजांचा समावेश असेल. हे नेमबाज प्रत्येक स्पर्धेच्या वैयक्तिक श्रेणींमध्ये जगातील अव्वल १२ नेमबाजांना आव्हान देतील. भारताने यापूर्वी कैरो येथील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत (पिस्तूल/रायफल) आणि अथेन्स (शॉटगन) विक्रमी कामगिरी केली होती.

## सह्याद्री, सरस्वती, शिर्शेकर्स महात्मा गांधी, ज्ञानविकास,शिवभक्त, मावळीची विजयी घोडदौड

■ मुंबई

**ठाण्यातील** धी.युनायटेड स्पोर्ट्स क्लब यांच्या वतीने श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त आज झालेल्या महिलांच्या सामन्यात भांडुपच्या सह्याद्री संघाने ठाण्याच्या मावळी मंडळाचा ६-४ (मध्यंतर १-२) असा २ गुणांनी पराभव केला. मध्यंतराला मावळी मंडळ १ गुणाने आघाडीवर असताना दुसऱ्या डावात सह्याद्रीच्या खेळाडूंनी अप्रतिम पुनरागमन करत सामना हिसकावला. सह्याद्री संघाच्या आर्या मटकर (६.३०,नाबाद ३.२० मि.संरक्षण), मुक्ता येराडे (२.५०,२.१० मि.संरक्षण), गार्गी राणे (३.३० मि.संरक्षण), तन्वी



येराडे (३ गुण)यांनी तर पराभूत मावळी मंडळाच्या अद्रीका चव्हाण (५.३०,१.५० मि. संरक्षण), कशिश फावरे (२.५० मि.संरक्षण), निधी सावंत (३.३०,३.२० मि.संरक्षण) यांनी शानदार खेळ करत प्रेक्षकांना जागेवरच खिळवून ठेवले.

आज झालेल्या पुरुषांच्या सामन्यात मुंबईच्या सरस्वती क्लबने यजमान व ठाण्याच्या दि युनायटेड क्लबवर १५-१० (मध्यंतर ६-५) असा ५ गुणांनी विजय मिळवला. करण गरोळे (१.३०,२ मि.संरक्षण व २ गुण), राहुल जावळे (३, १.२० मि.संरक्षण व २ गुण), सुरज वैश्य (२,२ मि.संरक्षण व १ गुण), रोहित जावळे (१.१०,१.२० मि.संरक्षण व १ गुण) यांनी तर पराभूत यजमान युनायटेडच्या शुभम उत्तेकर (२.३०, मि.संरक्षण व ३ गुण), हर्षित कोळी (१.४०,१.२० मि.संरक्षण व १ गुण), साहिल जामसुतकर (१.३०,१.४० मि.संरक्षण),आदित्य जाधव (१ मि.संरक्षण व २ गुण) यांनी जोरदार खेळ करत प्रेक्षकांचे जोरदार मनोरंजन केले.

## अहिल्यानगरात आजपासून खो-खो स्पर्धेला सुरुवात

■ अहिल्यानगर

**महाराष्ट्र** खो-खो असोसिएशनच्या व अहिल्यानगर जिल्हा खो-खो संघटना यांच्या मान्यतेने अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले युवा प्रतिष्ठान, विश्वंभरा प्रतिष्ठान बुऱ्हाणनगर व बाणेश्वर क्रीडा मंडळ बुऱ्हाणनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५१ वी मुले-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचा थरार उद्या गुरुवारपासून श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर येथील मैदानावर ४ ते ७ डिसेंबरदरम्यान रंगणार आहे. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे महाराष्ट्र संघाची निवड कर्नाटक येथे होणाऱ्या ४४ व्या मुले-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी होणार आहे. प्रत्येक जिल्हा पूर्ण क्षमतेने मैदानात उतरणार आहे. २४ जिल्ह्यांतील ८७० खेळाडू व प्रशिक्षक सहभागी होणार आहेत.

## सदाशिव सातघरे क्रिकेट संघ सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत

■ ठाणे

**पहिल्या** डावात मिळालेल्या ३० धावांच्या आघाडीच्या जोरावर सदाशिव सातघरे संघ वर्चस्व मिळवत सलग दुसऱ्यांदा ठाणे फ्रेंड्स युनियन आयोजित दुसऱ्या तुकाराम सुर्वे स्मृती १६ वर्षे वयोगटाच्या २ दिवसीय क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले. दादोजी कोंडदेव स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात गोविंद पाटील संघाने १३७ धावसंख्या उभारल्यावर सदाशिव सातघरे संघाने १६७ धावा बनवत सामन्यात विजयी आघाडी मिळवली होती.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या गोविंद पाटील संघाला अक्षत पटेल, अथर्व गावडे, दर्शन राठोडच्या फलंदाजीमुळे सव्वाशे धावा पार करता आल्या. फलंदाजांवर अंकुश ठेवताना आयुष सुर्वेने ४, अरिन चौबळने ३ आणि रुद्र गिरीने २ बळी मिळवले. त्यानंतर प्रशांत अल्लूने ४० धावांत पाच बळी मिळवत गोविंद पाटील संघाला पुढावा मिळविण्याची आस दाखवली.पण तन्मय मालुसरेची अर्धशतकी खेळी आणि त्याला राघव उपाध्याय,शायनशेखची चांगली साथ मिळाल्याने सदाशिव सातघरे संघाने दिडशतकी धावा उभारल्या.

**शरीरसौष्ठव स्पर्धा**

## साजिद मलिक ठरला नवोदित मुंबई श्री

■ मुंबई

**नवोदित** मुंबई श्रीच्या निमित्ताने गोरेगावचे शास्त्रीनगर मैदान शरीरसौष्ठवपटू आणि क्रीडाप्रेमींच्या गर्दीने अक्षरशः ओसंडून वाहत होते. रात्री अकराच्या ठोक्याला नवोदित मुंबई श्रीचा मान विराज फिटनेसच्या साजिद मलिकने मिळवला. नवोदित मुंबई श्रीच्या आयोजनाचा दिवस शरीरसौष्ठव स्पर्धेचा इतिहासात संस्मरणीय ठरला. नवोदित मुंबई श्रीसारख्या जिल्हास्तरीय आणि नवख्या आणि उदयोन्मुख खेळाडूंच्या स्पर्धेला दीडशे स्पर्धकांची अपेक्षा असताना प्रत्यक्षात २३५ पीळदार नवोदितांचा सहभाग थक्क करणारा होता.

सात वजनी गटाच्या या स्पर्धेत २३५ शरीरसौष्ठवपटूंच्या सहभागामुळे स्पर्धा काहीकाळ लांबली. प्रत्येक गटात ४०-४५ खेळाडू तर ६० किलो आणि ६५ किलो वजनीगटात स्पर्धकांच्या संख्येने अर्धशतक ओलांडले होते. ५५ किलो वजनी गटात इतकी चुरस होती की अव्वल पाच खेळाडू निवडताना जजेसना तीन-तीनदा कंपेरिजन करावी लागली. तसेच त्यांच्यात क्रमांक ठरविताना आणखीनच डोकेफोड करावी लागली. दर्शन सावंत आणि अर्णव वाघ या जोडीला मागे टाकत बोवलेकर जिमचा रमण राठोड सरस ठरला. ६० किलो वजनी गटात धर्मराज जमादारने बाजी मारली. ६५ किलोमध्ये प्रतिक महाजन, ७० किलोत खुद्द साजिद मलिक आणि ७५ किलोवरील वजनी गटात परब फिटनेसचा फ्रान्सिस्को फर्नांडिस अव्वल आला. ७० किलो वजनी गटात अमन भौमिकवर मात करत गटात पहिला आलेला साजिद मलिकच स्पर्धेचा विजेता ठरला.



# कागल-सातारा महामार्गाचा वापर शेण थापण्यासाठी सुरू



■ कोल्हापूर

**कागल-** सातारा महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम प्रदीर्घ काळापासून रेंगाळल्यामुळे स्थानिक नागरिकांनी आता महामार्गाचा वापर चक्क शेण थापण्यासाठी, गुरे बांधण्यासाठी, किरकोळ साहित्य ठेवण्यासाठी सुरू केलेला आहे.

२०२२ साली सुरू झालेले कागल-सातारा महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम तीन वर्षे झाली तरी अजून पूर्ण झालेले नाही. गेल्या सात-आठ महिन्यांपासून तर हे काम अक्षरशः ठप्पच झाले आहे. सध्या या महामार्गावरील सगळी वाहतूक पर्यायी सेवा रस्त्यांवरून सुरू आहे. रुंदीकरणाच्या कामासाठी म्हणून पूर्वी अस्तित्वात असलेल्या महामार्गावरील जवळपास सगळी वाहतूक बंद करण्यात आलेली आहे. एकीकडे रुंदीकरणाचे काम बंद आहे आणि दुसरीकडे या जुन्या महामार्गावरील वाहतूकही बंद आहे. त्यामुळे या महामार्गाच्या लगतच्या गावांमधील लोकांनी आता जुन्या महामार्गाचा वापर स्वतःच्या सोयीनुसार सुरू केला आहे.

या महामार्गावर काही लोकांनी किरकोळ साहित्य ठेवून दिले आहे, तर काहीजणांनी या महामार्गाचा वापर पार्किंगसाठी आणि गुरे बांधण्यासाठी सुरू केला आहे.

# दौंड- मनमाड दुहेरीकरणामुळे २५ जानेवारीपर्यंत रेल्वे गाड्या रद्द

■ सोलापूर

**मध्य** रेल्वेने दौंड आणि मनमाड रेल्वे मार्गावर दुहेरीकरणाचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे उद्या गुरुवार ४ डिसेंबर ते २५ जानेवारीपर्यंत काही मार्गावरील रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

रद्द केलेल्या गाड्यांमध्ये नागपूर, अमरावती, सोलापूर, लातूर, नांदेड, पनवेल या मार्गावरील सुमारे १५ येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांचा समावेश आहे. प्रामुख्याने पुणे सोलापूर मार्गावरील लोकल आणि एक्स्प्रेस गाड्या ११ दिवस रद्द करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर ७ गाड्यांचे मार्ग बदलले आहेत. २ गाड्या खडकी स्थानकावर थांबवून माघारी पाठविण्यात येणार आहेत आणि उत्तर, दक्षिण भारतात जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या १५ गाड्या सुमारे चार ते पाच तासांच्या विलंबाने सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे नववर्षाच्या सुरुवातीलाच मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांबरोबर पुण्यातून लांब पल्ल्याच्या ठिकाणी प्रवास करणाऱ्यांची रेल्वेसेवा कोलमडणार असल्याचे स्पष्ट झाले.

# आम्ही कायद्यानुसार योग्य तेच निर्णय घेतो! आयोगाचे प्रत्युत्तर

■ मुंबई

नगरपंचायती आणि नगर परिषद निवडणुकीतील गोंधळावरून राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगावर संताप व्यक्त केला होता. त्यावर आज निवडणूक आयोगाने आपली भूमिका मांडली .राजकीय नेत्यांना काय वाटते यापेक्षा कायदा काय सांगतो हे महत्वाचे ,आम्ही कायद्यानुसार जे योग्य तेच निर्णय घेतो,असे प्रत्युत्तर आयोगाने दिले.

काल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २१ डिसेंबर रोजी निकाल जाहीर करण्याचे निर्देश दिले, त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधकांनी आयोगावर नाराजी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांसह अनेक नेत्यांनी नाराजी व्यक्त केली होती.

# राज्यात थंडीची लाट येणार! हवामान खात्याचा इशारा

■ मुंबई

**भारतीय** हवामान विभागाने चालू डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला महाराष्ट्रात थंडी वाढण्याचा आणि काही भागांत थंडीची लाट येण्याचा इशारा दिला आहे.आज बुधवार ३ डिसेंबरपासून उत्तर आणि मध्य महाराष्ट्रात थंडीची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

कोकण विभागातील रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग आणि मुंबई, पालघर आदी जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाने वातावरण कोरडे राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. तसेच मध्य महाराष्ट्र विभागात धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली



या जिल्ह्यांचा समावेश होतो. या एकूण जिल्ह्यांपैकी धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे आणि पुणे घाटमाथ्यावरील भागात हवामान विभागाने थंडीचा येलो अलर्ट जारी केला आहे. तसेच उर्वरित कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यात हवामान विभागाने थंडीचा अलर्ट जारी केला आहे.

मराठवाडा विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, लातर, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाने कोरड्या वातावरणाचा अंदाज वर्तवला आहे. तसेच याच विभागात तापमानात घट निर्माण झाली असून गारठा वाढण्याची शक्यता आहे.

# मतदानातील राड्यांवर कारवाई करा! सुळेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

■ मुंबई

**राज्यात** काल झालेल्या निवडणुकांदरम्यान उद्‌भवलेल्या गोंधळ आणि मारामारीच्या घटनांवरून खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. मतदानावेळी झालेला हिंसाचार आणि निर्माण केलेले दहशतीचे वातावरण याबाबत प्रशासनाला तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्याची मागणी त्यांनी केली.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाच्या शेवटच्या टप्प्यात राज्यातील काही भागांमध्ये दोन गटांत तुंबळ हाणामारी झाल्याची दृश्ये वृत्तवाहिन्यांवर पाहिली. देशाला दिशा दाखविणाऱ्या आणि छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात या घटना घडूच कशा शकतात अशी खेदाची भावना मनामध्ये आहे. या भूमीने सदैव लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला असून ती रुजविण्यासाठी राष्ट्राला दिशा देण्याचे काम केले आहे. सशक्त लोकशाही असणाऱ्या, प्रबोधनात्मक आणि संविधानात्मक विचारांची उज्ज्वल परंपरा असणाऱ्या आपल्या महाराष्ट्रात निवडणुकीच्या दरम्यान तुंबळ हाणामाऱ्या होतात, हे सर्वथा अयोग्य, अनुचित आणि राज्याच्या लौकीकास न शोभणारे आहे.

**SBI**
भारतीय स्टेट बँक
प्रादेशिक व्यवसाय कार्यालय फोर्ट,
1ला मजला, अटलांटा इमारत, जमनलाल बजाज मार्ग,
नरिमन पॉइंट – 400021.

**व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूंची आवश्यकता**

भारतीय स्टेट बँक पेडर रोड, मुंबई येथील शाखेकरिता व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूंच्या मालकांकडून / मुखत्यारपत्रधारकांकडून भाडेतत्त्वावरील प्रस्ताव मागवित आहे. अधिक तपशिलांसाठी आणि मुंबईतील पेडर रोड शाखेची निविदा पत्रिका डाऊनलोड करण्यासाठी, कृपया एसबीआ वेबसाईटला @ **https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/procurement-news** येथे **05/12/2025** ते **19/12/2025** दरम्यान भेट द्या. प्रस्ताव दाखल करण्याचा अंति दिनांक व वेळ **19/12/2025 रोजी दुपारी 03.30 वाजेपर्यंत** असेल. या संदर्भातील पुढील **सूचना / स्पष्टीकरण** केवळ बँकेच्या उपरोक्त वेबसाईट वरच प्रकाशित केले जाईल.

कृपया मध्यस्थांनी अर्ज करू नये.

**सहायक महाव्यवस्थापक**
**आरबीओ फोर्ट**

# आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत

■ मुरबाड

**राज्यात** पावसामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांची दैना व कर्जामुळे शेतकरी चिंतातुर झाले असताना मुरबाड तालुक्यातील जायगाव येथील रमेश देसले या शेतकऱ्याने ९ नोव्हेंबर रोजी शेतातील पिकाची परिस्थिती व कर्जाला कंटाळून तणनाशक विषारी औषध आपल्या शेतातच प्राशन करून आत्महत्या केली होती.

याबाबत टोकावडे पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. त्यांच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी मुरबाड तहसीलदार कार्यालयाकडून प्रस्ताव पाठवण्यात आला होता या प्रस्तावानुसार चौकशीअंती आज रमेश देसले यांच्या पाच वारसदारांना नायब तहसीलदार अमोल शिंदे यांच्या हस्ते १ लाख रुपयांचा धनादेश देऊन शासनाची आर्थिक मदत पोच करण्यात आली. मुरबाड तालुक्यात यंदा भाताची पिके ही चांगली असताना सततच्या पडलेल्या वादळी पावसामुळे भात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

**सार्वजनिक सूचना**

रिद्धी सिद्धी सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे सदस्य श्री. प्रकाश विष्णू गावडे यांचे मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. 21, क्रमांक 101–105 हरवले/चुकवले गेले आहे. सदस्यांनी डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे.या सूचनेच्या तारखेपासून 14 दिवसांच्या आत संबंधित कागदपत्रांसह कोणत्याही दावा/हरकती असल्यास, त्या रिद्धी सिद्धी सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे सचिव यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर कराव्यात. ठराविक कालावधीत कोणताही दावा/हरकत प्राप्त न झाल्यास, सोसायटीच्या उपनियमांनुसार डुप्लिकेट प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

रिद्धी सिद्धी सहकारी गृहनिर्माण सोसायटीतर्फे
तारीख: 03/12/2025
स्थळ: ठाणे (सचिव)

**INDUSIND BANK LIMITED**
**Regd. Office :** 2401, General Thimmayya Road, Cantonment, Pune-411 001.
**Secretarial & Investor Services :** 701 Solitaire Corportate Park, 167 Guru Hargovindji Marg, Andheri (E), Mumbal-400 093.

**NOTICE FOR LOSS OF SHARE CERTIFICATE(S)**

Notice is hereby given that the certificate(s) of **Indusind Bank Ltd.** for the under mentioned securities are stated to have been lost or misplaced and the registered holders have applied to the Bank for issue of duplicate Share Certificate(s). Any person who has / have a claim(s) in respect of the said security(ies) should lodge such claim(s) in writing with **R & T Agents of Bank viz. MUFG Intime India Private Limited (Formerly known as Link Intime India Private Limited) C-101, 247 Park, LBS Marg, Vikhroli (West), Mumbai-400 083** within 7 **(Seven)** days from this date else the company will proceed to issue duplicate certificate without further intimation.

| SR. NO. | NAME OF THE SHAREHOLDER | REGISTERED FOLIO NO. | CERTIFICATE NO. | DISTINCTIVE NOS. | | NO. OF SHARES |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NARAYANAN J MRS. PADMA NARAYANAN | 00701018 | 635924 | 220556439 | 220557718 | 1280 |

(AUTHORISED SIGNATORY)
**Place:** Mumbai sd/-
**Date :** 04.12.2025 **INDUSIND BANK LIMITED**
Rameshwar Media

# महाड निवडणूक राडा प्रकरणात गोगावलेंच्या मुलावर गुन्हा

■ महाड

**महाड** नगरपालिका निवडणुकी-दरम्यान शिंदे गट आणि राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या राड्या प्रकरणी शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले यांच्यासह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

निवडणुकीदरम्यान काल भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले आणि अजित पवार गटाचे सुशांत जाबरे यांच्या समर्थकांमध्ये तुफान राडा झाला होता. घटनेदरम्यान, विकास गोगावले यांच्या समर्थकांनी सुशांत जाबरे व त्यांच्या अंगरक्षकाला बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. तर दुसरीकडे, जाबरे गटातील एका समर्थकाने विकास गोगावलेंना रिव्हॉल्व्हर दाखवत धमकावल्याचा दावा केला जात आहे. यानंतर सुशांत जाबरे यांनी महाड तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीनुसार, मतदान केंद्रावर पाहणीसाठी गेल्यावर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी जाबरे यांच्या वाहनांवर दगडफेक करून गाड्यांची तोडफोड केली.

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**
Municipal Bank Bhavan, 245, P. D'mello Road, Fort, Mumbai –400001.
**Tel.** 91-22-2261 3814/ 91-22-22717800/858/852
**Email :**mcb.itcell@mcbmumbai.com

**Tenders are invited for Supply, Install & maintenance of Desktops at Branches and Head Office of Bank.**

The Municipal Co-Operative Bank Ltd, Mumbai invites Tenders for Supply, Install & maintenance of Desktops at Branches and Head Office of Bank.

The tender document can also be downloaded from the website of the Bank www.mcb.bank.in Eligible Bidder will be selected based on the RFP response received by the bank.

Tenders to be submitted to the Bank on or before 22nd December 2025 up to 5.00PM.

**Place: Mumbai** **Sd/-**
**Date: 04/12/2025** **General Manager**

**श्री साई जनता एस. आर. ए सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित)**
**श्री गणेश साई इमारत क्रमांक -४**
*(नोंदणी क्र. एमयुएम/एसआरए/एच.एस.जी./(टिसी)/१०७५३/सन २००४) प्लॉट नं. २५२.*
**टी. पी. एस.III, मौजे घाटकोपर किरोळ, जनता सोसायटी मार्ग घाटकोपर (पूर्व) मुंबई - ४०००७७ .**

उपरोक्त संस्थेच्या सभासदाचे निधन त्या तारखेला झाले असून त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या वारसांनी त्यांची सदनिका/गाळा तसेच भाग भांडवल आपले नावे हस्तांतरीत करण्यासाठी संस्थेकडे विहित नमुन्यात अर्ज केले आहेत . सदरहू मृत सभासदाने नामनिर्देशित केलेले नाही .

| मयत सभासदाचे नाव | मृत्युची तारीख | सदनिका नं | वारसाशी नाते | वारसाचे नांव |
|---|---|---|---|---|
| कै. चंद्रकांत बाळकृष्ण चव्हाण | १२ . ०५ . २०२२ | ४/७०६ | मुलगा | श्री. सचिन चंद्रकांत चव्हाण |
| कै. सीताराम तुकाराम चोरगे | ०५ . ०६ . २०२५ | ४/२०४ | मुलगा | श्री. राहुल सीताराम चोरगे |
| | | | पत्नी | श्रीम. शालिनी सीताराम चोरगे |

संस्था या नोटीसद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदांचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/ हरकतदार यांच्या कडुन हक्क मागण्या/ हरकती मागविण्यात येत आहेत . ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १४ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतीच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत . जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/ मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणावावत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील . जर असा कोणत्याही हक्क मागण्या/ हरकती आल्या तर त्यावावत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल .
नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारांस/ हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात *प्राधिकृत अधिकारी* यांच्याकडे सोमवार व गुरुवार सकाळी ११ ते १ या वेळेत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखे पर्यंत उपलब्ध राहील .

*श्री साई जनता एस.आर.ए सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित)*
ठिकाण - घाटकोपर, मुंबई *श्री गणेश साई इमारत क्रमांक -४*
दिनांक - ०४ . १२ . २०२५ *सही / प्राधिकृत अधिकारी*

# तपोवन वृक्षतोडीबाबत अजित पवार यांचा सयाजी शिंदे यांना पाठिंबा

■ मुंबई

**नाशिकच्या** तपोवन परिसरातील प्रस्तावित वृक्षतोडीवरून जनआक्रोश सुरु आहे. स्थानिकांच्या तपोवन वाचवा मोहिमेला अभिनेते आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) नेते सयाजी शिंदे यांनी खुलेपणाने साथ दिली आहे. त्यांच्या या भूमिकेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही पाठिंबा दिला. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वृक्षतोड टाळण्याचा प्रयत्न केला जाईल पण कुंभमेळ्यासाठी आवश्यक कामे वास्तव पाहता टाळता येणार नाहीत अशी स्पष्ट भूमिका मांडली.

अजित पवार यांनी एक्सवर लिहिले की, तपोवनातील वृक्षतोडीच्या संदर्भात समोपचाराने तोडगा काढला पाहिजे. यासंदर्भात अभिनेते सयाजी शिंदे यांनी घेतलेली भूमिका पर्यावरण हिताची आहे. विकासाबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण वाचले तरच पुढची पिढी सुरक्षित राहील हे आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

**नोटीस**

याद्वारे सर्वांना सुचित करण्यात येते की, चेंबूर गांव, तालुका कुर्ला, सर्व्हे क्र......न. भू. क्र. १७१८ काशीनाथ पाटीलवाडी मुक्ती नगर सह. गृह. संस्था, घाटला, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१, या मिळकतीवरील काशीनाथ पाटीलवाडी मुक्ती नगर सह. गृह. संस्था या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मा. सहा. मनपा आयुक्त, एम्/प., चेंबूर, मुंबई - ४०० ०७१ यांनी परिशिष्ट - २ पारित केले आहे. सदर परिशिष्ट - २ मध्ये अनुक्रमांक - ३५१ वर श्रीमती शुभांगी राजेंद्र जाधव यांचे नाव लागले आहे. तथापि सदर परिशिष्ट - २ मधील नावास श्रीमती स्वाती दत्तात्रय सपाटे यांनी मा. अपर जिल्हाधिकारी (अति. /निष्का.), पूर्व उपनगरे यांच्याकडे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अन्वये आव्हानित केले आहे.

सदर अपिलावर मा. अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.) पूर्व उपनगरे यांच्याकडे दि.५/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी आयोजित केली असून टपालाद्वारे सर्व पक्षकारांना अपिलाची प्रत पुरविण्यात आलेली आहे. तथापि पक्षकार मागील दोन्ही तारखेस गैरहजर राहिलेले आहेत. सदर अपिलाच्या सुनावणीबाबत जर कोणाला आक्षेप असेल किंवा सदर झोपडीबाबत विक्री, गहाणखत, बक्षिसपत्र इत्यादीद्वारे मालकी हक्कांबाबत आक्षेप असेल तर सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासून दि. ५/१२/२०२५ रोजी अथवा त्यापूर्वी सर्व कागदपत्रांसह मा. अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.) पूर्व उपनगरे तथा अपिल प्राधिकारी ज्यांचे कार्यालय, १ ला मजला, इंडस्ट्रियल इन्शुरन्स इमारत, चर्चगेट रेल्वे स्थानकासमोर, चर्चगेट, मुंबई- ४०००२० याठिकाणी उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे.

**फॉर्म क्र. URC.2**
**भाग XXI, अध्याय I अंतर्गत नोंदणीबाबत सूचना प्रसिध्द करण्यासाठी जाहिरात**
**[कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 374(b) आणि कंपन्या (नोंदणीस अधिकृत) नियम, 2014 च्या नियम 4(1) नुसार]**

1. यान्वये सर्वसाधारण जनतेस सूचित करण्यात येते की, कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 366(2) अन्वये **मिल्डर्न हेल्थकेअर LLP** या संस्थेने मुंबई येथील निबंधकांकडे अर्ज केला असून, सदर LLP ला भाग XXI, अध्याय I अंतर्गत **शेअर्स मर्यादित कंपनी** म्हणून नोंदणी करण्याचा प्रस्ताव आहे.

2. प्रस्तावित कंपनीचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे आहेत:
• सर्व प्रकारचे ओरल केअर उत्पादनांचे व्यापार, प्रक्रिया, विपणन, आयात-निर्यात, वितरण व व्यवहार करणे—जसे की टूथपेस्ट, माउथवॉश, डेंटल क्रीम, जेल्स, तसेच ओरल हायजिन व डेंटिफ्रिस उत्पादने; तसेच पोषक आहारपूरक पदार्थ, हेल्थ ड्रिंक्स, व्हिटॅमिन्स, मिनरल्स, प्रोटीन उत्पादने व मानवाच्या सेवनासाठी उपयुक्त अन्य आरोग्यविषयक पदार्थ.
• बेबी केअर उत्पादनांचा व्यापार, उत्पादन, असेंब्ली, विपणन—यामध्ये खेळणी, ॲक्सेसरीज, शैक्षणिक व विकासात्मक साहित्य, फीडिंग आयटम्स व इतर संबंधित वस्तू यांचा समावेश.
• सर्व प्रकारचे कॉस्मेटिक व पर्सनल केअर उत्पादने—सुगंधी पदार्थ, लोशन्स, क्रीम्स, ऑइंटमेंट्स, पावडर, पोमेड्स, ग्रिजेस, साल्व्ह, Eau-de-Cologne, टॉयलेट रीकेझिट्स, क्लीनिंग कंपाऊंड्स व इतर नैसर्गिक, हर्बल किंवा सिंथेटिक घटकांपासून तयार उत्पादने—यांचा व्यापार, आयात-निर्यात, प्रक्रिया, उत्पादन, वितरण व विपणन.

3. प्रस्तावित कंपनीचा मसुदा ज्ञापन (MOA) व लेख (AOA) पाहण्याची सोय पुढील पत्त्यावर उपलब्ध आहे:
**प्लॉट क्र. 2, वसई म्युनिसिपल इंडस्ट्रियल एस्टेट, उमेला पी, वसई-पालघर, नायगाव, ठाणे, वसई, महाराष्ट्र – 401207.**

4. या अर्जाबाबत कोणास हरकत असल्यास, त्या हरकती **प्रसिद्धीच्या तारखेपासून 21 दिवसांच्या आत** खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात पाठवाव्यात:
**निबंधक, सेंट्रल रजिस्ट्रेशन सेंटर (CRC),**
**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स (IICA),**
**प्लॉट क्र. 6, 7, 8, सेक्टर 5, IMT मानेसर, जिल्हा गुरुग्राम (हरियाणा) – 122050.**
तसेच हरकतीची प्रत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाकडे देखील पाठवावी.
**दिनांक: ०४, डिसेंबर, २०२५**
**अर्जदारांची नावे:**
**Sd/-**
1. **सोनाली कोहली**
Sd/-
2. **रोहन बालकृष्ण राय**

कोर्ट क्र. ०१

**दिंडोशी येथील मुंबई शहर दिवाणी न्यायालयात,**
**खटला क्र.४९१/२०२४**
(वृत्त प्रकाशनासाठी सीपीसीच्या आदेश ५ नियम २० (१-अ) अंतर्गत)

**२८ नोव्हेंबर २०२४** रोजी दाखल केलेली तक्रार
**२५ फेब्रुवारी २०२५** रोजी नोंदवली गेली
**नियम ५१,**
१९०८ च्या नागरी प्रक्रिया संहितेच्या **कलम आदेश २७, ओ.व्ही.आरआर. १, ५, ७ आणि ८ आणि** O.VIII, r.9 अंतर्गत तक्रारीचे उत्तर देण्यासाठी समन्स.

**१. कुमुदिनी शाम सुभेदार** ]
वय : ७३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी भारतीय रहिवासी, राहणार श्री बंगला, अक्षय सोसायटी समोर, शिवाजी नगर, चेंदेरे, अलिबाग, रायगड–४०२ २०१.
**२. विनय लक्ष्मीकांत पडते** ]
दिवंगत सरोजनी लक्ष्मीकांत पडते यांचा मुलगा वय : ५६ वर्षे, व्यवसाय : व्यापार भारतीय रहिवासी, राहणार – फ्लॅट क्र.७०१ बी, मिरांडा अपार्टमेंट, बी. एस. मार्ग, दादर, मुंबई– ४०० ०२८ **... वादी**

**विरुद्ध**

**१. रेक्सॉन डेव्हलपर्स एलएलपी** ]
(औपचारिकरित्या नीलम रियल्टी एलएलपी म्हणून ओळखले जाते) ही मर्यादित दायित्व भागीदारी आहे जी मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, २००८ च्या तरतुदी अंतर्गत नोंदणीकृत आहे ज्याचा पत्ता – युनिट क्र.७०२, ७ वा मजला, हबटाउन सोलारिस, एन. एस. फडके रोड, साईवाडी, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०० ०६९.
**२. अनय इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड** ]
सदर कंपनी कायद्य २०१३ च्या तरतुदी अंतर्गत नोंदणीकृत एक खाजगी मर्यादित कंपनी आहे, ज्याचा नोंदणीकृत कार्यालय पत्ता युनिट क्र. ८०१, ८ वा मजला, हबटाउन सोलारिस, एन.एस. फडके मार्ग, ऑफ तेली गल्ली, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००६९
**३. निर्मला मंत्री** पूर्वीचे नाव ]
निर्मला वसंतराव पठारे स्वर्गीय वसंतराव गणपतराव पठारे यांची कन्या वय : माहिती नाही, व्यवसाय: ज्ञात नाही, पत्ता – ६३, सोलेंट कोर्ट, १२५८ लंडन रोड, नॉर्बरी, लंडन एसडब्ल्यु१६४ईझेड.
**४. सुरेश वसंतराव पठारे** ]
स्वर्गीय वसंतराव गणपतराव पठारे यांचा मुलगा वय : माहिती नाही, व्यवसाय: माहित नाही, पत्ता – ओम दत्ता समाधान बी–१, फ्लॅट क्र.१३, सौदामिनी कॉम्प्लेक्स, पौड रोड, कोथरूड, पुणे – ४११ ०३८.
**५. अरुण जगन्नाथ पठारे** ]
स्वर्गीय वसंतराव गणपतराव पठारे यांचे नातू वय : माहिती नाही, व्यवसाय: माहित नाही, पत्ता – नित्यानंद बिल्डिंग, फ्लॅट क्र.४०२, ''ए'' विंग, चौथा मजला, शम्पोली कस्तूर पार्क, सुवर्ण हॉस्पिटल जवळ, बोरिवली, मुंबई–४०० ०९२.
**६. अनिल जगन्नाथ पठारे** ]
स्वर्गीय वसंतराव गणपतराव पठारे यांचा नातू, वय : ज्ञात नाही, व्यवसाय: ज्ञात नाही , पत्ता –नित्यानंद बिल्डिंग, फ्लॅट क्र.४०२, ''ए'' विंग, चौथा मजला, शम्पोली कस्तूर पार्क, सुवर्ण हॉस्पिटल जवळ, बोरिवली, मुंबई–४०० ०९२.
**७. प्रिया प्रकाश देवरे** पूर्वीचे नाव ]
किशोरी भगवंतराव पठारे
स्वर्गीय भगवंतराव गणपतराव पठारे यांच्या कन्या वय : माहित नाही, व्यवसाय: माहित नाही, पत्ता – २० सी, देवरे हाऊस, ७ वा मजला, भवानी शंकर रोड, कबुतरखाना, दादर (प.) मुंबई – ४०० ०२८.
**८. सुनील पानसरे** ]
कै. स्मिता पूर्वीचे नाव प्रफुल्ल भगवंतराव पठारे यांचे पती कै.भगवंतराव गणपतराव पठारे यांचे जावई वय: माहीत नाही, व्यवसाय: माहीत नाही, पत्ता – ३२, मानलवाडी पंडित निवास २ रा मजला, मंगलवाडी, गिरगाव, मुंबई – ४०० ००४.
**९. सुरेन पांडुरंग पठारे,** ]
कै. पांडुरंग गणपतराव पठारे यांचा मुलगा, वय : माहित नाही, व्यवसाय: माहित नाही, राहणार ए/१२५, फ्लॅट क्र. १, तळ मजला, सेक्टर १९, कोपरखैरणे, वाशी, नवी मुंबई – ४०० ७०९.
**१०. शिवानी दिलीप मुजुमदार** ]
दिपाली दिलीप मुजुमदार पूर्वीची रजनी पांडुरंग पठारे यांची कन्या, कै. पांडुरंग गणपतराव पठारे यांची नात, वय : माहीत नाही, व्यवसाय : माहित नाही, राहणार – एफ– २१, स्वप्नशिल्प, १९२, गणेश नगर, कोथरूड, पुणे– ४११०३८.
**११. प्राची दिलीप मुजुमदार** ]
दिपाली दिलीप मुजुमदार पूर्वीची
रजनी पांडुरंग पठारे यांची मुलगी कै. पांडुरंग गणपतराव पठारे यांची नात. वय : माहीत नाही, व्यवसाय : माहीत नाही, पत्ता एफ–२१, स्वप्नशिल्प, १९२, गणेश नगर, कोथरूड, पुणे–४११०३८.
**१२. मितेश सुनील पठारे** ]
कै. पांडुरंग गणपतराव पठारे यांचा नातू वय: माहीत नाही, व्यवसाय: माहीत नाही, पत्ता – ६७/एच, पठारे बिल्डिंग, एच.जी. रोड, गावदेवी, मुंबई – ४००००७.
**१३. रोहन सुनील पठारे,** ]
कै. पांडुरंग गणपतराव पठारे यांचे नातू. वय: माहीत नाही, व्यवसाय : माहीत नाही, पत्ता – ६७/एच, पठारे बिल्डिंग, एच जी. रोड, गावदेवी, मुंबई – ४००००७ .
**१४. मंजुला प्रभाकर पठारे,** ]
कै. प्रभाकर गणपतराव पठारे यांच्या पत्नी, वय: माहीत नाही, व्यवसाय: माहीत नाही, पत्ता – १२०१, सिद्धगिरी इमारत, डी. के. सांडू रोड, चेंबूर, मुंबई – ४०००७१.
**१५. राजन प्रभाकर पठारे,** ]
कै. प्रभाकर गणपतराव पठारे यांचा मुलगा, वय: माहिती नाही, व्यवसाय: माहीत नाही, पत्ता – १२०१, सिद्धगिरी बिल्डिंग, डी.के. सांडू रोड, चेंबूर, मुंबई – ४०० ०७१.
**१६. सीना एस. नाईक** पूर्वीची सीना ]
प्रभाकर पाठारे कै. प्रभाकर गणपतराव पठारे यांची कन्या वय: माहीत नाही, व्यवसाय: माहीत नाही, पत्ता – उद्यान दर्शा, तळमजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५.
**१७. हेमंत जयवंत सहानी,** ]
कै. सुमती जयवंत सहानी यांचा मुलगा, वय: माहीत नाही, व्यवसाय: माहीत नाही, पत्ता – ए/३०२ द्वारका माई सीएचएस, पन्नालाल घोष रोड, सोमवारी बाजाराजवळ, मालाड (प.), मुंबई – ४०० ०६४.
**१८. सचेत सतीश देसाई** ]
समीता सतीश देसाई यांचा मुलगा आणि कै. सुमती जयवंत सहानी यांचे नातू वय : माहिती नाही, व्यवसाय: माहिती नाही, पत्ता बी/३०२ द्वारका माई सीएचएस, पन्नालाल गोष रोड, सोमवारी बाजाराजवळ, मालाड (प.), मुंबई – ४०० ०६४.
**१९. उदय घानेकर** ]
कै. सुमती जयवंत सहानी यांचे जावई वय : माहिती नाही, व्यवसाय : माहित नाही, पत्ता – ११८/३, आनंद भवन, पन्नालाल घोष रोड, हरिश्वर अपार्टमेंट समोर, ए विंग, मालाड (प.), मुंबई – ४०० ०६४.
**२०. पार्थिवी सुजय पवार** ]
कै. सुमती जयवंत सहानी यांची नात : वय: माहीत नाही, व्यवसाय : माहीत नाही, पत्ता – ११८/३, आनंद भवन, पन्नालाल घोष रोड, हरिश्वर अपार्टमेंट समोर, ए विंग, मालाड (प), मुंबई – ४०० ०६४.
**२१. शैलेंद्र जयवंत सहानी** ]
स्वर्गीय सुमती जयवंत सहानी यांचे पुत्र वय : माहिती नाही, व्यवसाय : माहित नाही, पत्ता – ४०१, राजहंस सोसायटी लिमिटेड, नरिमन रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०५७.
**२२. जय रामेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड** ]
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतुदीनुसार नोंदणी क्र. बीओएम/एचएसजी/३५४९ / १९७२ अंतर्गत नोंदणीकृत सोसायटी आहे ज्याचे नोंदणीकृत कार्यालय कामत्स क्लबच्या समोर, एस. व्ही. रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई – ४०० ०६२ येथे आहे.
**...प्रतिवादी**

प्रति,
५. अरुण जगन्नाथ पठारे
६. अनिल जगन्नाथ पठारे
२२. जय रामेश्वर सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेड वर उल्लेख केलेला प्रतिवादी :
२०.११.२०२५ च्या आदेशानुसार

**ज्याअर्थी,** वर उल्लेख केलेल्या वादींनी तुमच्या विरुद्ध सदर माननीय न्यायालयात तक्रार दाखल केली आहे, ज्यापैकी खालील संक्षिप्त विधान आहे : –

**म्हणून वादी प्रार्थना करतात :**

(अ) माननीय न्यायालयाला असे घोषित करण्यास आनंद होत आहे की, येथे वादी हे स्वर्गीय शामराव गणपतराव पठारे यांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांना दाव्याच्या मालमत्तेत १३.३२% हिस्सा हक्क, अधिकार आणि हितसंबंध मिळण्यास संयुक्तपणे हक्क आहे. म्हणजेच (१) सर्व्हे क्र. ४०८ (भाग), सी. टी. एस. क्र. १३८५अ, ९१८अ, ३८२ आणि १३८५ब असलेल्या अकृषिक जमिनीचा तो सर्व भागआणि विभाग, जो वांद्रे जिल्हा मुंबई उपनगराच्या नोंदणी उपजिल्हयातील मौजे पहाडी तालुका दक्षिण सालसेट येथे स्थित असून, मापित ६७३२ चौरस यार्ड (म्हणजे ५६५३.९८ चौरस मीटर) आहे (प्रमाणात मनोरंजनात्मक खुल्या जागेसह) जागा) अधिक (२) सीटीएस क्र.१३८५ बी मोजमापित क्षेत्रफळ १६४ चौरस यार्ड जे १३७.१० चौरस मीटर किंवा त्याच्या आसपास आहे आणि ते एस. व्ही. रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई – ४०० ०६२ येथे आहे आणि विशेषतः फिर्यादीच्या प्रदर्शन ''ए'' मध्ये दर्शविलेले आहे;

(ब) हे माननीय न्यायालय असे घोषित करण्यास आनंदित आहे की, येथे **गुंडेचा रेक्सन सूट्स** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन इमारतीतील प्रस्तावित फ्लॅट्स/युनिट्स/खोल्यांमध्ये वाद्यांना हक्क, अधिकार आणि हितसंबंध आहेत. (१) बांद्रा जिल्ह्याच्या मुंबई उपनगरातील नोंदणी उपजिल्हा, मौजे पहाडी तालुका दक्षिण सालसेट येथे स्थित सर्व्हे क्रमांक ४०८ (भाग), सी. टी. एस. क्रमांक १३८५अ, ९१८अ, ३८२ आणि १३८५ब या सर्व बिगर–कृषी जमिनीच्या अंगीकृत भागावर बांधले जाणार आहेत. (म्हणजेच ५६५३.९८ चौ. मीटर) (प्रमाणात मनोरंजनात्मक खुल्या जागेसह) अधिक (२) सीटीएस क्र. १३८५ब या जागेचा भाग असलेले क्षेत्र मोजमापत १६४ चौरस यार्ड जे १३७.१० चौरस मीटर किंवा त्याच्या आसपास आहे जे एस. व्ही. रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई – ४०००६२ येथे दाव्याच्या मालमत्तेतील त्यांच्या १३.३२% वाट्याच्या मर्यादेपर्यंत आहे;

(क) हे माननीय न्यायालय प्रतिवादी क्र. १ आणि २ ला **गुंडेचा रेक्सन सूट्स** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन इमारतीमध्ये अशा विक्रीयोग्य घटकाचे हस्तांतरण करून आणि/किंवा वाटप करून वाद्यांना भरपाई देण्याचे आदेश आणि/किंवा निर्देश देईल, जो प्रचलित बाजार दराने दाव्याच्या मालमत्तेतील वाद्यांच्या १३.३२% वाट्याच्या मूल्याच्या मर्यादेपर्यंत असेल आणि वाद्यांच्या बाजूने त्या आशयाचा दस्तऐवज अंमलात आणेल;

(ड) प्रार्थना कलम (क) व्यतिरिक्त, हे माननीय न्यायालय प्रतिवादींना वादींना दाव्यातील मालमत्तेतील वाद्यांच्या १३.३२% हिस्सा बेकायदेशीर हस्तांतरण आणि/किंवा संपादनासाठी १३.३२% हिस्सा प्रचलित बाजार मूल्य म्हणून रु. ९,००,००,०००/– (नऊ कोटी रुपये फक्त) देण्याचे आदेश, डिक्री आणि/किंवा निर्देश देईल.;

(ई) हे माननीय न्यायालय प्रतिवादींना संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे प्रतिवादी क्र. १ आणि २ च्या ताब्याच्या तारखेपासून वादीच्या संमतीशिवाय वादीला जोडलेल्या निशाणी ''ए'' मध्ये नमूद केलेल्या १३.३२% हिस्सा बेकायदेशीर आणि बेकायदेशीर वापर, हस्तांतरण आणि कब्जा करण्यासाठी येथे वाद्यांना जोपर्यंत वाद्यांना त्यांच्या १३.३२% हिस्सा भरपाई मिळत नाही तोपर्यंत दरमहा @ रु. २,००,०००/– रुपये भरपाईची रक्कम देण्याचे आदेश, डिक्री आणि निर्देश देत आहे.

(एफ) खटल्याची सुनावणी आणि अंतिम निकाल येईपर्यंत, प्रतिवादी क्र १ आणि २ ला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम १५१ च्या आदेश XXXIX नियम १ आणि २ अंतर्गत, कोणत्याही कृती, प्रक्रिया किंवा गोष्टीवर कोणत्याही प्रकारे अवलंबून राहण्यापासून/कार्यरत राहण्यापासून आणि/किंवा अंमलात आणण्यापासून प्रतिबंधित केले आहे आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम १५१ च्या आदेश XXXIX नियम १ आणि २ अंतर्गत, या माननीय न्यायालयाने दिलेल्या मनाई आदेशाद्वारे, दाव्याच्या मालमत्तेवर बांधल्या जाणाऱ्या **गुंडेचा रेक्सन सूट्स** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन इमारतीतील फ्लॅट्समध्ये ताबा देण्यापासून, वेगळे करण्यापासून, अडचणीत आणण्यापासून आणि/किंवा विक्रीसाठी इतर कोणत्याही करारात प्रवेश करण्यापासून किंवा दाव्याच्या मालमत्तेतील त्यांच्या १३.३२% वाट्याच्या मूल्याच्या मर्यादेपर्यंत विक्री करण्यापासून प्रतिबंधित केले आहे;

(जी) सदर खटल्याची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असताना, हे माननीय न्यायालय **गुंडेचा रेक्सन सूट्स** नावाच्या नवीन इमारतीत बांधल्या जाणाऱ्या फ्लॅट्सच्या संदर्भात दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश दङ अंतर्गत सर्व अधिकारांसह कोर्ट रिसीव्हर नियुक्त करण्यास आनंदित आहे, जो या वाद्यांच्या दाव्याच्या मालमत्तेतील १३.३२% हिस्सा किमतीच्या मर्यादेपर्यंत असेल आणि या माननीय न्यायालयाला योग्य वाटेल त्या फ्लॅट्सचे व्यवस्थापन, संरक्षण, जतन आणि/किंवा सुधारणा करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार प्रदान करेल.

(एच) सदर माननीय न्यायालयाची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असताना, प्रतिवादींना दाव्याच्या मालमत्तेतील १३.३२% हिस्सा किमतीच्या मर्यादेपर्यंत सुरक्षा प्रदान करण्याचे निर्देश देण्यास आनंदित आहे.

(आय) वरील विनंती केलेल्या (एफ) ते (एच) च्या संदर्भात अंतरिम सवलती;

(जे) दाव्याचा खर्च;

(के) खटल्याच्या स्वरूप आणि परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या इतर आणि पुढील सवलतींसाठी.

**समन्स बजावल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, तुम्हाला स्वतः किंवा एखाद्या वकिलाद्वारे या न्यायालयात हजर राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे,** जो दाव्याशी संबंधित सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल, किंवा ज्याच्यासोबत उपरोक्त नावाच्या वादीला उत्तर देण्यासाठी अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशी व्यक्ती असेल, आणि खटला अंतिम निकालासाठी निश्चित करण्यात आला असल्याने, तुम्ही तुमचे सर्व साक्षीदार हजर करावेत आणि तुम्हाला येथे हे लक्षात घ्यावे लागेल की तुम्ही उपस्थित न राहिल्यास, तुमच्या अनुपस्थितीत खटल्याची सुनावणी आणि निर्णय घेतला जाईल; आणि तुम्ही तुमच्या ताब्यातील किंवा अधिकारातील कोणतेही कागदपत्रे आणाल ज्यामध्ये वादीच्या केसच्या गुणवत्तेशी संबंधित पुरावे असतील किंवा ज्यावर तुम्ही तुमच्या केसच्या समर्थनार्थ आणि विशेषतः वादीच्या/वादींसाठी अवलंबून राहू इच्छिता त्या कागदपत्रांवर अवलंबून राहावे:

माझ्या हास्ते आणि सदर माननीय न्यायालयाच्या शिक्यानिशी दिलेले.
दिनांक २७ नोव्हेंबर २०२५

**सही/–**
**मोहोरकार**
दिनांक २७ नोव्हेंबर २०२५

(शिक्का)

**सही/–**
**रजिस्ट्रारसाठी**
**मुंबई शहर दिवाणी न्यायालय, दिंडोशी**

**पटेल असोसिएट्स मार्फत वकील**
**सज्जाद एच. पटेल**
**अलिझैन एस. पटेल**
वादीचे वकील
दुकान क्र. ४/५, ४० ई.एम.एम. रोड, खडक, मस्जिद बंदर मुंबई – ४०० ००९
मोबाईल: ९८२०१०३२१९ ईमेल : advpatel@rediffmail.com, उच्च न्यायालय ओ. एस. रजि. क्र.४१३०.
ॲडव्होकेट कोड : I५७१६

**''तुम्हाला याद्वारे कळिवण्यात येते की, राज्य कायदेशीर सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय कायदेशीर सेवा समिती, जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरण आणि तालुका कायदेशीर सेवा समिती यांच्याकडून पात्रता निकषांनुसार मोफत कायदेशीर सेवा तुमच्यासाठी उपलब्ध आहे आणि जर तुम्ही पात्र असाल आणि मोफत कायदेशीर सेवा मिळवू इच्छित असाल, तर तुम्ही वरीलपैकी कोणत्याही कायदेशीर सेवा प्राधिकरण/समितीशी संपर्क साधू शकता.''**

**स्वाक्षरी/–**
**वादी करीता वकिल.**

**टीप :** सदर दाव्यातील पुढील तारीख **०९/१२/२०२५** आहे. कृपया शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय, जिल्हा न्यायालय, मुंबईच्या अधिकृत वेबसाइटवर या दाव्याची स्थिती आणि पुढील/पुढील तारीख तपासा.

Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# त्रिगुणात्मक त्रैमूर्ती...

**भारतात** सर्वत्र श्री दत्तजयंती अतिशय उत्साहात आणि श्रद्धेने साजरी होते. कारण सर्व संप्रदायांनी दत्तात्रेयांना मानाचे स्थान दिले आहे. दत्त देवता ही चिरंजीव आहे. कारण तिच्यामध्ये असणारे गुरुतत्त्व हे अत्यंत श्रेष्ठ आणि विश्ववंद्य आहे. 'दत्त' या शब्दाचा अर्थ भरपूर ज्ञान देणारा, ज्ञानाला सक्रिय करणारा, सक्रियतेला आचार संपन्न करणारा आणि आचार संपन्नतेला राष्ट्र सेवेच्या कोंदणात बसवणारा म्हणून दत्तप्रभुही स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा त्रिवेणी संगम आहे. दत्तात्रेयांची तीन शीरे ही तीन तत्त्वे आहेत. एक आत्मतत्त्व, दुसर ज्ञान तत्त्व आणि तिसरे विज्ञान तत्व. म्हणून दत्तप्रभुंनी सगळ्यांना आत्मज्ञानाच्या वाटा मोकळ्या करून दिल्या. त्यांनी आपला अवतार बहुजनांच्या कार्यासाठी वेचला. त्यांच्या ज्ञानार्जनाच्या कक्षा व्यापक होत्या. माणूस हा त्यांचा अंतरिक्ष होता. माणूस संपन्न झाला पाहिजे, तो विचारशील असला पाहिजे, तो कधीही पूर्वग्रहदूषित नसावा. त्याला जे आवडेल ते त्याने करावे. फक्त त्याच्या कृतीशीलतेला शीलाचे अधिष्ठान असावे. त्याचे ज्ञान समाजाच्या आणि राष्ट्राच्या उपयोगी पडले पाहिजे. म्हणून त्यांनी आयुष्यभर आत्मतत्त्वाचा शोध अखंड घेतला.

'गुरुब्रह्मा, गुरुविष्णू गुरुदेवो महेश्वरः' असे आपण म्हणतो. ब्रह्म म्हणजे ज्ञान, विष्णू म्हणजे ध्यान आणि शिव म्हणजे गान. ज्ञान, ध्यान आणि गान यांची त्रिपुटी जाणीवेच्या खोलीला जेव्हा संपन्न करते, तेव्हा गुरुतत्त्वाचे वेगळे भान येते. म्हणून दत्तप्रभुंनी आत्मशोधार्थ २४ गुरू केले. दत्तात्रेयांचे हे गुरू म्हणजे, प्रत्येक जीवनमूल्याचे यथार्थ भान आहे. दतात्रेयांचे २४ अवतार झाले आहेत.

*जो जो जयाचा घेतला गुण।*
*तो तो म्या गुरू केला जाण।।'*

ही भावना दत्तप्रभूंबद्दल संत वाङ्मयामध्ये उमटलेली आहे. वेदांनी आणि उपनिषदांनी गुरुतत्त्वाचा शोध महत्त्वाचा मानला आहे. ऋषी-मुनींनी गुरुकुलाची स्थापना करून ज्ञानसाधना ही परब्रह्माची उपासना आहे असे मानले आहे. दत्तप्रभुंनी केवळ तीर्थयात्रा केल्या नाहीत तर लोकांची दुःखे दूर केली, लोकांना सन्मार्गाला लावले. लोकांनी आचारसंपन्न व्हावे म्हणून त्यांनी आपल्याला स्वतःला संपन्न केले. दत्त परंपरा कर्मकांडाच्या बाबतीत एका बाजूला तीव्र आहे, पण दत्तप्रभुंनी लोकांसाठी विविध प्रकारच्या लीला केलेल्या आहेत. दत्त परंपरेत उपासनेला महत्त्व आहे आणि ज्ञानालाही महत्त्व आहे. म्हणून दत्त परंपरेमध्ये श्रीपाद श्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती, श्री स्वामी समर्थ, मेहेरबाबा यांसारखी एक श्रेष्ठ परंपरा निर्माण झालेली आहे. औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर आणि माहूर ही दत्तक्षेत्रे महत्त्वाची मानली जातात. कारंजा, अक्कलकोट, गाणगापूर यांसारख्या तीर्थक्षेत्रांना, पीठापूर आणि कुरवपूर यांसारख्या उपासना क्षेत्रांना, कर्दळीवनाच्या संस्मरणाला आज महत्त्वाचे स्थान आहे. हजारो लोक कर्दळीवनाची यात्रा करतात. या साऱ्यातून एक वेगळ्या प्रकारचे समाधान मिळते. असे समाधान आजच्या संगणकात उपलब्ध नाही.

दत्तप्रभुंनी सामान्य माणसाला सुरेख अनुभवाचा मंत्र दिला आहे. तो म्हणजे, 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'. यापैकी पहिल्या दिगंबराचा अर्थ दिशा होऊन आपल्या क्षितिजाकडे झेप घेणे हा आहे. जो दिशा होतो, मार्ग दाखवतो आणि स्वतःचे क्षितीज निर्माण करतो आणि दिशा हेच ज्याचे वस्त्र आहे त्याला दिगंबर म्हणतात. दुसऱ्या दिगंबराचा अर्थ जो ज्ञानाच्या आणि सत्क्रियेच्या ध्यासातून आपले स्वतंत्र आकाश निर्माण करतो आणि ते लोकांना देतो किंवा लोकांच्या आनंदासाठी ते उपयोगी पडते त्याला दिगंबर म्हणतात. श्रीपाद म्हणजे ज्ञान आणि ऐश्वर्य यांचा संगम. या दोन्हीही गोष्टी स्वच्छ मनाच्या तळाशीच फुलतात आणि वल्लभ म्हणजे भक्तीची श्रेष्ठता आणि शेवटचा दिगंबर म्हणजे इंद्रियांवर विजय मिळविणारा. दत्तप्रभुंनी या एका सूत्रातून तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगितलेल्या आहेत. एक म्हणजे आपण आत्मसमाधानाला जपले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे ज्ञानात कधीही खंड पडता कामा नये आणि तिसरी गोष्ट म्हणजे अभ्यास आणि आचारसंपन्नता हे आपले दोन महत्त्वाचे दागिने आहेत हे लक्षात घ्यावे. म्हणून दत्तपरंपरा आजही वंदनीय आहे. गुरुतत्त्व चिरंजीव आहे. त्याचा महोत्सव करणे आणि त्या तत्त्वाचे स्मरण करणे हा आपल्या जगण्याचा हेतू आहे. म्हणून दत्तजयंती साजरी करावयाची असते. महानुभावांच्या परंपरेत दत्तप्रभुंना स्थान आहे, नाथ परंपरेत दत्तप्रभूंना स्थान आहे, वारकरी परंपरेतही आहे, एकनाथांनी लिहिलेली दतात्रेयांची आरती महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचलेली आहे. वासुदेवानंद सरस्वतींची करुणा त्रिपदी आजही गायली जाते. नाथ परंपरेतही दत्तप्रभुंना सगळ्या नाथांनी मानाचे स्थान दिलेले आहे. दत्तप्रभुंनी समाजातला एकोपा राखून समाज ज्ञान, शील आणि बलसंपन्न व्हावा म्हणून समाजाला सतत प्रबोधनाचे कार्य केले. म्हणून आजही दत्तजयंतीला विशेष महत्त्व आहे.

**सुनिल ल. हिंगणे**



**दत्तजयंतीचा उत्सव संपूर्ण भारतभर साजरा होतो. दत्तप्रभुंनी आत्मशोधार्थ २४ गुरू केले. दत्तात्रेयांचे हे गुरू म्हणजे, प्रत्येक जीवनमूल्याचे यथार्थ भान आहे. 'जो जो जयाचा घेतला गुण। तो तो म्या गुरू केला जाण।।' ही भावना दत्तप्रभूंबद्दल संत वाङ्मयामध्ये उमटलेली आहे. गुरुतत्त्व चिरंजीव आहे. त्याचा महोत्सव करणे आणि त्या तत्त्वाचे स्मरण करणे हा आपल्या जगण्याचा हेतू आहे. म्हणून दत्तजयंती साजरी करावयाची असते. दत्तप्रभुंनी समाजातला एकोपा राखून समाज ज्ञान, शील आणि बलसंपन्न व्हावा म्हणून समाजाला सतत प्रबोधनाचे कार्य केले. म्हणून आजही दत्तजयंतीला विशेष महत्त्व आहे.**

## श्री दत्तात्रेयांची प्रमुख तीर्थक्षेत्रे

**माहूर :** रेणुकामातेचे मूळ शक्तिपीठ असणारे नांदेड जिल्ह्यातील माहूर हे क्षेत्र श्रीदत्तात्रेयांचे अवतार स्थान आहे. अनुसया मातेची सत्त्वपरीक्षा पाहण्यासाठी भूतलावर आलेल्या ब्रह्मा,विष्णू आणि महेश या दैवत्रयींनी संतुष्ट होऊन याच ठिकाणी त्यांच्या पुत्राच्या रूपाने दत्त अवतार धारण केला. या क्षेत्रास दत्तात्रेयांचे विश्रांतीस्थान असेही म्हटले जाते. या ठिकाणी अनसुया मातेचे मंदिरही आहे. येथे निवासासाठी भक्तनिवास उपलब्ध आहे.

**गिरनार :** गुजरात राज्यात सौराष्ट्र प्रांतात जुनागड शहरापासून हे स्थान २ किमी अंतरावर आहे. याच ठिकाणी श्रीदत्तात्रेयांनी गोरक्षनाथांना अनुग्रह दिला. हे स्थान उंच पर्वतावर असून, या ठिकाणी जाण्यासाठी ९९९९ पायऱ्या चढून जाव्या लागतात. ह्या ठिकाणी दत्तात्रेयांच्या पादुका स्थापित आहेत. इथे नेहमी दत्तात्रेयांचा निवास असतो. याचा प्रत्यय भक्तांना नेहमी येतो. या ठिकाणी राहण्यासाठी अनेक धर्मशाळा आहेत.

**पिठापूर:** गुरू श्रीदत्तात्रेयांचा मनुष्यरूपी पहिला अवतार असणाऱ्या श्री श्रीपाद श्रीवल्लभ यांचे हे जन्मगाव. आंध्र प्रदेशमधे पूर्व गोदावरी जिल्ह्यात काकिनाड्याजवळ असणाऱ्या पीठापूरला 'पादगया' असेही म्हटले जाते. हे क्षेत्र आहे. आपस्तंब शाखेतील आपलराज आणि सुमती माता या ब्राह्मण दाम्पत्याच्या उदरी श्रीपादांचा जन्म झाला. सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी श्राद्धकर्मासाठी आलेल्या ब्राह्मणांच्या भोजनाच्या अगोदर सुमती मातेने दत्तात्रेयांना भीक्षा वाढली. त्यामुळे संतुष्ट होऊन श्री दत्तात्रेयांनी मी तुझ्या उदरी जन्म घेईन, असा आशीर्वाद सुमती मातेस दिला. जीवनात एकवेळेस या क्षेत्रास जाऊन श्रीपाद वल्लभांचे दर्शन जरूर घ्यावे. या ठिकाणी राहण्यासाठी भक्त-निवास असून, दुपारी १२ वाजता आणि रात्री ८ वाजता महाप्रसादाची व्यवस्था केली जाते.

**कुरवपूर :** कर्नाटकातील रायचूर जिल्ह्यातील कुरवपूरमध्ये श्रीपाद श्रीवल्लभांनी १४ वर्षे वास्तव्य केले. कृष्णा नदीमध्ये असलेल्या एका बेटावर असणाऱ्या या क्षेत्राच्या चोहोबाजूनी पाणी आहे. श्री दत्त अवतारी योगीराज श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबेस्वामी) यांना याच ठिकाणी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या अठरा अक्षरी मंत्राचा साक्षात्कार झाला. याच ठिकाणी वासुदेवानंद सरस्वती यांच्या वास्तव्याने पावन झालेली गुहा आहे. याच ठिकाणी पाचलेगावकर महाराजांना श्रीपाद वल्लभांचा साक्षात्कार झाला. वल्लभपूरम या आश्रमात श्री श्रीपाद वल्लभ स्वामींचा दरबार आहे. याच ठिकाणी श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी सूर्यनमस्कार घालण्यासाठी येत असत.

**कारंजा :** गुरू दत्तात्रेयांचा मनुष्यरूपी दुसरा अवतार असलेले श्री नृसिंह सरस्वती स्वामी यांचे हे जन्मगाव आहे. आजही स्वामींचा ज्या वाड्यात जन्म झाला तो वाडा येथे असून, याच वाड्यात श्री योगिराज वासुदेवानंद सरस्वती (टेंबे स्वामी) यांना श्री नृसिंह सरस्वती स्वामींचा साक्षात्कार झाला होता. श्री वासुदेवानंद सरस्वती यांच्या आज्ञेनुसार (लिलादत्त) श्रीपत ब्रह्मानंद सरस्वती स्वामी महाराजांनी या मंदिराची १९३४ साली स्थापना केली. या ठिकाणी बालस्वरूप श्री नृसिंह सरस्वती स्वामींची मूर्ती आहे. इथे निवासासाठी भक्त निवास असून दुपारी १ वाजता महाप्रसादाची सोय केली जाते.

**नृसिंहवाडी :** महाराष्ट्रातील दत्तभक्तांचे श्रद्धास्थान असणारे, कृष्णा-पंचगंगा नद्यांच्या संगमावरील नृसिंहवाडी हे तीर्थक्षेत्र जगभरात ख्यातकिर्त आहे. सुमारे ७०० वर्षांपूर्वी वसलेल्या नृसिंहवाडीला सद्‌गुरु दत्तात्रेयांचा द्वितीय अवतार असलेले श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांची राजधानी म्हणून ओळखले जाते. श्री नृसिंह सरस्वती स्वामी या क्षेत्री १२ वर्षे राहिले. येथे आजही चौसष्ठ योगिनी वास करतात अशी दत्तभक्तांची धारणा आहे. इथे निवासासाठी देवस्थानचे भक्त-निवास आहे. दुपारी १२ वाजता महाप्रसादाची सोय आहे.

**औदुंबर :** सांगली जिल्ह्यात कृष्णा नदीकाठी वसलेल्या औदुंबराला श्री दत्त संप्रदायात विशेष महत्त्व आहे. हे दत्तक्षेत्र भारतातील अनेक दत्तस्थानांपैकी प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणीही श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे वास्तव्य होते. याच ठिकाणी संत जनार्दन स्वामी, श्री संत एकनाथ महाराज यांना दत्तदर्शन झाले. याच ठिकाणी स्वामींनी औदुंबर वृक्षाचा महिमा सांगितला व माझा नित्य त्या वृक्षामध्ये निवास राहील, असे सांगितले. तसेच या वृक्षाची नियमित पूजा केल्यास आणि त्या वृक्षाखाली बसून गुरूचरित्र पारायण केल्याने कोटी कोटी जन्माचे फळ लाभते.

**गाणगापूर :** कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथे असणारे गाणगापूर हे दत्तसंप्रदायातील प्रमुख तीर्थक्षेत्र. श्री नृसिंह सरस्वती स्वामी यांनी आपल्या २३ वर्षांच्या प्रदिर्घ वास्तव्यासाठी गाणगापूरची निवड केली होती. भीमा आणि अमरजा या नद्यांच्या संगमावर असणाऱ्या गाणगापूरमध्ये पौराणिक काळातील विभूतींनी तपश्चर्या करून, यज्ञ करून आणि काही काळ वास्तव्य करून हा प्रदेश परमपवित्र आणि मंगलकारक केला आहे. या क्षेत्री माधुकरी मागण्याचे फार महत्त्व आहे. दत्त भक्तांची अशी भावना आहे की, आजही दुपारी १२ वाजता श्री नृसिंह सरस्वती भीक्षा मागण्यास गाणगापूरला येतात. येथील मंदिरात स्वामींच्या निर्गुण पादुकांची स्थापना केलेली आहे.

**अक्कलकोट :** 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' असे अभिवचन भक्तांना देणाऱ्या ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थांमुळे अक्कलकोटची महती जगभरात आहे. श्री स्वामी समर्थ महाराज हे दत्तावतारी होते. पंजाब राज्यात पानिपतजवळ छेली या खेडेगावी गणेश मंदिराजवळ जमीन दुभंगून अष्ट वर्षाची मूर्ती प्रकट झाली. त्या मूर्तीने स्वामी समर्थ हा मनुष्यरूपी देह धारण केला. त्यानंतर त्यांनी कर्दळीवनात जाऊन ३०० वर्षे तपश्चर्या केली. ३०० वर्षे तप करताना त्यांच्या अंगावर वारूळ निर्माण झाले. एका लाकूड तोड्याने झाड तोडताना त्याच्या कुऱ्हाडीचा घाव स्वामींच्या मांडीला लागला. त्यामुळे त्यांची तपश्चर्या भंग होऊन स्वामी लोक कल्याणासाठी कर्दळीवनातून बाहेर पडले. फिरत फिरत स्वामी १८४४ साली मंगळवेढ्यास आले. तेथे बारा वर्षे राहून चैत्र शुध्द द्वितीया १८५६ साली अक्कलकोटला आले. अक्कलकोटला त्यांचे वास्तव्य २२ वर्षे म्हणजे त्यांचे समाधी काळापर्यंत होते.

# चंदेरी चवीगम

## 'संकृष्णिकी वस्थुनम्'च्या रिमेकवर शिक्कामोर्तब

**अक्षय** कुमार आणि अनीस बज्मी हे 'संकृष्णिकी वस्थुनम्' या तेलगू चित्रपटाच्या रिमेकसाठी एकत्र येणार असल्याचे समोर आले होते. वेंकटेश, ऐश्वर्या राजेश आणि मीनाक्षी चौधरी यांच्या भूमिकांनी सजलेला हा मूळ चित्रपट श्री वेंकटेश्वरा क्रिएशन्सच्या अनिल रविपुडी यांनी दिग्दर्शित केला होता. याच निर्मिती संस्थेचे प्रमुख शिरिष यांनी गोव्यामधील ५६व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या रिमेकबाबतच्या चर्चांना पुष्टी देताना यामध्ये अक्षय कुमार मुख्य भूमिकेत असेल असे जाहीर केले.



शिरिष यांच्या बॅनरकडून २०२६ मध्ये किमान सहा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. 'संकृष्णिकी वस्थुनम्' या चित्रपटाचे मूळ कथानक पती, पत्नी आणि माजी प्रेयसी यांच्यात घडणाऱ्या गोंधळावर आधारित असून, चित्रपटात असलेली प्रबळ तेलुगू झलक हिंदी प्रेक्षकांसाठी नव्या स्वरुपात मांडली जाणार आहे. दिग्दर्शक अनीस बज्मी यांच्या म्हणण्यानुसार कथानकाचा मुख्य गाभा अबाधित ठेवत सुमारे ६० टक्के नव्या प्रसंगांची भर घातली जात आहे, तर ४० टक्के भाग मूळ कथानकातील प्रमुख घटकांवर आधारित असेल. लेखनमंडळ वेगाने काम करत असून फेब्रुवारी २०२६ मध्ये चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करण्याचे निर्मात्यांचे उद्दिष्ट आहे. शिरिष यांनी आणखी एक महत्त्वाची घोषणा केली की त्यांच्या निर्मिती संस्थेकडून सलमान खान प्रमुख भूमिकेत असलेला नवीन प्रकल्पही लवकरच सुरू होणार आहे. हा चित्रपट वामशी पेडिपल्ली दिग्दर्शित करणार असून त्यांनी मुन्ना (२००७), ब्रिंदावनम् (२०१०), येवडू (२०१४), ऊपिरी (२०१६), महर्षी (२०१९) आणि वारिसू (२०२३) यांसारख्या लोकप्रिय चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. त्यांच्या कथनशैलीला मोठी लोकप्रियता असल्याने सलमानसोबतच्या या प्रकल्पाकडे सिनेवर्तुळात विशेष उत्सुकतेने पाहिला जात आहे.

## 'धुरंधर'वर चालली सेन्सॉरची कात्री



रणवीर सिंगचा 'धुरंधर' येत्या शुक्रवारी प्रदर्शित होत असून चित्रपटाबद्दलचा उत्साह दिवसेंदिवस वाढत आहे. ॲक्शन एंटरटेनर म्हणून चर्चेत असलेल्या या चित्रपटावर सेन्सॉरची कात्री चालली असून रणवीरच्या कारकिर्दीतील हा पहिलाच 'अ' दर्जाचा चित्रपट ठरणार आहे. चित्रपटाची अंतिम लांबी २१४ मिनिटांवर (३ तास ३४ मिनिटे) निश्चित झाली असून गेल्या १७ वर्षांतला हा सर्वाधिक लांबीचा हिंदी चित्रपट ठरणार आहे. यापूर्वी २००८ मध्ये आलेला 'जोधा अकबर' हा सर्वाधिक लांबीचा चित्रपट म्हणून गणला जात होता आणि त्याचा रनटाईमही २१४ मिनिटेच होता.

सेन्सॉर बोर्डाकडून सर्वप्रथम चित्रपटातील हिंदी डिस्क्लेमरसाठी अतिरिक्त व्हॉइसओव्हर जोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत आणि त्यानुसार डिस्क्लेमरचा कालावधी वाढवण्यात आला आहे. तसेच जेथे जेथे पात्रे अमली पदार्थांचे सेवन करताना दिसतात, तेथे अँटी-ड्रग आणि अँटी-स्मोकिंग स्टॅटिक डिस्प्ले जोडण्यात आले आहेत. चित्रपटाच्या सुरुवातीला असलेली काही हिंसात्मक दृश्ये हटवून त्यांच्या जागी योग्य व्हिज्युअल्स दाखवण्यात येणार आहेत. चित्रपटाच्या दुसऱ्या भागातही सीबीएफसीने काही हिंसक प्रसंग कमी करण्यास सांगितले आहे. तसेच एका मंत्री-पात्राचे नाव 'योग्यरीत्या बदलण्याचे' निर्देश देण्यात आले आहेत. याखेरीज एक अश्लील शिवी संपूर्णपणे म्यूट करण्यात आली आहे. सेन्सॉर प्रक्रियेदरम्यान आणखी एक बदल करण्यात आला आहे, तो म्हणजे एंड-क्रेडिट्समध्ये अतिरिक्त संगीत आणि काही नव्या दृश्यांचा समावेश. हे सर्व बदल पूर्ण झाल्यानंतर २ डिसेंबरला चित्रपटाचे सेन्सॉर प्रमाणपत्र निर्मात्यांना देण्यात आले आहे.

## प्रभासच्या चित्रपटाला मिळेनात खरेदीदार

**एका** बाजूला अभिनेता प्रभासचा 'स्पिरिट' हा चित्रपट चित्रीकरण पूर्ण होण्यापूर्वीच तब्बल १६० कोटींना विकला गेला आहे; तर दुसऱ्या बाजूला 'दी राजा साब' च्या रिलीजला जेमतेम महिन्याभराचा काळ राहिलेला असताना त्याची खरेदी करण्यास कोणी तयार नसल्याचे समोर आले आहे. बॉक्स ऑफिस वर्ल्डवाइडच्या माहितीनुसार डिस्ट्रीब्यूटर्स या चित्रपटापासून अंतर ठेवून आहेत. याचे कारण या चित्रपटाचा टीझर आणि ट्रेलर अपेक्षेइतका प्रभाव टाकणारा नव्हता. तसेच प्रभास स्वतःसाठी डिस्ट्रीब्यूशन राईटस्‌वर मोठी मागणी करतात. यांमुळे बहुतेकांनी चित्रपटापासून हात मागे घेतले आहेत. हा चित्रपट ९ जानेवारीला प्रदर्शित होणार आहे.




## साडे सहाशे कोटींची ऑफर नाकारली!

**एस.एस.** राजामौली आणि महेश बाबू यांच्या 'वाराणसी' या महत्त्वाकांक्षी चित्रपटासाठी टीम पूर्ण ताकदीने काम करत आहे. हा चित्रपट केवळ थिएटरमध्येच नाही, तर ओटीटी प्लॅटफॉर्मवरही सर्वात मोठा रिलीज ठरावा यासाठीचे नियोजन सुरू आहे. राजामौलींच्या चित्रपटांना थिएटरसोबतच ओटीटीवरही विलक्षण प्रतिसाद मिळत असल्याने डिजिटल हक्कांसाठी मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. विशेषतः नेटफ्लिक्स आणि ॲमेझॉन प्राइम व्हिडिओ हे दोन्ही प्लॅटफॉर्म्स या चित्रपटाचे हक्क मिळवण्यासाठी बरीच यातायात करत आहेत. नेटफ्लिक्सने ६५० कोटी रुपयांची ऑफर दिली असून भारतीय चित्रपट इतिहासातील ही सर्वात मोठी डिजिटल ऑफर मानली जात आहे. मात्र आश्चर्याची बाब म्हणजे राजामौलींनी हा प्रस्ताव धुडकावून लावला आहे. त्यांनी तब्बल एक हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. या किंमतीमध्ये सर्व भाषांतील डिजिटल हक्क त्या प्लॅटफॉर्म्सना देण्याची त्यांची तयारी आहे.



काहींनी ही मागणी अतिशयोक्त असल्याचे म्हटले आहे, तर काहींच्या मते ५०० ते ६५० कोटी हीदेखील मोठी रक्कम आहे. पण राजामौली यांच्या दृष्टीने 'वाराणसी'चा प्रचंड स्केल, त्यांची स्वतःची ब्रँड व्हॅल्यू आणि जागतिक ओळख या सगळ्यामुळे एक हजार कोटी रुपये ही मागणी योग्य ठरते. अर्थातच हे सर्व प्राथमिक टप्प्यातील अहवाल असून निर्मात्यांकडून कोणतेही अधिकृत निवेदन आलेले नाही. तरीही या आकड्यांकडे दुर्लक्ष करता येत नाही. राजामौली जर ६५० कोटींची ऑफर स्वीकारली तरी हा देशातील सर्वात मोठा ओटीटी करार ठरेल. सध्या सर्वात मोठ्या डिजिटल रिलीजचा विक्रम 'कल्कि २८९८ एडी'कडे आहे, ज्याचे हक्क नेटफ्लिक्स आणि प्राइम व्हिडिओ यांनी मिळून सुमारे ३७५ कोटी रुपयांत विकत घेतले होते.

'वाराणसी'चे डिजिटल हक्कही एकाच प्लॅटफॉर्मला न देता अनेक प्लॅटफॉर्म्सवर विभागून विकले जाऊ शकतात आणि त्यातून निर्मात्यांना मोठी रक्कम मिळू शकते.

रणबीर कपूरच्या 'रामायण'नंतर 'वाराणसी' हा सर्वाधिक बजेट असणारा दुसरा चित्रपट मानला जातो. 'रामायण'चे बजेट जवळपास ४,००० कोटी रुपये आहे, तर 'वाराणसी'ची निर्मिती सुमारे १,३०० कोटी रुपयांत करण्यात येत आहे. त्यामुळे राजामौली चित्रपटाचे हक्क विकूनच बजेटचा मोठा भाग परत मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.


## नेहानं सांगितलं सैफचं 'सिक्रेट'

**बॉलीवूडमध्ये** अनेक स्टार्स असे आहेत ज्यांनी मानसिक शांततेसाठी सोशल मीडियापासून दूर राहणे पसंत केले आहे. काही मोठ्या कलाकारांनी तर सोशल मीडियावर सक्रिय राहिल्यानंतर आपली अकाउंट्स डिलीट केली, तर काहींनी कधीच इंस्टाग्राम किंवा एक्स सारख्या प्लॅटफॉर्मवर पब्लिक अकाउंट तयारही केले नाही. पण अभिनेता सैफ अली खानने यासाठी वेगळाच मार्ग निवडला आहे. तो सोशल मीडियावर आहे, पण एका वेगळ्या ओळखीसह ! यामुळे बहुतांश लोकांना तो ओळखूही येत नाही.



अभिनेत्री नेहा धूपियाने सांगितले की सैफ अली खान आपला हा सीक्रेट अकाउंट वापरून लोकांवर आणि त्यांच्या प्रतिक्रिया, मतांवर शांतपणे नजर ठेवतो आणि इंडस्ट्रीत काय घडत आहे याची माहिती घेत राहतो. 'झूम टीव्ही'सोबतच्या संभाषणात नेहाने सैफसोबतच्या काही वर्षांपूर्वीच्या एका चर्चेची आठवण सांगितली. त्यावेळी सोशल मीडियावर वाढणाऱ्या द्वेषभावाबद्दल सैफने भाष्य केले होते. तिच्या म्हणण्यानुसार, सोशल मीडियावर कोणतेही सार्वजनिक अकाउंट नसले तरी सैफ शांतपणे लोक त्याच्याविषयी काय बोलत आहेत हे पहात असतो. पाच-सहा वर्षांपूर्वी सैफने आपले एक प्रायव्हेट अकाउंट असल्याचे आपल्याला सांगितले होते, असेही नेहा म्हणाली. काळ जसजसा पुढे जाईल तसतशी परिस्थिती इतकी कठोर होईल की सायबर क्राइम विभाग कोण कुठून काय लिहित आहे हे शोधून काढेल असा विश्वासही सैफने व्यक्त केला होता. आज हे प्रत्यक्ष घडताना दिसत आहे.नेहा धूपियाने या मुलाखतीत ट्रोलिंगसोबतच इतर मुद्द्यांवरही मत व्यक्त केले. यामध्ये महिला कलाकारांविरुद्ध एआयचा गैरवापर केला जात असल्याचा मला खूप राग येतो, पण आता मी अशा टप्प्यावर आले आहे की मला फरकच पडत नाही असे नेहा म्हणाली.

# नवाकाळ शब्दकोडे-१४५०



**आडवे शब्द –**

१. जवळची व्यक्ती ५. मानवसदृश आणि उंच वानराची जात ९. वडाच्या झाडाचे एक वैशिष्ट्य १२. छोटी भाकरी, चांदकी १४. लहान मुलांमध्ये कानांच्या खालच्या बाजूला गालांवर येणारी वेदनादायक सूज १६. मेहनत, श्रम १७. साडीचा पदर १८. कट, कारस्थान २०. तुळशीच्या काडीला वात गुंडाळून केलेला काकडा २२. लोभ, मोह २४. तल्लीन, रमलेला २५. फत्ते, सरशी २६. पूर्वी झाला नाही, पुढे होणार नाही असा विलक्षण ३०. गाण्याची तान ३२. श्रीधरस्वामींनी रचलेला कृष्णभक्तिपर ग्रंथ ३५. कंबर ३६. आयुर्वेदिक औषधाचा अर्क ३७. मनाविरुद्ध ३८. शेवट, मावळणे ३९. टाकाचे, फौंटन पेनचे टोक ४०. साधन, आयुध ४१. लबाड, ठक ४२. झाडाचा बुंधा ४३. फसवणूक ४४. जेवताना भाजी वाढून घेण्याचे साधन ४५. झपाटा, वेग ४६. उपाय, तुलना, पर्याय ४७. प्रार्थना ४८. खरे, सत्य ४९. प्रेत ५०. झाडाचा जमिनीजवळचा भाग ५१. वकिलाचे कूळ ५२. पावसाची झड ५३. मदनाची स्त्री ५४. विहीर ५५. थेट, परस्पर ५७. पाणी, नीर ५९. त्रिफळा चूर्णातील एक औषधी ६०. टरफलासहित तांदूळ ६२. जमीन भाजणे ६३. सहाणेवर उगाळलेले आयुर्वेदिक औषध, चाटण ६४. पोळी, भाकरी भाजण्याचा पत्रा ६५. मनात आलेली शंका, अशुभ शंका ६७. नेत्र, डोळे ६९. नातू ७०. सरहद्द, मुलींचे एक नाव ७१. पतीची दुसरी बायको ७३. गावाभोवतीची भिंत ७४. लायकी, अर्हता ७७. खड्डा ७९. हनुमानाची आई ८०. आधण ८२. न्याहारी ८३. पराभव ८४. मासे पकडण्याचे मोठे जाळे ८५. यौवन, युवावस्था ८७. वेदना ८८. बातमी, वार्ता ९०. रुची, स्वारस्य ९२. पातळ पदार्थ ९३. अवसान, आवेश ९४. अंकुर, चिल्लर ९५. गोधडी ९६. योग्य, उचित ९७. दागिने घडवण्याची मजुरी ९८. दुर्लक्ष ९९. किंचित, थोडेसे १००. बांबू, वेळू १०१. वाळवंट

**उभे शब्द –**

२. खिन्न, दुःखी ३. पिता, बाप ४. जेव्हा, ज्या वेळी ५. ओसरी, सोपा ६. आरोळी ७. घोडागाडी ८. गोंगाट, कोलाहल ९. प्रतिपदा १०. पीडा, कटकट ११. बोध, समज १३. चामखीळ १५. पुंडावा, टगेगिरी १७. पवित्र, पुनीत १८. मालकाचा हस्तक १९. राजाचा अमात्य २१. पुत्र २२. कौशल्य २३. टीकाकार २७. उपासमारीने मरण पावलेला २८. देवी २९. पेच, अडचण ३१. पिवळ्या सालीचे स्वस्त व पौष्टिक फळ ३२. हात ३३. विकासाच्या मार्गावर असलेला (देश) ३४. जेमतेम, बेताचा ३८. अडथळा, रोखणे ३९. जन्म, जनन ४०. आपुलकी, आस्था ४१. चबढब, ढवळाढवळ ४२. उशीचे कव्हर ४७. उपसागराहून लहान जलाशय ४८. रंग बदलणारा प्राणी ४९. बुद्धी, अक्कल ५१. चमत्कारिक, विचित्र ५२. संग, साहचर्य ५३. उपवासाचा गोडसर कंद ५४. खोटा आरोप ५६. छोटे तालवाद्य ५८. श्वान ५९. योजना, मनसुबा ६०. सगळे ६१. जपानी काव्यप्रकार ६२. कारखान्यातली थर्ड शिफ्ट ६३. आईचा भाऊ ६५. पाषाण ६६. दुही, फाटाफूट ६७. लोणी ६८. रक्तवाहिनी ७०. पांढरा गर व काळ्या बिया असलेले गोड फळ ७२. अधाशीपणा, अतृप्ती ७३. सागराच्या लाटांचा आवाज ७५. संपर्क, संवाद ७६. कपाळ फुटणे ७८. केशरी रंगाचा कंद ७९. मंगळ ग्रह ८०. उचापतखोर ८१. करुणा ८६. आरंभ ८७. चषक ८९. सबब, खोटे कारण ९१. धातूची कांब, गज ९३. नियंत्रण ९५. खस ९७. गुहा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४४९ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. प्रथा ४. सत्यापलाप ८. अवा १०. पितामह १३. स्थितीस्थापकत्व १५. रगड १६. लढत १८. मरगळ २०. तेजाब २१. मारेकरी २२. जड २४. झळ २५. बघे २६. तगारी २९. रबडी ३०. जादा ३२. पाहुणेर ३४. घेणेकरी ३७. मिथ्या ३८. बस्ता ३९. द्वार ४०. पाट ४१. तंबी ४२. नंदिनी ४४. अंधकार ४६. वपा ४७. नट ४८. भगवा ४९. रोग ५०. बाजारभाव ५२. मग्न ५३. मरण ५४. काकी ५५. जाजम ५६. वश ५७. निखारा ५८. टोळी ५९. भागवत ६१. साकव ६३. वाकस ६५. जहर ६७. तम ६८. रम्य ६९. अळू ७०. हय ७२. यातनादायक ७४. तगादा ७६. खप ७७. अनवरत ७९. मन ८०. वाया ८२. इतमाम ८३. जमा ८५. दिवाभीत ८६. बोलवा ८९. त्रयस्थ ९१. शान ९२. रेघ ९४. घाई ९५. संमेलन ९८. मात ९९. भोजनभाऊ १०१. अतिथी १०२. नाविन्य १०३. नळी १०४. नकली १०५. पदपथ १०६. ताठा

**उभे शब्द** : १. अस्थिपंजर २. प्रस्थान ३. थाप ४. सत्वर ५. परळ ६. लाग ७. पडते घेणे ८. अलबत ९. वाढ ११. ताटकळणे १२. हरी १४. कमळजा १७. तमारी १९. गर्दी २३. डबलबी २५. बहुविध २७. गाय २८. किरीट ३१. दामिनी ३३. रबर ३४. घेर ३५. कपाट ३६. अनंग ३९. द्वापारयुग ४१. तंटा ४३. दिवाणखाना ४४. अंगरक्षक ४५. काबू ४६. वजा ४७. नवजात ४८. भग्न ४९. रोम ५०. बाकी ५१. धामधूम ५२. मशक ५४. काळीज ५६. वसाहत ५९. भारत ६०. वरदान ६२. वरदा ६३. वाळू ६४. सहनशील ६६. हयात ६७. तकवा ६९. अपमान ७१. यव ७३. नाममात्र ७५. गाडीवान ७६. खत ७८. रघू ८१. यातायात ८२. इतरेजन ८४. प्रस्थ ८५. दिशाहीन ८६. बोई ८७. वासंतिक ८८. भूत ९०. यदुनाथ ९३. घन ९४. घाऊक ९७. नरद ९८. मान्यता १००. भान

## फडणवीस सरकारने अतिवृष्टीबाबतचा अहवाल केंद्राला पाठवलाच नाही!

पान १ वरून

राज्य सरकारने कर्जमाफी संदर्भात परदेशी यांची समिती नेमली. या समितीला एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अहवाल देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यानुसार एप्रिलमध्ये अहवाल राज्यसरकारकडे आल्यावर निधीबाबतचा अहवाल आम्ही केंद्राला पाठवणार आहोत. सध्या माहिती संकलनाचे काम सुरु आहे. तो अहवाल आल्यावर आम्ही केंद्राला प्रस्ताव पाठवू. यामध्ये केंद्राची मदत मिळाली तर चांगली गोष्ट आहे. पण ३० जून पूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल. राज्य सरकार दिलेले आश्वासन पूर्ण करण्यास बांधील आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लोकसभेत जी प्रश्नोत्तरे येतात ती ३५ दिवस अगोदर दाखल केलेली असतात. महाराष्ट्र शासनाकडून कृषीसंदर्भातील अहवाल केंद्राला अहवाल गेला आहे.केंद्राने दोन वेळा पाहणी पथक पाठवले. त्या पथकांनी त्यांचा पाहणी अहवाल दाखल केला आणि आता आपला अहवाल अंतिम टप्प्यात आहे. या अतिवृष्टीत जी दळणवळणाची हानी झाली त्याबाबत केंद्र सरकारचे पथक यायचे आहे. हे पथक बहुदा पुढील आठवड्यात येईल, ते पाहणी करील, अहवाल देईल. त्यानंतर आम्ही दळणवळण नुकसानीचा अहवाल केंद्राला पाठवू . शेतीबाबत अहवाल आम्ही आधीच पाठवला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रस्ताव पाठवल्याचे जाहीर केल्यानंतर कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकार परिषद घेऊन आधीच्या वक्तव्याला घूमजाव करत स्पष्टीकरण दिले की,शासनाने ज्या प्रकारे पॅकेज जाहीर केले होते त्यानुसार मदत देण्यास सुरुवात केली आहे.काल केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांनी अतिवृष्टीचा अहवाल न पाठवल्याचे विधान केले. परंतु मागच्या आठवड्यात हा प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयातील मदत पुनर्वसनच्या माध्यमातून केंद्र सरकारला पाठवला आहे. अद्याप केंद्राची मदत रक्कम आपल्याला मिळालेली नाही. परंतु केंद्राची मदत मिळेल या अपेक्षेवर राज्यशासनाने शेतकऱ्यांना मदत दिली आहे. जी मदत बाकी आहे ती निश्चितपणे शेतकऱ्यांना देण्यात येईल. केंद्राला कोणताही प्रस्ताव पाठवताना अचूक गेला पाहिजे. शेतीसह, घर, पशुधन असे जे सर्व प्रकारचे नुकसान झाले ते एकत्रित करून मदत पुनर्वसनच्या माध्यमातून केंद्राला अहवाल पाठवला जातो. त्यानुसार गेल्या आठवड्यात हा प्रस्ताव पाठवला आहे.

केंद्रीय कृषिमंत्री खोटे बोलले का? असे विचारता भरणे म्हणाले की केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह खोटे बोलले नसावे. कदाचित प्रस्ताव त्यांच्यापर्यंत पोहचला नसावा.केंद्राच्या मदतीची वाट पाहत राज्याने शेतकऱ्यांची मदत थांबवलेली नाही. केंद्राची मदत मिळेल हे गृहीत धरून साधारण २० हजार कोटींचे २८ आदेश राज्याने काढले आहेत. १९ हजार ८०१ कोटी मदत शेतकऱ्याला केली आहे.

केंद्राला साधारणपणे १ कोटी ३ लाख हेक्टर एवढ्या शेतीसाठीचा अहवाल कृषी विभागाने पाठवला आहे.

राज्य मदत आणि पुनर्वसन सचिवांनी माहिती दिली की, राज्याने केंद्राकडे आधीच अहवाल पाठवला आहे. राज्याच्या प्रस्तावानंतर केंद्रीय पथकाने पाहणी केली. त्यानुसार केंद्राकडे २ प्रस्ताव जातात. एक शेतकऱ्यांच्या मदतीचा आणि दुसरा पायाभूत सुविधा नुकसानीचा आहे. शेतकऱ्यांच्या मदतीचा पहिला प्रस्ताव आधीच गेला आहे. तर दुसरा अहवाल तयार होत आहे. उद्या त्यासंदर्भात दिल्लीत बैठक आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, केंद्राचे पथक अतिवृष्टी नुकसानीची पाहणी करण्यासाठी राज्यात आले होते. केंद्र आणि राज्याचे सर्वेक्षण अहवाल एकत्रितपणे पाहून केंद्र अंतिम मदत जाहीर करते.

शरद पवार गटाच्या खा. सुप्रिया सुळे केंद्र व राज्य शासनावर टीका करत म्हणाल्या की,अतिवृष्टीबाबत मदतीसाठी महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे कोणतीही मागणी केलेली नाही. राज्याने शेतकऱ्यांना ३६ हजार कोटींची मदत जाहीर केली होती. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांची फसवाफसवी सुरु आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे. त्याचबरोबर यवतमाळ, वाशीम भागात कापूस आणि सोयाबीनची खरेदी केंद्राकडून व्यवस्थित होत नसल्याचीही तक्रार शेतकरी करत आहे. खा. निलेश लंके यांनी शेतकऱ्यांबाबत सरकार संवेदनशील नाही आणि मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री खोटे बोलत असल्याचा आरोप केला. तर विजय वडेट्टीवार यांनी सरकार बेईमानी करून निवडणुका जिंकते आणि शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडते असे टीकास्त्र डागले. याशिवाय शेतकरी नेते राजू शेट्टी, आ. रोहित पवार यांच्यासह विरोधी नेत्यांनी सरकारवर टीका केली.

## लढाऊ विमानातील वैमानिकाच्या सुरक्षेसंबंधी महत्त्वाची चाचणी यशस्वी

पान १ वरून

बटन दाबताच वैमानिकाच्या डोक्याच्या वर असलेली झडप उघडते आणि त्याचवेळी वैमानिक आपल्या खुर्चीसह विमानातून बाहेर फेकला जातो. विमानातून बाहेर फेकला गेल्यानंतर खुर्चीला बांधलेले पॅराशूट उघडते आणि वैमानिक अलगद जमिनीवर उतरतो. डीआरडीओने केलेल्या चाचणीत हे सर्व टप्पे यशस्वीरित्या पार पडले. वैमानिक सेफ इंजेक्शन करून सुरक्षित बाहेर पडला. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल डीआरडीओचे कौतुक केले.

## ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई महापालिकेकडून चोरव व्यवस्था

मुंबई

**भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी विविध सोयीसुविधांसह,चोख व्यवस्था मुंबई महापालिकेने केली आहे. चैत्यभूमी, शिवाजी पार्क, दादर राजगृह यासह आवश्यक त्या विविध ठिकाणी सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. चैत्यभूमीतील आदरांजलीचे विविध समाजमाध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. अनुयायांसाठी निवासी मंडप, धूळ प्रतिबंधक आच्छादन, प्रसाधनगृहे, पिण्याचे पाणी, सुरक्षा व आरोग्यविषयक सेवा-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. यासाठी ८ हजारांहून अधिक कामगार, कर्मचारी, अधिकारी कर्तव्यतत्पर असणार आहेत. अनुयायांसाठी अन्य ठिकाणी आवश्यक नागरी सेवा-सुविधांची पूर्तता करण्याचे निर्देशही पालिकेने दिले आहेत. गेल्या वर्षी १३ हजार २८२ अनुयायांनी आरोग्य तपासणी व औषधोपचारांचा लाभ घेतला होता. कीटकनाशक व मक्षिका नियंत्रण फवारणीसाठी देखील मनुष्यबळ नेमण्यात आले आहे. चौपाटीवर सुरक्षारक्षकांसहीत बोटी, विचारप्रवर्तक पुस्तकांसह वैविध्यपूर्ण बाबींच्या विक्रीसाठी स्टॉल्स, राजगृह येथे नियंत्रण कक्ष आणि वैद्यकीय कक्ष, स्काऊट गाईड हॉल येथे भिक्खू निवास अशा अनेक सोईसुविधांसह, चोख पोलीस बंदोबस्त येथे तैनात आहे.

## निवडणुका जिंकण्याचे आव्हान! हितेंद्र ठाकूर हिंदुत्वाकडे वळले

वसई

विधानसभा निवडणुकीतील सपशेल पराभवानंतर बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर यांनीदेखील हिंदुत्वाची कास धरली आहे. उत्तरभारतीय आणि गुजराथी मतदारांना आकर्षित करण्यासाठी त्यांनी थेट गुजराथमधील द्वारकाधीश मंदिराची प्रतिकृती असलेले भव्य मंदिर उभारले आहे. या मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्ताने त्यांनी एकप्रकारचे धार्मिक शक्ती प्रदर्शन घडवून आणले आहे.

बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांची वसई-विरार शहरावर ३५ वर्षापासून एकहाती सत्ता होती. महापालिका, पंचायत समिती, सहकारी क्षेत्र त्यांच्या ताब्यात होते. मात्र लोकसभा निवडणुकीपाठोपाठ मागील विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या तिन्ही उमेदवारांचा पराभव झाला होता. खुद्द ठाकूर पिता-पुत्रांना लोकांनी घरी बसवले होते.

निवडणुकीत भाजपाने बविआला चारही मुंड्या चीत केले होते. या पराभवानंतर बविआला गळती लागली. अनेक नेते भाजपाच्या गोटात गेले. दुसरीकडे भाजपाची ताकद वाढू लागल्याने बविआपुढे महापालिका निवडणूक जिंकण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. धर्मनिरपेक्ष अशी बविआची आजवरची प्रतिमा होती. मात्र निवडणुका जिंकायच्या असतील तर बहुसंख्य असलेल्या परप्रांतिय आणि हिंदू मतदारांना आपल्याकडे खेचावे लागेल याची जाणीव हितेंद्र ठाकूर यांना झाली. त्यामुळे ठाकूरांनी हिंदुत्वाचा आधार घेतला आहे. हितेंद्र ठाकूर यांच्या पत्नी माजी महापौर प्रवीणा ठाकूर यांच्या संकल्पनेतून विरारच्या शिरगाव येथे भव्य द्वारकाधीश मंदिर तयार करण्यात आले आहे.

गुजराथच्या प्रसिध्द द्वारकाधीश मंदिराची ही प्रतिकृती आहे. या मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने शंकराचार्यापासून विविध धर्मगुरूंना त्यांनी विरारमध्ये आणले. अभिनेता संजय दत्तपासून गोविंदापर्यंत अनेक कलावंतांनी हजेरी लावली. वसई-विरारमध्ये परप्रांतियांची संख्या वाढत आहे. उत्तर भारतातील हे मतदार भाजपाचे समर्थक मानले जातात. त्यामुळे त्यांना आपल्याकडे वळविण्यासाठी या मंदिराचा वापर करता येईल असे खुद्द बविआच्या नेत्याने सांगितले.

## अजित पवारांचा पुत्र जय पवारांचा विवाह अरब देशात! बहरीनला सोहळा

पान १ वरून

बारामतीतून वऱ्हाड निघणार बहरीनला! त्यामुळे आता लग्नाची लगबग सुरु झाली आहे. अजित पवार बहरीनला पोहोचले आहेत. महाराष्ट्रातील आघाडीच्या नेत्याच्या कुटुंबातील विवाह परदेशात आणि तेही अरब देशात होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या विवाहाला शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांना आमंत्रण आहे की नाही याबाबत उत्सुकता आहे. ४ ते ७ डिसेंबर २०२५ या कालावधीत बहरीनमध्ये लग्न सोहळ्याचे विविध कार्यक्रम रंगणार आहेत. जय पवार आणि ऋतुजा पाटील यांच्या लग्नानिमित्त ४ डिसेंबर रोजी मेहंदी, ५ डिसेंबर रोजी हळद, वरात आणि मुख्य लग्नसोहळा, ६ डिसेंबर रोजी संगीत, तर ७ डिसेंबर रोजी स्वागत समारंभ होणार आहे.

पवार कुटुंबातील लागोपाठचे हे दुसरे लग्न आहे. अजित पवार यांचे लहान बंधू श्रीनिवास यांचे पुत्र युगेंद्र पवार आणि तनिष्का कुलकर्णी यांचा विवाह सोहळा ३० नोव्हेंबर रोजी मुंबईत बीकेसी येथील जिओ सेंटर येथे पार पडला होता. युगेंद्र पवार यांच्या विवाह सोहळ्याला पवार कुटुंबातील सगळेच सदस्य उपस्थित होते. ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे , सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार यांनीही लग्नात सहभागी होत नवदाम्पत्याला शुभेच्छा दिल्या होत्या. मात्र निवडणूक प्रचारात असल्याने अजित पवार लग्नाला उपस्थित राहिले नाहीत. ते फक्त हळदी समारंभाला आले होते .

## पंतप्रधान मोदींचा चहा विकतानाचा एआय व्हिडिओ काँग्रेसकडून पोस्ट

पान १ वरून

आहे. सामान्य पार्श्वभूमीतून उदयास आलेले पंतप्रधान काँग्रेस स्वीकारू शकत नाहीत. काँग्रेसने यापूर्वी त्यांना 'चायवाला' बोलून पंतप्रधान मोदी यांची थट्टा केली होती. पंतप्रधान यांच्या आईलाही त्यांनी लक्ष्य केले आहे. जनता त्यांना कधीही माफ करणार नाही.

१० सप्टेंबर रोजी, एआय-जनरेटेड व्हिडिओ असे लेबल असलेल्या ३६ सेकंदांच्या व्हिडिओमध्ये पंतप्रधान त्यांच्या दिवंगत आईचे स्वप्न पाहत असल्याचे दाखवण्यात आले होते. गेल्या महिन्यात झालेल्या बिहार राज्यातील निवडणुकीतील राजकारणावर त्यांच्यावर टीका करताना हा व्हिडीओ दाखवण्यात आला होता. या व्हिडिओमुळे मोठा वाद निर्माण झाला आणि पाटणा उच्च न्यायालयाने काँग्रेसला सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून हा व्हिडिओ काढून टाकण्याचे निर्देश दिले.


नायक यांची पोस्ट पक्षाला भूतकाळातील चुकांमधून काही शिकत नसल्याचेच दर्शवते. काँग्रेस नेत्यांचे चहावाला किंवा चहा विक्रेता अशी नरेंद्र मोदींवर टीका २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू झाली होती.मात्र त्याचा भाजपाने त्याचा वारंवार आपल्या फायद्यासाठी वापर केला आहे.

जानेवारी २०१४ च्या एआयसीसी अधिवेशनात ज्येष्ठ काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर म्हणाले की मोदी कधीही पंतप्रधान होणार नाहीत आणि त्यांनी काँग्रेसच्या ठिकाणी चहा देऊ किंवा वाटू शकतात असे उपहासात्मकपणे म्हटले. हे विधान मोदी यांच्या चहा विक्रेत्याच्या भूतकाळाची थट्टा करणारे म्हणून मोठ्या प्रमाणात दाखवले गेले. या टिप्पणीवर लगेचच टीका झाली होती. राहुल गांधींनी सार्वजनिकरित्या या टिप्पणीला नकार दिला. परंतु भाजपाने त्यास मोदीं म्हणजे नम्र वंशाचा आणि सामान्य भारतीयांचा अपमान झाल्याचे असल्याचे म्हटले. अय्यर यांनी असा युक्तिवाद केला की त्यांनी मोदींना कधीही चहावाला म्हटले नाही परंतु निवडणूक हरल्यानंतर मोदी चहा देऊ शकतात हा त्यांचा व्यंग्यात्मक सल्ला काँग्रेससाठी एक मोठे राजकीय नुकसान झाल्याचे त्यांनी मान्य केले. भाजपच्या रणनीतीकारांनी या वक्तव्याचे रूपांतर लवकरच देशव्यापी चाय पे चर्चा कार्यक्रमात केले.

## बिबट्याच्या हल्ल्यात वृद्ध महिलेचा मृत्यू

अहिल्यानगर

**शेतामध्ये** खुरपणीचे काम करत असताना एका वृद्ध महिलेवर अचानक बिबट्याने हल्ला केल्याची घटना पारनेरमधील किन्ही-गोरेगाव रस्त्यावर घडली.या हल्ल्यात महिलेचा जागीच मृत्यू झाला. भागुबाई विश्वनाथ खोडदे (६५) असे या महिलेचे नाव आहे.त्या पारनेर तालुक्यातील किन्ही गावात राहत होत्या. भागुबाई खोडदे या आपल्या शेतात हरभरा खुरपणी करत असताना बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला व त्यांना फरपटत नेले. त्यावेळी त्यांचे पती शेजारच्या शेतामध्ये गव्हाला पाणी देत होते. त्यांनी ही घटना पाहिली व आरडाओरडा करून ग्रामस्थांना बोलावून घेतले.



## साताऱ्यातील वावरहिरेचा पाणीपुरवठा बंद

**सातारा**- माण तालुक्यातील वावरहिरे गावाचा पाणीपुरवठा गेल्या महिन्याभरापासून बंद आहे.त्यामुळे नागरिकांना फुटलेल्या पाइपलाइनमधून वाहणारे दूषित पाणी भरून न्यावे लागत आहे.सध्या या डबक्यावर पाणी भरण्यासाठी महिलावर्ग दिसत आहे. मुख्य पाइपलाइन फुटल्यानंतर वाहणारे पाणी रस्त्यावर साचून तयार झालेले डबके लोकांचा पाण्याचा स्त्रोत निर्माण झाला आहे.

गावात मोकाट फिरणारी जनावरे याच डबक्यातील पाणी पितात आणि त्यात नाचून जातात. त्यामुळे ते पाणी अत्यंत अस्वच्छ असून आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे. या संदर्भात नागरिकांनी ग्रामपंचायत तसेच संबंधित प्रशासनाकडे तक्रार करूनही अद्याप पाणीपुरवठा सुरळीत न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. पाइपलाइन फुटल्याने शुद्ध पाणी उपलब्ध होत नसल्याने त्वचारोग, पचनाचे त्रास, पाण्यावरील आजारांचे संकट येण्याची शक्यता आहे.

## शीतल तेजवानीला अटक! पार्थवर कारवाई कधी?

पान १ वरून - प्रश्न उपस्थित केला जात आहे. यापूर्वी शीतल तेजवानीची दोन ते तीन वेळा कसून चौकशी घेण्यात आली होती. विविध शासकीय विभागांकडून मागविण्यात आलेली कागदपत्रे तपासण्यात आली होती आणि गरज पडल्यास पुन्हा चौकशीसाठी बोलावू, अशी सूचना पोलिसांनी दिली होती. त्यानंतर तिला आज पुन्हा चौकशीसाठी बोलावले होते. चौकशीत उघड झालेल्या बाबींवरून तिचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली. तिला उद्या न्यायालयात हजर करणार आहेत. या प्रकरणातील दुसरे आरोपी दिग्विजय पाटील यांची ५ डिसेंबरला खारगे समितीसमोर चौकशी होणार असून, या समितीचा अहवाल ७ डिसेंबरला सादर केला जाणार आहे.

नवाकाळ

• पुणे । गुरुवार ४ डिसेंबर, २०२५ • पान -८

# आंगणेवाडी जत्रौत्सव ९ फेब्रुवारीला



**सिंधुदुर्ग** - मालवणच्या मसुरे गावातील आंगणेवाडी भराडीदेवी जत्रा ९ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असल्याचे आंगणे कुटुंबाने जाहीर केले. विशेष म्हणजे या जत्रेची तारीख निश्चित करताना कोणतीही तिथी अथवा दिनदर्शिका पाहिली जात नाही. दरवर्षी देवीला कौल लावूनच तारीख निश्चित केली जाते. दीड दिवस चालणाऱ्या या उत्सवात आंगणेवाडीच्या माहेरवाशिणी अबोल राहून देवीसाठी खास पद्धतीने नैवेद्य तयार करतात. त्यानंतर जत्रेला आलेल्या भाविकांना हा प्रसाद दिला जातो. आख्यायिका आहे की, याठिकाणी भरडावर म्हणजेच माळरानावर प्रकटल्यामुळे देवीला भराडी नावाने ओळखतात. हे आंगणे कुटुंबाचे खाजगी मंदिर आहे. त्यांनी तसा फलकही लावला आहे. मात्र नवसाला पावणारी देवी अशी ख्याती असल्याने दर्शन सर्वांसाठी खुले असते. गाऱ्हाणे बोलून मनोकामना पूर्ण होण्यासाठी अनेक भाविक भराडीदेवीचे दर्शन घेतात. या यात्रेसाठी कोकणवासी, नेते, विविध क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती आणि परदेशी पाहुणे मोठ्या संख्येने हजेरी लावतात.

## राज ठाकरे राऊतांच्या घरी तब्येतीबाबत विचारपूस केली

■ मुंबई

**उबाठाचे** खासदार संजय राऊत यांना काही दिवसांपूर्वी गंभीर आजाराचे निदान झाले असून,



त्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे हे त्यांच्या भांडूप येथील मैत्री या निवासस्थानी भेटीसाठी गेले. त्यांची गाडी राऊत यांच्या बंगल्याबाहेर पोहोचताच संजय राऊत यांचे भाऊ सुनील राऊत यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर राज ठाकरे आणि संजय राऊत यांच्यात सुमारे अर्धा ते पाऊण तास चर्चा झाली. याआधीही काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांनी राऊतांच्या घरी जाऊन प्रकृतीची विचारपूस केली होती.

याबाबत सुनील राऊत म्हणाले की, संजय राऊत आजारी असल्यापासून राज ठाकरे सतत माझ्या संपर्कात होते. त्यांच्या तब्येतीची माहिती घेत होते.

### राऊत-फडणवीसांची भेट

संजय राऊत यांचे व्याही राजेश नार्वेकर यांच्या मुलाच्या विवाहसोहळ्याला काल अनेक प्रतिष्ठित राजकीय नेते उपस्थित होते. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार यांचाही समावेश होता. या विवाह सोहळ्यात संजय राऊत आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली. यावेळी त्यांच्यात सुमारे २० मिनिटे चर्चा झाली. यावेळी फडणवीस यांनी राऊत यांच्या तब्येतीची विचारपूस केली.



## कर थकवल्याच्या संशयावरून आयकरचे रामी हॉटेलवर छापे

■ मुंबई

**मुंबई,** पुण्यासह देशातील प्रमुख महानगरांमध्ये व्यवसाय करणाऱ्या रामी हॉटेल समूहाने आयकर थकवल्याच्या संशयावरून आयकर विभागाने या समूहाशी संबंधित ३० ठिकाणांवर एकाच वेळी छापेमारी केली. यामध्ये रामी समूहाचे संस्थापक वरदराज मंजाप्पा शेट्टी उर्फ राज शेट्टी आणि अन्य उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांचा आणि कार्यालयांचा समावेश आहे. मुंबईत दादरमधील रामी हॉटेल, पुण्याच्या आपटे रोडवरील रामी ग्रँड हॉटेल यांसह बंगळुरु, दिल्ली, चेन्नई,हैदराबाद,जयपूर, उदयपूर या शहरांमध्ये आणि गोवा राज्यातील काही शहरांत या धाडी घालण्यात आल्या. रामी हॉटेल समूहाची संपूर्ण देशभरात ५२ हॉटेल आहेत. त्यातील काही चार तारांकित तर काही पंच तारांकित हॉटेल आहेत.

## जिल्हापरिषद आरक्षण समस्येमुळे पालिका निवडणूक आधी होणार?

■ मुंबई

**नगरपरिषद** व नगरपंचायत निवडणुकांचे निकाल २१ डिसेंबरला एकाच दिवशी जाहीर करण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे राज्य निवडणूक आयोगाचे नियोजन कोलमडले आहे. २४ नगरपरिषदांमध्ये मतदान उशिरा झाल्याने निकाल पुढे ढकलावे लागले आणि जिल्हा परिषद व महानगरपालिका निवडणुकांच्या कार्यक्रमावर परिणाम झाला. त्याचवेळी जिल्हापरिषद निवडणुकीतही आरक्षणाची समस्या आहेच. त्यामुळे राज्यात जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी महानगरपालिकांच्या निवडणुका घेतल्या जाऊ शकतात अशी चर्चा आहे. असेही म्हटले जाते की आरक्षणाचा वाद असलेल्या परिषदा आणि वाद नसलेल्या परिषदा अशा दोन टप्प्यात जिल्हापरिषद निवडणूक घेतली जाईल.

यापूर्वी आयोगाने दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि तिसऱ्या टप्प्यात महापालिका निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र आता हे वेळापत्रक बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. राज्यातील २० जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्याने त्यांची निवडणूक तत्काळ घेणे कठीण झाले आहे. त्याउलट २९ महापालिकांपैकी फक्त चंद्रपूर आणि नागपूर येथेच आरक्षणाचा प्रश्न असल्याने २७ महापालिका निवडणुका आधी घेणे सोयीचे ठरणार आहे. यामुळे निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुका या जिल्हा परिषद निवडणुकांपूर्वी घेण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या चौकशीसाठी समिती स्थापन

■ बारामती

**शरद** पवार यांच्याकडे असलेल्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटला मिळालेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबत चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने पाच सदस्यीय समिती स्थापन केली आहे. साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती कार्यरत राहणार आहे.

महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या इन्स्टिट्यूटच्या अनुदान वापराबाबत चौकशीची मागणी केली होती. त्यानुसार तात्काळ हालचाल करत शासनाने चौकशी समितीचा आदेश जारी केला आहे. इन्स्टिट्यूटला मिळालेल्या सरकारी अनुदानाचा विनियोग, खर्च, प्रक्रिया आणि संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्याचे निर्देश समितीला दिले आहेत. पुढील ६० दिवसांत समितीने सविस्तर अहवाल सादर करणे अनिवार्य आहे. चौकशीच्या अहवालानंतर पुढील कारवाई काय होते याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## मुंबईत वरळीच्या समुद्रात मनमोहक डॉल्फिनचे दर्शन

■ मुंबई

**वरळी** समुद्रात दोन ते तीन डॉल्फिनचे दुर्मीळ आणि मनमोहक दर्शन झाल्याने मुंबईकरांमध्ये उत्साहाची लहर पसरली आहे. समुद्रात उड्या मारत खेळणाऱ्या या डॉल्फिनचा कोळी बांधवांनी टिपलेला व्हिडिओ व्हायरल झाला आहे. शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर डॉल्फिनचे हे अनपेक्षित आगमन समुद्री पर्यावरणासाठी सकारात्मक संकेत असल्याचे म्हटले जात आहे.

डॉल्फिन मासे साधारणपणे स्वच्छ, कमी प्रदूषण असलेल्या पाण्यातच वावरतात. त्यामुळे वरळी समुद्र भागातील त्यांचा संचार पर्यावरणप्रेमी आणि समुद्र संशोधकांसाठी महत्त्वाची बाब आहे.



एखाद्या कारसारखी दिसणारी ही स्पीड बोट सध्या जुहू चौपाटीवर मुंबईकरांच्या आकर्षणाचा विषय बनली आहे. या कार बोटच्या सफरीचा आनंद घेताना काही तरुण छायाचित्रात दिसत आहेत. (छाया - दीपक साळवी)

## नक्षलवादी व सुरक्षा रक्षक चकमकीत २ जवान शहीद

■ विजापूर

**दंतेवाडा** आणि विजापूरच्या सीमेवर असलेल्या भैरामगड भागातील केशकुतुलच्या जंगलात सकाळपासून नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये चकमक सुरू आहे. दंतेवाडा आणि विजापूरच्या सीमेवर असलेल्या भैरमगड परिसरातील केशकुतुल जंगलात नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये सकाळपासून चकमक सुरू होती. या चकमकीत सुरक्षा रक्षकांनी पाच माओवाद्यांना ठार मारले आहे. या चकमकीत डीआरजीचे दोन जवानही शहीद झाले आहेत. आणखी एक सैनिक जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## हेरगिरीसाठी पेगासेस नाव बदलून संचारसाथी ठेवलं! उद्धव ठाकरेंचा टोला

■ मुंबई

**ठाण्यापाठोपाठ** आता नवी मुंबईतही शिंदे सेनाला उद्धव सेनेने खिंडार पाडले. जिल्हाध्यक्षांसह अनेक पदाधिकाऱ्यांनी मातोश्रीवर येत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे.त्यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजपाचा बुरखा फाटला आहे. राजभवन पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलत आहे. मागील दोन चार वर्षात पेगासेसबाबत ऐकत होता. पेगासेस नाव बदलून यांनी आता संचारसाथी नाव ठेवले आहे. त्यांनी आपल्याच



लोकांवर अविश्वास दाखवायला सुरुवात केली आहे. नागरिकांची हेरगिरी करण्याचा हा प्रकार आहे. त्यांनी दहशतवाद्यांवर लक्ष ठेवायला पाहिजे.

कोकणात सध्या महायुतीत मोठा राडा सुरू आहे. त्यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत कोकणातील राजकीय शिमग्याचीच राज्यभर चर्चा सुरू आहे. शिंदे सेनेचे आमदार निलेश राणे यांनी भाजपावर पैसे वाटपाचा आरोप केला आहे. तर काल शिंदे सेना आणि राष्ट्रवादीतील कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. त्यावर आज उद्धव ठाकरे यांनी जोरदार टोला लगावला.

## ईव्हीएम स्ट्राँग रूमला कडक सुरक्षा! उमेदवारांचाही पहारा

■ मुंबई

**राज्यातील** नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडला. या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबरला जाहीर होणार आहे. पहिल्या टप्प्यानंतर सर्वत्र ईव्हीएम स्ट्राँग रूमबाहेर कडक सुरक्षा तैनात केली आहे. याठिकाणी २४ तास पोलीस, सीसीटीव्ही सुरक्षा आहे. सीलबंद रुममध्ये कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.

याशिवाय उमेदवारांचा खासगी पहारा तैनात करण्यात आला आहे. महायुतीमधील घटक पक्ष स्थानिक पातळीवर स्वतंत्र लढत आहेत. एकमेकांवर विश्वास नसल्याचा आरोप उमेदवारांनी केला आहे. त्यामुळे स्ट्राँग रुमभोवती तणावाचे वातावरण आहे.

## डॉलरच्या तुलनेत रुपयाची प्रचंड घसरण

■ नवी दिल्ली

**भारत** - अमेरिका व्यापार कराराभोवती असलेली अनिश्चितता, परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणुकदारांकडून (एफपीआय) सततची इक्विटी विक्री आणि अमेरिकन चलनाचा कमकुवत पुरवठा यामुळे आज डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण सुरूच राहिली. डॉलरच्या तुलनेत रुपयाने ९०.१६ या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला. सकाळी १०:४६ वाजता रुपया डॉलरच्या तुलनेत ९०.१२ वर व्यवहार सुरु होता. चालू वर्षात भारतीय चलन सुमारे ४.४ टक्क्यांनी घसरले आहे.

कोटक सिक्युरिटीजचे कमोडिटी अँड करन्सी प्रमुख अनिंद्य बॅनर्जी यांनी सांगितले की, भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत अनिश्चितता आहे. इक्विटीजमधून एफपीआयचा प्रवाह

### रुपया ९० पार झाला

आणि जपानी येनचा व्यापार कमी होण्याची चिन्हे यामुळे रुपयावर दबाव येत आहे. २०२५ च्या काळात देशांतर्गत इक्विटी बाजारात परदेशी गुंतवणुकदारांकडून विक्री होत आहे. या वर्षात आतापर्यंत एफपीआयने १.४८ लाख कोटी रुपयांचे शेअर विकले आहेत. डिसेंबरच्या पहिल्या दोन दिवसांत त्यांनी ४,३३५ कोटी रुपयांचे इक्विटी विकले आहेत, त्यामुळे चलनावर दबाव आला आहे.

परकीय चलन बाजारातील सहभागींनी असा दावा केला आहे की रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया रुपयातील घसरण नियंत्रित करण्यासाठी बाजारात सक्रिय होती. त्यांचा हस्तक्षेप मर्यादित आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सांगितले आहे की त्यांचे लक्ष रुपयाच्या अस्थिरतेचे व्यवस्थापन करण्यावर आहे. ते आज बाजारात हस्तक्षेप करत आहेत. परंतु कोणत्याही विशिष्ट विनिमय दर पातळीचे समर्थन करत नाही.

## मॅनहोलमध्ये पडून मुलाचा मृत्यू ६ लाख रुपये नुकसान भरपाई द्या

■ मुंबई

**उघड्या** मॅनहोलमध्ये पडून मुलाचा मृत्यू झाल्याप्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत मयताच्या पालकांना ६ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेला दिले आहेत.

न्यायालयाच्या आदेशानंतर पालिकेने निष्काळजीपणा झाल्याचे मान्य करून जबाबदारी स्वीकारली. मयत मुलाच्या पालकांना दोन आठवड्यात नुकसानभरपाई दिली जाईल, अशी ग्वाही दिली.

१३ वर्षांचा आयुष कदम हा मुलगा पावसाळ्यात उघड्या मॅनहोलमध्ये पडून वाहून गेला होता.

### मुंबई हायकोर्टाचे आदेश

या प्रकरणीच्या खटल्याची न्या. रेवती मोहिते डेरे आणि न्या.संदेश पाटील यांच्या खंडपीठासमोर नुकतीच अंतिम सुनावणी झाली. मयत आयुष कदम याच्या पालकांना नुकसान भरपाई देण्याचे पालिकेने मान्य केल्यानंतर न्यायालयाने याचिका निकाली काढली.

## उद्धव ठाकरेंना अटक करा प्रकाश आंबेडकरांची मागणी



■ मुंबई

**भीमा** कोरेगाव हिंसाचारप्रकरणी चौकशी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित न राहिल्यामुळे, उद्धव ठाकरे यांना अटक वॉरंट बजावण्यात यावे अशी मागणी वंचितचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या वकिलामार्फत केली आहे.

भीमा कोरेगाव येथे २०१८ साली झालेल्या दंगलीसंदर्भात, सध्या आयोगाकडे सुनावणी सुरु आहे. या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांनी जानेवारी २०२० मध्ये तत्तकालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना एक पत्र लिहीले होते. हे पत्र आयोगासमोर सादर करावे असे आदेश आयोगाने दिले होते. मात्र उद्धव ठाकरे यांच्याकडून उत्तर न मिळाल्याने त्यांना आयोगासमोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र मंगळवारी, उद्धव ठाकरे किंवा त्यांच्या नेत्यांपैकी कुणीही आयोगासमोर हजर राहिले नाही. यामुळे प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या वकिलामार्फत अर्ज दाखल केला. दरम्यान, यासंदर्भात उद्धव ठाकरे यांच्या वतीने वकील ॲड. असीम सरोदे यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असल्याने उद्धव ठाकरे आयोगासमोर उपस्थित राहू शकले नाहीत. याप्रकरणात आम्ही काल वकीलपत्र दाखल केले.त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्याविरूद्ध अटक वॉरंट काढण्याचा प्रश्चन उद्भवत नाही.

## वडिलांसाठी लंडनला जाऊ द्या राज कुंद्राची याचिका दाखल

■ मुंबई

**आर्थिक** फसवणुकीच्या प्रकरणात आरोपी असलेले अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा यांनी परदेशवारीसाठी पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली. राज कुंद्रा यांचे वडील सध्या लंडनमध्ये आजारी आहेत. त्यामुळे त्यांची भेट घेण्यासाठी लंडनला सहकुटुंब जाण्याची परवानगी देण्यात यावी, यासाठी राज कुंद्रा यांनी नव्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर न्या. अजय गडकरी व न्या. रणजितसिंह राजे भोसले यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. परंतु याप्रकरणी तूर्त त्यांना कोणताही दिलासा न देता उच्च न्यायालयाने पुढील सुनावणी १६ नोव्हेंबर रोजी निश्चित केली. शिल्पा शेट्टी व राज कुंद्रासह अन्य एका व्यक्तीविरोधात ऑगस्टमध्ये ६० कोटी रुपयांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी दोघांना लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली. त्यानंतर कुंद्रा याने गुन्हा रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली. ती याचिका प्रलंबित असल्याने आता आजारी वडिलांना भेटण्यासाठी जाण्यास परवानगी देण्याची नवीन याचिका उच्च न्यायालयात दाखल केली आहे.

## अवघ्या ३ फूट उंचीचा तरुण गुजरातमध्ये डॉक्टर बनला

**गुजरातच्या भावनगर येथील गणेश बरैया यांनी डॉक्टर बनण्यासाठी जो संघर्ष केला, तो खऱ्या अर्थाने प्रेरणा देणारा आहे. अवघी ३ फूट उंची आणि २० किलो वजन असलेल्या गणेश बरैया यांनी न्यायालयीन लढा देत आपले डॉक्टर बनण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे.**

■ गांधीनगर

**गणेश** बरैया यांची उंची केवळ ३ फूट आणि वजन फक्त २० किलो आहे; पण त्यांच्या स्वप्नांची उंची इतकी मोठी होती की, कोणताही अडथळा त्यांना रोखू शकला नाही. गणेश बरैया एका सामान्य कुटुंबातून येतात आणि आठ भावंडांपैकी एक आहेत. लहानपणापासूनच त्यांना बुटकेपणाची समस्या होती.मात्र, त्यांचे डॉक्टर बनण्याचे आणि लोकांची सेवा करण्याचे स्वप्न होते. २०१८ मध्ये जेव्हा त्यांनी एमबीबीएसमध्ये प्रवेशासाठी अर्ज केला तेव्हा मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने त्यांना प्रवेश देण्यास नकार दिला. त्यांची उंची डॉक्टर बनण्यासाठी योग्य नाही, असे सांगण्यात आले. हा नकार ऐकून कोणीही हार मानली असती;पण



गणेश यांनी हिंमत सोडली नाही. त्यांनी आपल्या शाळेचे प्राचार्य डॉ. दलपत कटारिया यांच्या मदतीने कायदेशीर लढाई सुरू केली. त्यांनी आधी गुजरात उच्च न्यायालयात धाव घेतली; पण तिथेही निराशा मिळाली. तरीही त्यांनी धीर सोडला नाही. त्यांनी थेट सुप्रीम कोर्टाचा दरवाजा ठोठावला.

अखेर चार महिन्यांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर सुप्रीम कोर्टाने ऐतिहासिक निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की,उंची कोणाच्याही स्वप्नांना अडवू शकत नाही आणि गणेश यांना एमबीबीएसमध्ये प्रवेश मिळाला. प्रवेश मिळाल्यावरही गणेश यांचा संघर्ष थांबला नाही.वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणे सोपे नव्हते. लॅबमध्ये पोहोचणे, क्लासरूममध्ये बसणे, इंटर्नशिप करणे या प्रत्येक कामात त्यांना अडचणींचा सामना करावा लागला.

## सदानंद दाते नवे पोलीस महासंचालक

■ मुंबई

**एनआयएचे** महासंचालक आयपीएस अधिकारी सदानंद दाते आता महाराष्ट्राचे नवे पोलीस महासंचालक पदाचा भार स्वीकारणार आहेत. सध्याच्या महासंचालक रश्मी शुक्ला ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. २६/११ हल्ल्यात जीवाची पर्वा न करता अतिरेक्यांना रोखणाऱ्या या अधिकाऱ्याच्या हातात आता राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेची धुरा सोपवली जाणार आहे.

## दिल्ली पोटनिवडणूक! निकाल जाहीर भाजपाच्या दोन जागा घटल्या! आप स्थिर

■ नवी दिल्ली

**दिल्ली** पालिका पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे.भारतीय जनता पक्षाने (भाजपा) १२ पैकी ७ वॉर्ड जिंकले. गेल्या निवडणुकीत भाजपाला ९ जागांवर यश मिळाले होते. यावेळी भाजपाच्या दोन जागा घटल्या. आम आदमी पक्षाने (आप) तीन जागा जिंकल्या, तर काँग्रेस १ आणि डाव्या पक्षांना प्रत्येकी एक जागा जिंकण्यात यश आले.

३० नोव्हेंबर रोजी ज्या १२ वॉर्डांमध्ये मतदान झाले होते त्यापैकी नऊ वॉर्ड पूर्वी भाजपाकडे होते आणि उर्वरित आम आदमी पक्षाकडे (आप) होते. २०२२ मध्ये २५० वॉर्डांसाठी झालेल्या निवडणुकीत ५०.४७ टक्के मतदान झाले होते, तर यावेळी मतदानाची टक्केवारी ३८.५१ टक्के इतकी कमी झाली होती. या निवडणुकीसाठी कांझावाला, पितामपुरा, भारत नगर, सिव्हिल लाइन्स, राऊस अव्हेन्यू, द्वारका, नजफगड, गोळे मार्केट, पुष्प विहार आणि मांडवली येथे दहा मतमोजणी केंद्र होती, असे राज्य निवडणूक आयोगाने एका निवेदनात म्हटले आहे.